साल अखेर „ ७ „ १ ८
किरकोळ अंकास.......................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .........८१ ८६
दुसरे खेपेस ...........८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ...... ... ...„ 8 as
Single copy ............... ...... ... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line ...3 as

VOL XXX — AKOLA MONDAY 7 DECEMBER 1896 — NO 47

वर्ष ३० — आकोला सोमवार तारीख ७ माहे डिसेंबर सन १८९६ इ० — अंक ४७

नोटीस

राजाराम जोहरी, तुळसीराम जोहरी वस्ती नवापूरा अकोलें यांस खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत कीं अकोलें शहरांतील मिरजा अबासबेग यांच्या बरा नजीक तुमचे दुकान घर आह्मी भाड्यानें घेतलें आहे. त्याज बद्दल भाडे चिठ्ठी आह्मी तुह्मास लिहून दिली आहे. त्यांत अशी शर्त आहे कीं जो पर्यंत आमच्या खुषीस येईल तो पर्यंत सदर्हू घरांत राहूं त्या प्रमाणें आह्मी एक महिना तुमचे घर दुकान वापरले आहे. त्याज बद्दल आमचा त्या घरास लागलेला खर्च २॥।– झाला आहे. तुमचे भाडे रु. ३॥ आहे. त्यांत सदर्हू रुपये २॥।– जातां बाकी तुह्मी आपले घेऊन जाऊन घर दुकान ताब्यात घ्यावें तसें न केल्यामुळें तुमचे घर दुकान खालीं राहिल्यास त्याज बद्दलचे पुढील भाडे आह्मी देणार नाहीं. तुमचे जवळ आमची भाडे चिठ्ठी आहे ती आह्मी रद्द केली आहे. हें तुह्मास कळावे. सदर्हू घर दुकान उद्या तारीख १।१२।९६ इसवी रोजीं ताब्यांत घ्यावें असें न केल्यास आह्मी सदरील तारखेस पुढील तारखे बद्दलचे भाड्या बद्दल जबाबदार नाहीं. सदर्हू घर व दुकान समक्ष तुह्मास ताब्यांत घेण्या करितां सांगितलें असतां तुह्मी घेतलें नाहीं. करितां ही नोटीस देणें भाग पडलें करितां ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचें आंत उत्तर द्यावें व ह्या नोटिसीचा खर्च ही तुह्मास द्यावा लागेल. कळावे ता. ३०।११।९६ इसवी.

( सही ) गुजराथी मध्यें.

आहमदअली वा मुल्ला अबदुल हुसेन
शेट दुकान अकोले दस्तूर खुद्द.

## वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ११ शके १८१८

( रा. रा. गणेश रामचंद्र दामले. बी. ए. यांनीं लिहिलेला )

वऱ्हाडामध्यें सध्याचें शाळाखातें स्थापन होण्यापूर्वीं, या प्रांतांमध्यें खासगी मराठी शाळा असोन, त्या ठिकाणीं उजळणी लेखन, वाचन व तोंडचे हिशेब, एवढेच विषय कायतो शिकविले जात असत या शाळांमध्यें जाणारीं मुलें ह्मटलीं ह्मणजे, व्यापारी मंडळीचीं, पटवारी कुळकर्णी यांचीं, भिक्षुक मंडळीचीं, व क्वचित् पाटील देशमुख वगैरे मंडळीचीं असत. यांपैकीं भिक्षुक व इतर मंडळी अक्षर ओळख व साधारण वाचन आल्या बरोबर या शाळांची रजा घेत, आणि पुढें शिकणें झाल्यास घरींच पोथ्यां-पुस्तकें, पुराणें वगैरे वाचून अभ्यास करीत असत. व्यापारी लोकांचीं मुलें मात्र चांगलें लेखन, वाचन, व तोंडचे हिशेब येईपर्यंत या शाळा सोडीत नसत. मोंगलाई अंमलामध्यें हीच पद्धत चोहोंकडे चलूं होती. पुढें सन १८९२ सालीं, हा प्रांत इंग्रज सरकारचे ताब्यांत गेला, आणि नंतर सुमारें ८।१० वर्षांनीं, सध्याची शिक्षणपद्धति अमलांत आली. ही पद्धति पूर्वींच्या शिक्षण पद्धतीपेक्षां पुष्कळ पटीनें चांगली आहे, हें कबूल केलें पाहिजे. पूर्वींच्या शिक्षणाचा, उपयुक्ततेवर विशेष कटाक्ष असे. व्यवहाराला जितकें शिक्षण पाहिजे त्या पलीकडे त्याची मजल क्वचितच जात असे. हल्लींच्या शिक्षणाचा मुख्य रोख मानसिक उन्नतीकडे आहे. पूर्वींच्या शिक्षणक्रमामध्यें, मुलांची नीतिमत्ता वाढण्याकरितां, इतिहास पुराणांतील नीतिपर गोष्टी मुलांस शिकविल्या जात असत. हल्लींच्या शिक्षणक्रमामध्येंही, नीतिपर गोष्टी क्रमिक पुस्तकांत घातल्या आहत फरक इतकाच कीं, पूर्वींच्या गोष्टी, धर्म दृष्टीनें शिकविल्या जात असत आणि आतांच्या, नुसत्या नैत्रिक दृष्टीनें शिकविल्या जातात. कारण आतां निरनिराळ्या धर्मांच्या लोकांस एकाच शाळेंत जावें लागतें. या मुळें धर्माकडे लक्ष देतां येत नाहीं. तरी पण एकंदरींत हल्लींच्या शिक्षण पद्धतीनें या प्रांताचें बरेंच हित झालें आहे हें कबूल केलें पाहिजे. हें हित अनेक प्रकारचें आहे. पूर्वीं, कांहीं नियमित धंद्यांचे लोक मात्र शाळेंत जात असत. परंतु आतां सर्व जातींचे व सर्व धंद्याचे लोक कमजास्त प्रमाणानें शाळेंत जाऊन शिकत आहेत. पूर्वीं पेक्षां आतां पुष्कळ शेतकरी लोकांस, मुसलमान लोकांस व महार चांभारांस देखील, लिहितां वाचतां येऊं लागलें आहे. पाटील पटवारी लोक आपापलीं कामें अधिक हुशारीनें करण्यास समर्थ झाले आहेत. शेंकडों लोक इंग्रजी शिकलेले तयार असून शेंकडों शिकत आहेत. त्यांनीं सरकारी आफिसांतील सर्व प्रांताचें काम उत्तम प्रकारें सांभाळिलें आहे. कित्येक पदवीधर बनून ह्यांनीं आपला उदर निर्वाह मोठ्या सन्मानानें आणि नांवलौकिकानें चालविला आहे आणि त्यांनीं आपली गृहस्थिति सुधारली आहे. आणि आज जर आणखी हजार लोकांची नोकरी करितां जरूरी लागली तर ते सर्व येथल्या येथें मिळण्यासारखे आहेत. परंतु येथें आपणास थांबलें पाहिजे. या पेक्षां जास्त स्तुति करितां येत नाहीं; कारण आज पर्यंत कोणी एखाद्या शिकलेल्या गृहस्थानें एखादा नवीन शोध लावून आपल्या देशाची संपत्ति वाढविण्याचें किंवा कायम ठेवण्याचें श्रेय घेतलें नाहीं कोणी शिकलेल्या लोकांनीं एक जुटीनें स्वतंत्र उद्योगधंदे व कारखाने काढिले नाहींत. शेतकरी किंवा व्यापारि लोकांच्या सोयी करितां कोणीं ब्यांका काढिल्या नाहींत. अकोला वाशिम रेल्वे तयार करण्या इतपत कोणाचें अंगीं धाडस किंवा सामर्थ्य प्राप्त झालें नाहीं. आस्ट्रेलिया सारख्या कमी लोकवस्तीच्या ठिकाणीं वसाहत नेऊन अर्ध पोटीं रहाणाऱ्या आपल्या देशबांधवांस, कोणी सुखी केलें नाहीं. स्वतां घस सोसून लोक शिक्षणाचें काम कोणी हातीं घेतलें नाहीं गरिबांचा पक्ष घेऊन कोणी सरकारी जुलमा विरुद्ध झगडा केला नाहीं, किंवा आपले योग्य व न्याय्य हक्क आपणास मिळावे ह्मणून कोणीं लोकांमध्यें विलक्षण चळवळ उत्पन्न केली नाहीं. सारांश खऱ्या शिक्षणाचे परिणाम अझून कांहींच झालेले दिसून येत नाहींत. ज्याचा त्याचा नोकरीवर डोळा. हा दोष लोकांचा नाहीं. तर शिक्षण पद्धतीचा होय. कारण सध्याच्या शिक्षणानें मुलांस कोणताही स्वतंत्र उद्योग्य धंदा काढण्याचें सामर्थ्य येत नाहीं. आजपर्यंत आपल्या लक्षांत हा दोष इतक्या ठळक रीतीनें आला नाहीं. याचें कारण आपल्या शिकलेल्या लोकांस भराभर नोकऱ्या मिळत गेल्या. या मुलुखामध्यें इंग्रजी अंमल सुरू होऊन सुधारलेली इंग्रजी राज्य पद्धति सुरू झाल्या वर कित्येक नवीन धंदे व खातीं उत्पन्न झालीं. उदाहरणार्थ—विद्याखातें—वैद्यकखातें इंजिनीयरखातें; मोजणी खातें, जंगलखातें, देवीचें खातें, पोस्ट, तारायंत्र, रेल्वे, लोकल बोर्डें, मुनिसिपालिट्या वगैरे अनेक खातीं व वकीलीचा, वैद्यकीचा, नाना तऱ्हेचे मक्ते घेण्याचा व कापसाचें काम करण्याचा वगैरे अनेक नवीन धंदे उत्पन्न झाले आणि शिवाय पूर्वीं असलेलीं दिवाणी फौजदारी, पोलीस वगैरे खातींही पुष्कळ वाढविलीं गेलीं. त्यामुळें सरकारास एकदम, मामलेदार, मुनसब, वकील यांची व कारकून लोकांची फारच गरज होती. हे इतके इंग्रजी शिकलेले लोक नाना प्रकारचे काम धंदे चालविण्यास, सरकारची कारकुनी करण्यास, व इंग्रजी कायदा लोकांस समजून सांगण्यास पाहिजेच होते. ह्मणून आजपर्यंत ही शिक्षण पद्धत्ति आपणांस योग्य वाटली. परंतु या शिक्षणपद्धति पासून आतां फार नुकसानच होत आहे. कारण आतां नोकऱ्या दुर्मिळ झाल्या आहेत. आणि सर्व जातीचे, दर्ज्याचे आणि धंद्याचे लोक शिकून नोकरी करितां भटकत आहेत आणि आपले पिढीजाद धंदे विसरून जाऊन पुढें काय करावें या फिकिरींत पडत आहेत. करितां आतां या शिक्षण पद्धती मध्यें फेरफार केला पाहिजे.

शिक्षण ह्मटलें ह्मणजे ज्याच्या योगानें मनुष्यास उपजत प्राप्त झालेल्या बुद्धीचा व मानसिक अंकुरांचा विकास होतो तें खरें शिक्षण अशी पुष्कळ विद्वान् लोक शिक्षणाची व्याख्या करितात. आतां सृष्टीमध्यें ज्या प्रमाणें वस्तुवैचित्र्य आढळून येतें. त्या प्रमाणेंच मनुष्याची मानसिक बुद्धि, शक्ति व कल या मध्येंही आढळून येणें स्वाभाविक आहे. ह्मणून एका मनुष्याला जो विषय आवडतो तो सर्वांना आवडलाच पाहिजे असें नाहीं. करितां ज्याचा ज्या विषयाकडे विशेष कल असेल त्यामध्यें जर त्याला घातला तर त्या मध्यें तो नांवालौकिकास येण्याचा जास्त संभव असतो. परंतु सध्यांच्या शिक्षणपद्धती प्रमाणें या अशा प्रकारच्या निवडीला जागाच रहात नाहीं. सरसकट सर्व दर्ज्यांच्या व धंद्याच्या लोकानां एकाच प्रकारचें शिक्षण दिलें जातें. सर्व मुलें जणूं काय एकाच सांच्यातून बाहेर काढल्या प्रमाणें होतात. यामुळें राष्ट्राचें फार नुकसान होतें. करितां सर्वांना एकच यंत्रातून काढण्याचा जो हा प्रकार तो होईल तितका लौकर बंद झाला पाहिजे, कारण हा दोष इतका मोठा व राष्ट्राला इतका अपायकारक आहे कीं तो अगोदर नाहींसा केल्या वाचून आपल्या दुसऱ्या सुधारणांचा कांहीं एक उपयोग व्हावयाचा नाहीं. मिल सारख्या तत्ववेत्त्याचें ह्मणणें आहे कीं राष्ट्रांतील एकाद्या व्यक्तीच्या नुसत्या विचाराचा सुद्धां जर कोणी जबरदस्तीनें कोंडमारा करील तर त्या योगानें सर्व राष्ट्राचें देखील नुकसान होण्याचा संभव आहे. तर मग ज्या राष्ट्रांतील व्यक्तिमात्राच्या विशिष्ट बुद्धीच्या अंकुरांचा त्या त्या दिशेकडे विकास होऊं न देतां उलट त्या सर्वांच्या विचारांचा व कृतीचा ओघ एकाच दिशेकडे वळविला जातो आणि त्या सर्वांच्या मनामध्यें सेवा व पारतंत्र्य याबद्दल तिटकारा उत्पन्न न होतां आवड उत्पन्न केली जाते व ते सर्व कोणत्याही शारिरिक मेहनतीच्या कामास निरुपयोगी होतील असें शिक्षण दिलें जातें, त्या राष्ट्राचें किती तरी प्रकारें नुकसान झालें पाहिजे बरें? अशा प्रकारें आपलें किती नुकसान होतें हें आपणांस आपल्या देशाची आणि जर्मनी किंवा अमेरिके सारख्या देशाचा उद्योगधंदा व संपत्ति या बाबतींत तुलना केल्यानें कळून येईल. सारांश आपला देश मागें पडण्यास जीं अनेक कारणें आहेत त्या पैकीं अपुरी किंवा दोषी शिक्षणपद्धति हें एक आहे. असो. येथवर एकंदर शिक्षणा संबंधीं सामान्य विचार झाले. आतां या निबंधाचा मुख्य विषय जे प्राथमिक शिक्षण त्याजकडे वळूं.

एज्युकेशन कमिशनच्या रिपोर्टप्रमाणें पाहिलें असतां, प्राथमिक शिक्षण याचा अर्थ प्रजेच्या स्थितीच्या मानानें तिला उपयोगी पडणारें शिक्षण असा आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक प्रजेला विद्येची अभिरुचि नाहीं व ती दारिद्र्यानें पिडलेली आहे. क-

रितां अशा लोकांस, निदान काहीं दिवस तरी, शिक्षण सक्तीनें व फुकट दिलें जावें. तसेंच बहुतेक प्रजा फार गरीब असल्या मुळें तिला हायस्कुलांत किंवा कॉलेजांत जाऊन शिकण्याचें सामर्थ्य नसतें. ह्मणून, सगळा शिक्षणक्रम हायस्कुलांतील व कॉलेजांतील शिक्षणपद्धतीच्या धोरणावर बसविलेला नसावा. तर प्राथमिक शिक्षणाची शाखा अगदीं निराळी असावी. तसेंच हिंदुस्थानांतील प्रजा निराळ्या राज्यव्यवस्थे खालीं पडली आहे. ही राज्यव्यवस्था पुष्कळ प्रजेला कांहींच कळत नाहीं. ह्मणून या नव्या राज्यपद्धती मध्यें व पूर्वीच्या राज्यपद्धती मध्यें फरक काय आणि प्रजेला पूर्वीच्या राज्यपद्धतीमध्यें नव्हते असे कोणते हक्क मिळाले हेंही त्यांस शिकविलें जावें. या योगानें इंग्रजी राज्याची खरी थोरवी कशा मध्यें आहे हें प्रजेला कळूं लागेल. पुन्हा आपल्या देशांतील बहुतेक लोकांचा निर्वाह शेतीवरच आहे करितां, निदान या धंद्याचें शिक्षण सर्व शेतकरी लोकांस व त्यांच्या मुलांस देणें अवश्य आहे. हिंदुस्थानांत शेतकीची शास्त्रीय पद्धति शेतकऱ्यांस मुळींच ठाऊक नाहीं हें परदेशांतील युरोपियनांसही ठाऊक झालें आहे.

अलिकडे हिंदुस्थान सरकाराने हिंदुस्थानांतील शेतकीची स्थिति कशी आहे आणि शेतकरी लोकांचे मुलांस शेतकामाचें शिक्षण देण्याकरितां काय तजवीज केल्या पाहिजेत या संबंधानें चौकशी व विचार करून रिपोर्ट करण्याकरितां एक कमिटी नेमिली होती. त्यावरून ही कमिटी कांहीं तरी उपयुक्त सूचना करील आणि शेतकी संबंधीं शिक्षणा करितां कांहीं तरी उपाय योजिला जाईल अशी आशा वाटत होती. परंतु नुकताच या कमिटीचा जो रिपोर्ट बाहेर पडला आहे त्यावरून ही आशा नाहींशी झाली.

या शेतकीच्या कलेमध्यें पूर्ण निष्णात अशा कांहीं युरोपियनांनीं आपले कित्येक शतकांचे जे अनुभव लिहून ठेविले आहेत ते अनुभव, आणि शास्त्रीय पद्धतीनें शेताची लागवड करण्या संबंधानें, जी सप्रयोग माहिती दिली आहे ती माहिती, यांची हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांस माहिती करून देण्या करितां, आज पर्यंत सरकारानें मुळींच प्रयत्न केले नाहींत असें नाहीं. परंतु ते प्रयत्न कसे अगदीं अवेवट झाले याची माहिती पुढील मद्रास सरकारच्या वर्तनावरून चांगली मिळते.

सन १८६० सालीं मद्रास सरकारानें सेदापेट येथें शेताकरितां जागा राखून ठेविली होती. आणि शेतकामाच्या शिक्षणाचा लोकांमध्यें प्रसार करण्याचे हेतूनें त्या जमिनीवर सन १८७९ सालीं एक शाळा स्थापन केली. या शाळेमध्यें प्रथम विद्यार्थी मिळण्यास अडचण पडूं नये ह्मणून सरकारानें असा ठराव केला कीं या शाळेमध्यें राहून जो तीन वर्षे अभ्यास करील त्याला रेव्हिन्यू खात्यामध्यें जागा दिली जावी. पुढें १८८६ सालीं या शाळेला कालेजाचें स्वरूप प्राप्त झालें सरकारानें या कालेजांत २१ स्कालरशिपा ठेविल्या आणि विद्यार्थ्यांना शेती संबंधीं सर्व प्रकारचा अनुभव मिळेल अशी व्यवस्था करून शिवाय शेतकीच्या धंद्याला अवश्य मानली गेलेली जी जनावरांची आरोग्य-रक्षण-विद्या तीही शिकविली जाईल अशी व्यवस्था केली परंतु पुढें लॉर्ड कॅनेमारा यांच्या कारकीर्दींत या कालेजाला सरकारचा जसा आश्रय मिळावा तसा मिळाला नाहीं. त्यांनीं पाहिलें कीं त्या कालेजांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्यें कुणबी शेतकऱ्यांपेक्षां ब्राह्मण कारकुनाचाच भरणा विशेष आहे. ह्मणून या कालेजाला आजपर्यंत ज्या सवलती होत्या त्या सर्व एकदम बंद केल्या आणि तें कॉलेज उठविण्याच्या इराद्यानें चौकशी करितां एक कमिटी नेमून तिचा अभिप्राय विचारला. या कमिटीचा ठराव लार्ड साहेबांच्या मता विरुद्ध होऊन त्यामध्यें तिनें अशी शिफारस केली हांती कीं हें कॉलेज बंद न करितां जास्त वाढवावें. आणि त्याचा लोकांस जास्त उपयोग होण्या करितां त्याच्या पद्धतीवर प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं शाळा घालाव्या. हा कमिटीचा ठराव (मद्रास सरकारानें हिंदुस्थान सरकाराकडे पाठविला आणि तेथें गेल्यावर पैसे नाहींत या सबबीवर तो कुजत पडला. या प्रमाणें मद्रास इलाख्यांत शेतकीच्या ज्ञानाचा प्रसार करण्याबद्दलचा जो सरकारचा इरादा त्याचा शेवट झाला या मद्रास कॉलेजच्या धर्तीवर पुण्य्र्यास ही सायन्स कालेजमध्यें शेतकीचा क्लास आहे परंतु सर्व शिक्षण इंग्रजी मधून असल्यामुळें तेथें जाण्यास म्याट्रिक्युलेशन परिक्षा पास व्हावें लागत असल्यामुळें आपल्या शेतकरी लोकांस या क्लासाचा फारसा उपयोग होत नाहीं.

अलिकडे त्रावणकोरच्या संस्थानिकांनीं शेतकऱ्यांच्या मुलांस शिक्षण देण्याकरितां एक नवीनच विचार योजिला आहे. त्यांचा असा बेत आहे कीं प्रत्येक खालच्या प्रतीच्या शाळेला एकेक शेत जोडावयाचें. अशा करितां कीं मुलांना शेता मध्यें काम करण्याची संवय व्हावी आणि त्यांना प्रत्येक गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेतां यावा. ही व्यवस्था ठीक दिसते आणि जरी तिला खर्च फार लागेल असें वाटतें तरी त्रावणकोर सारख्या संस्थानांत ती कदाचित् अंमलांत ही येईल. परंतु आपलें सरकार इतका पैसा खर्च करण्यास तयार होईल असें वाटत नाहीं ह्मणून आपणास ही व्यवस्था अगदीं निरुपयोगी ह्मणून सोडूनच दिली पाहिजे.

(पुढें चालेल)

---

हिंवाळ्याचा ऋतु पर्यटनास फार सोयस्कर असतो. आणि युरोपियन अधिकारी या ऋतुमानाचा उपभोग घेण्यासाठीं दवऱ्यावर बाहेर फिरण्यास निघत असतात. हा शिरस्ता बहुत वर्षांचा आहे. आणि या दवऱ्या पासून सरकारचें व रयतेचें हित होतें असें ह्मणत असतात. लार्ड एलजिन व्हाइसराय यांचीं स्वारी मध्य हिंदुस्थानांतील संस्थानिकांचा पाहुणचार घेत घेत चालली आहे आणि त्यांचा कित्ता आपापल्या दर्जाच्या बेताबातानें सर्व अधिकाऱ्यांनीं हिंदुस्थानभर वळविण्याचा धडाका चालविला आहे. व्हाइसराय साहेबांच्या सन्मानार्थ लक्षावधी रुपये खर्च होत आहेत आणि सृष्टीतील प्रेक्षणीय व उपभोग्य पदार्थांनीं लाट साहेबांस आनंदनिर्धीत बुडवीत आहेत हें पाहून कोणा राजनिष्ठ प्रजाजनास संतोष वाटणार नाहीं बरें! राजपुरुषांचा किंवा राजाज्ञाप्रवर्तकांचा सर्वत्र धन्यवाद होत आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे तथापि या चकचकीत आरशाला दुसरी एक बाजू आहे. खर्चाची मर्यादा अती वाढली आहे. सर्व देश विपद्ग्रस्त व दुष्काळपीडित झाला आहे. अशा वेळीं हल्लीं चालूं असलेले राजेशाही पाहुणचार फार अनिष्ट होत. या पाहुणचाराचा बडोद्यास तर अती विपरीत परिणाम झाला. आयुष्यामध्यें दुसरे असे आनंदोत्कर्षाचे प्रेक्षणीय दारुकामाचे देखावे पहाण्यास मिळणार नाहींत अशाच बुद्धीनें लक्षावधी लोक बडोद्याच्या एका भागांत एकत्र जमले आणि या जमलेल्या मंडळीच्या गर्दीमुळें व चेंदाचेंदीमुळें २९ इसम प्राणास मुकले व शेंकडो घायाळ झाले. आमच्या मतें पाहुणचाराच्या लढाया मारण्याची ही वेळ नव्हे. अगदीं साध्या व बिनखर्चाच्या मार्गानें देखील प्रेमभावाच्या भेटी व संभाषणें होऊं शकतील.

वरील पाहुणचाराच्या मोहिमे प्रमाणें दुसऱ्या छोटेखानी मोहिमा सरबराईच्या नांवानें सुप्रसिद्ध आहेत. स्थानिक अधिकारी आपापले इलाख्यांतून फिरतात तेव्हां सरबराईचें प्रस्थ अती मानलें असतें. कांहीं सुज्ञ व सुशील अधिकारी या सरबराईच्या प्रकरणांत अगदीं अलिप्त रहातात व दुसऱ्यांस सद्वर्तन शिकवितात. तथापि पुष्कळ अधिकारी चैनीही मारण्यास मागें पुढें पहात नाहींत. हल्लींच्या काळाला अधिकारी लोक लवाजम्यासह कमी फिरतील तितकें बरें. पण कांहीं स्थानिक बाबतींत दवऱ्यांची जरूरी असते आणि तेवढ्याच कार्यापुरती अधिकाऱ्यांची स्वारी खडी खडी प्रांतांत उपद्रव- रहित फिरेल असा बंदोबस्त सांप्रतच्या काळाला अवश्य झाला पाहिजे.

---

लष्करी खर्चाचा बोजा आमच्या प्रांतावर जसा आहे असा क्वचित्च अन्यत्र आढळेल. प्रांताच्या विस्ताराच्या मानानें वऱ्हाडावर ज्या लष्कराचा खर्च बसविला आहे तें ही कांहीं लहान सहान नाहीं. पांच पांचशें लोकांच्या चार घोडेस्वार पलटणी- ८९१ शिपायांची एक पलटण अशा ६ पायदळ पलटणी आणि ९२० गोलदाजांचा तोफखाना इतकें मोठें लष्कर हैदराबाद दरबारच्या संरक्षणासाठीं इंग्लिशांनीं ठेविलें आहे. १८६० च्या सुमाराला या लष्करचा खर्च सरासरी २४ लक्ष रुपये होत असे तो हल्लीं वाढत वाढत चालूं वर्षा करितां सुमोर ४२ लाखावर येऊन बसला आहे. ही प्रचंड रक्कम सालोसाल वऱ्हाड उत्पन्नांतून खर्च होत आहे ह्मणजे तिचा बोजा येथील लोकावर पडतो. निव्वळ शेतसाऱ्याचें उत्पन्न हल्लीं ६० लाखा जवळ आहे. त्या पैकीं ४२ लक्ष जर लष्करी खात्याकडे खर्च झाले तर प्रजेच्या वाट्यास व सुखसोइस किती रक्कम खर्चली जाते याचें निराळें स्पष्टी करण नकोच. जसा लष्करी खर्च बेताल आहे तसा प्रांतिक राज्यव्यवस्थेचा खर्च अती मोठा आहे. सर्व इंडियाभर वऱ्हाड प्रांतासारखा राज्यकारभाराचा खर्च कोठेंच आढळत नाहीं. खर्च असे वाढते चालविले आहेत कीं त्यांची भरती करण्यासाठीं, सरकारी करांच्या उत्पन्नाचें प्रमाण किती वाढवावें याचा कांहींच धरबंध उरला नाहीं. याचें कारण परकीय राज्यकर्त्यांचा अंमल हेंच होय असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. अस्सल इंग्रजी ज्या प्रांतांत आहे त्या पेक्षां ही आम च्या प्रांताची दशा अधिक कष्टमय आहे. लोकांच्या जवळ प्राण उरले नाहीं. शेतीचा धंदा नीट चालत नाहीं आणि इतर हस्तकौशल्याचे धंदे पार बुडाल्यामुळें सर्व शेतीवरतीच आपला चरितार्थ भागवूं इच्छितात अशा वेळीं वऱ्हाडच्या जमिनीवर सवाई दीढीनें सारा वाढत आहे ही गोष्ट बरी किंवा वाईट आहे अशी शंका घेण्यासही स्थल नसतांना सरकार शिरजोरपणा चालविते हें या प्रांताचें दुर्भाग्य होय.

---

गेल्या २९ वे तारखेस 'वऱ्हाड सार्वजनिक सभे'च्या आश्रया खालीं उमरावतीस प्रांतिक जाहिर सभा भरली होती. प्रांतांतून रेलवेच्या आसपासचे लोक बरेच गेले होते पण सभेच्या महत्वा प्रमाणें ग्रामस्थ प्रमुख लोक जसे जमावे तसे जमले नव्हते. सभेच्या प्रारंभी रा० रा० पांडुरंग गोविंद यांनीं अध्यक्ष या नात्यानें संभाषण केलें. पुढें रा० रा० मुधोळकर, जोशी, करंदीकर, केसकर, रानडेकर, लाहू रानजी इत्यादि वक्त्यांचीं भाषणें होऊन खालील ठराव सर्वानुमतें पसार झाले.:—

१ ला:—हल्लींच्या स्थितींत सरकाराकडे दाद मागणें जरूर आहे सबब सरकाराकडे या सभेनें अर्ज पाठवून त्या मध्यें खाली लिहिलेल्या सूचना असाव्या: (१) हल्लीं वऱ्हाड प्रांताची स्थिति अशी झाली आहे कीं दुष्काळ निवारणार्थ सरकारानें मजुरीचीं कामें सुरूं करणें अतिशय अगत्याचें आहे. विशेषें करून मेळघाट, अकोला बाळापूर, खामगांव, मुर्तिजापूर, मलकापूर, उमरावती, चांदूर या तालुक्यांत कामें उशीर न लागतां काढावींत. (२) दुष्काळासंबंधीं जो कायदा आहे त्या प्रमाणें ठिकठिकाणीं सरकल कमेट्या स्थापन कराव्या. (३) लोकांना तगाई बावी व हप्ते घेणें ते सवलतीनें घेणेचा ठराव व्हावा व कांहीं लोकांस तगाईचें व्याज अजीबात बंद करावें. (४) गरीब निराश्रित लोकांस फुकट अन्न वाटावें. (५) रिझर्व [बंदी जंगलें] गुरें चारण्याकरितां खुलीं करावींत आणि जळाऊ लांकडें, गवत वगैरेच्या डोक्यावरच्या ओझ्यावरचा कर माफ करावा. (६) नद्या व नाले यांचे कांठीं बंधारे व टाकीं पाण्यासाठीं बांधावीं. (७) ज्यांचीं शेतें पेरलीं गेलीं नाहींत. किंवा चार आण्याचे आंत ज्यास उत्पन्न झालें आहे त्यांस शेत सारा माफ करावा. (८) आठ आणे पिकवाल्यास साऱ्याची तहकुबी करावी. (९) नवे जमाबंदीचे दर यंदा अमलांत आणूं नयेत.

२ राः— वऱ्हाडांत हल्लीं जमिनीची पुन्हा मांजणी होत आहे तींत सारा न वाढविण्याबद्दल सरकारास अर्ज पाठवावा असा जो अकोल्याचे सभेंत ठराव झाला होता तो या सभेस सम्मत आहे व त्या अन्वयें अर्ज पाठविण्यांत यावा.

३ राः—जंगला संबंधानें सरकारचें जे नियम आहेत त्यांचा लोकांना फार त्रास होतो सबब हिंदुस्थान सरकारनें दोन वर्षांपूर्वीं जंगल खात्याच्या व्यवस्थेबद्दल जो ठराव केला त्या ठरावा अन्वयें लोकांस जास्त सवलती द्याव्या ह्मणजे गरीब लोकांचें व गुरांचें संरक्षण होईल.


The Berar Samachar

MONDAY DECEMBER 7 1896


"The Tapti Valley Railway" is now under construction. H. E. the Viceroy cut the first sod in a grand public ceremony at Surat on Monday last. This railway opens up some rich and fertile portions of the Gujarath and the Khandesh. The interior tracts of these two provinces will be brought in closer contact and communication with the province of Berar. This new channel of communication will increase the trade—facilities of our province and will open some new commercial centers in the Bombay presidency. This line runs through an important tract lying to the east of Surat. It will also necessitate the construction of some feeder lines. It will be the fore-runner of a number of other small railways. This railway is the more wel—come because it affords an opportune relief to the famine—striken people. It creates a vast field of labour and will surely be a blessing to the needy labourers.

The Tapti Valley Railway is founded on a new footing altogether. Its capital is raised in the Indian currency. There will be therefore no hardship on account of the exchange rates. The capitalists of the present working railways are Englishmen. They have subscribed in the goldcoin of the English currency and the Government of India having guaranteed a certain percentage of profit on the capital invested in railways have to make amends for the fluctuations of the exchange. But no such thing will happen in regard to this Railway. The credit of Government is very high and at a low rate of guaranteed interest the Government could raise ample funds in Rupee for the construction of this railway. This railway teaches another salutary lesson to the capitalists of India as to the best ways of investing their money. Its big capital has been subscribed to in the market of India. This is its most *welcome* feature from a number of stand—points: His Highness the Maharaja of Baroda has contributed almost one-fourth of the the capital and has practically set a noble example to be followed in all parts of the nation.

The Hindu of Madras raised some years before a question whether or not the Indian railways founded on the English capital is a blessing to India. Railways and telegraphs have no doubt annihilated distance and brought provinces after provinces in direct and immediate communication. The whole of the country presents a net-work of railways but in the enjoyment of all their advantages the learned editor felt a sigh at the fact that the best fruit of all these commercial activities goes to the coffers of the Englishman. We are glad that this 'Tapti Valley Railway' will make certain springs of wealth to run into the country itself. The project of a railway based on the India currency and on the capital raised in India is the greatest boon that the Government could confer on this nation and we hope similar efforts will be made in this direction when new railwas are to be started in India.

This suggest to us that the the scheme of the Akola Hingoli railway will be left more or less to *Native* adventure. But the guarantee of the Government induces investors of money to engage in such projects and leaves a margin for limited speculations in them. So it is necessary that the British Government should give the first helping hand to the promoters of a railway to run between Akola and Hingoli. But there is no call from the Government for public activities in this connection and no chances of a railway will crop up until a liberal offer comes direct from the Government itself.

The Commissioner has submitted an able report on the administration of the municipalies in the province for 1895—96 The report contains a brief summary of the finances of each municipality and of the some matters connected with its administration. Mr. Bullock thus speaks of our local Municipality:—

"23. *Akola*.—The financial condition of this Municipality is not at all satisfactory. The opening balance was Rs. 29,019 and the income of the year amounted to Rs. 50,308, making a total of Rs. 79,327. Of this sum Rs. 42,030 were expended, leaving a balance of Rs. 37,297 with a liability amounting to Rs. 1,19,700 at the close of the year; but, in addition to this, the heavy annual charges of water—works and the necessity of an expensive drainage scheme have to be considered. The estimate for the water—works appears to have been much miscalculated, and the control of the Public Works Department is a costly arrangement which the Municipal Committee can ill afford to bear; at any rate the committee will be constrained to increase its income by fresh taxation; but if the supply of water eventually proves sufficient, it will be a great sanitary protection to the town.

The principal sources of income during the year were:—

| | Rs. |
|---|---|
| (1) Markets and slaughter houses ......... | 13,850 |
| (2) Tax on trades & professions ... | 8,299 |
| (3) Surplus pound fund ... | 7,000 |
| (4) Rents of lands ... | 6,289 |
| (5) Sutta tax ... | 5,926 |
| *(6)* Scavenging tax ... | 3,789 |
| (7) Sale proceeds of land ... | 1,326 |

The chief items of expenditure are:—

| | |
|---|---|
| (1) Conservancy ... | 9,271 |
| (2) Repayment of loans ... | 6,300 |
| (3) Markets and slaughter houses ... | 5,369 |
| (4) Roads ... | 3,608 |
| (5) Education ... | 2,901 |
| (6) Arboriculture ... | 2,079 |
| (7) Water-supply establishment | 2,074 |
| (8) General administration ... | 1,063 |
| (9) Draining capital outlay ... | 1,067 |

It is evident that this town can afford to impose additional taxation, and no doubt it will have to be done; but the people dislike any sort of taxation and do all they can to avoid it.

An excellent report is sent by the Deputy Commissioner of Akola who mentions also Mr. D. G. Patwardhan as having done good work."

Let us note with caution and be prepared to meet the suggestion of new taxation the feasibility of which Mr. Bullock seems to point in rosy colors. We are glad to observe that Mr. Patwardhan D. G. has done excellently as an active and energetic Vice chairman of this municipality.

## वऱ्हाड

हवामान— गार वारा फार सुटतो. ऊन अतिशय तापतें आणि कधीं कधीं घाम येण्या इतकें उकडतें. पावसाची चिन्हें दुरावलीं आहेत. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

कापूस विकणाऱ्यात खोट्या वजनांनीं फसविल्याबद्दल राजश्री खटाव फरसूं, शेगांव यांस क्या० आयव्हर्स साहेबांनीं शिक्षा दिली होती ती सेशन कोर्टात कायम झाली. हें कळविंण्यास दुःख वाटतें. या प्रकरणाची माहिति प्रसंगानुसार आह्मी समग्र देणार आहों.

रा० रा० रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांची बदली अकोल्यास झाली होती ती तहकूब होऊन त्यांस दर्यापूरच्या कोर्टावर नेमण्यांत आलें.

रा. रा. हरीहर काशिनाथ पाटील, क्लार्क आफ कोर्ट, निसबत डेपुटी कमिशनर, उमरावती यांस ए० असि० कमिशनरच्या दर्ज्याची बढती देऊन त्यांस अकोला येथील कोर्टावर धाडण्याचा विचार आहे.

दुरुस्ती—'वऱ्हाड समाचार' पत्राचा अंक ४९ याच्या तारीख २३।११।९६ च्या पुरवणीवर रा. रा. गन्नूसिंग, व्हाईस चेअरमन, मुनसिपाल कमिटी, आकोट यांच्या सहीनें भंगीपट्टी संबंधानें जी इंग्रजी व मराठी जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. तिजमध्यें भंगीपट्टीचा ठराव "मुनसिपल कायद्याच्या कलम ४२ अन्वयें" झाला आहे अशा अर्थाची इंग्रजींत व मराठींत दुरुस्ती समजावी. हरकत दाखविणाऱ्यांनीं ३० दिवसांचे आंत अर्ज दाखल केले पाहिजेत.

'शोधक'—पत्र पोंचलें. पुण्याचीं वर्तमानपत्रें कांहीं ह्मणोंत पण रावसाहेब पटवर्धन यांची कारकीर्द त्याज्य होईल असा आपला झालेला ग्रह चुकीचा आहे. त्यांच्या उत्साहहम्ती त्यांच्या सत्कृत्यांचीं चिन्हें वऱ्हाडोद्यानांत सर्वत्र निदर्शनास आणीत आहे.

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९२ रुपये |
| जवारी | ९५ रु० |
| गहूं ( कांठे ) | १२० रु० |
| ,,( बनशी ) | १३०रु० |
| चणे | ० रु० |
| तेल ६॥– रु० मण | तूप ७ मण |
| सोनें | २६ तोळा |
| चांदी | ८७ |

### नोटीस

नोटीस बेशर्मी मोतीराम डालुराम मारवाडी राहणार कसबे लोणार प्रगणे लोणार तालुका मेहेकर जिल्हा बुलडाणे यासी सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे दुकानीं माझें गहाणखत रुपये ३०० चे मी लिहून दिले असोन सदर्हू गहाणखताचे फडीत मी तुह्मास सन १३०३ व सन १३०४ फसली दोन सालचा माल किंमत रुपये २९० चा व सन १३०५ सालीं नगदी रुपये १९० एकूण रुपये ४०० याप्रमाणें गहाणखतात वसूल दिले असोन सदर्हू रुपये वसूल दिल्याबद्दल तुह्मास पावती मागत असतां पावती दिली नाहीं, तुह्मी सांगितलें कीं माझे रुपये गहाणाचे फिटले तुह्मास एक दोन दिवसांत दस्ताऐवज काढून देईन. नंतर दोनचार वेळां मी तुह्मास दस्ताऐवज मागण्यास आलों असतां तुह्मी माझा दस्ताऐवज देत नाहीं व पावतीही देत नाहीं, ह्मणून अखेर मी तुह्मास टपाल मार्गें तारीख १७ सप्टेंबर सन १८९६ इसवी रोजीं नोटीस दिली कीं तुह्मी पोंहोंचलेल्या मालाची व रुपयाची पावती द्यावी अगर माझा दस्तैवज मजला परत द्यावा, व तुह्मी हिशेब दाखवून तुमचे कांहीं देणें फिरत असल्यास तुह्मी घ्यावे अगर माझे कांहीं फिरत असल्यास मजला द्यावें. याप्रमाणें करण्यास तुह्मास ८ दिवसाचे मुदतीची नोटीस दिली असतां तुह्मी त्याजबद्दल आज तारखेपावेतों कांहींच केलें नाहीं करितां या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं, तुह्मास दिलेल्या मालाबद्दल व रुपयाबद्दल ही नोटीस पावल्या तारखेपासून ८ आठ दिवसाचे आंत मजला पावती, वरील मालाबद्दल व रुपयाबद्दल द्यावी तसें न केल्यास हीच नोटीस पावती समजली जाईल व पुढें मार्गें फिर्याद केल्यास कोणत्याहीं प्रकारें मी जबाबदार होणार नाहीं व फिर्यादीचा खर्च व व्याज तुह्मास मिळणार नाहीं माझा वरील वसूल जातां जी योग्य रक्कम १९० रुपये अखेरचे दिल्या तारखेस देणें निघत असेल तेवढे आज देण्यास मी तयार आहें व दोन्ही नोटिशीचा खर्च तुमचेकडून भरून घेतला जाईल व रीतिप्रमाणें गहाण सोडविण्याचा दावा तुमचेवर केला जाईल कळावें तारीख १९ नोवेंबर सन १८९६ इसवी.

सही
सही कडतु वा॥ जयसिंग तिरे
राहणार कुंडलस प्रगणे
लोणार ता. मेहेकर
मुक्काम मेहेकर

### वर्तमानसार.

सोलापूर जिल्ह्यांत बंदोबस्ताकरतां पोलिसांत १० लोकांची नवी भरती केली व त्यास रोज =३ देणार !

## माहीमचा बडा दंगा

किंबेक सरकारी कामदारांस चोपलें. सरकारी कागदपत्र जाळलें. जंगलाची मोकळीक दिली आहे, ताडांची लागवड करून फुकट ताडी घ्यां, एक आणा शेर प्रमाणें दारू घ्या, एक आणा पायली मीठ घ्या, सवा रुपया फरा भात घ्या, सावकारांकडच्या तुमच्या जमिनी तुह्मास परत देवूं, अशा प्रकारच्या कित्येक बाबींबद्दल डिस्ट्रिक्ट डेपुटी कलेक्टर यांजपासून छापील कागदांवर करार लिहून घेतले!!

गेल्या सोमवारी ठाणे जिल्ह्यांतील पालघर स्टेशनाजवळ माहीम येथें मागेले, कोळी, वारली, वगैरे जातीच्या सुमारें २००० लोकांनीं फार भयंकर असा दंगा केला. प्रांतांचे साहेब ह्मणजे अॅक्टिंग डि, डे. कलेक्टर मि. नावर याचीं स्वारी तेथें गेली असून पालघर स्टेशनाजवळच्या बंगल्यांत उतरली होती. सोमवारीं सकाळीं मि. नावर हे पिकांची पाहणी वगैरे करण्याकरतां बाहेर फिरावयास गेले होते. सुमारें ११ वाजतां परत येऊं लागले तों वरील आडाणी जातींचा १०००। ९०० लोकांचा जमाव दिसूं लागला. मि. नावर याच्या मनांत त्याबद्दल प्रथम कांहीं वाईट कल्पना आली नसावी, कारण ते त्याबद्दल कांहीं जास्त विचार न करितां तसेंच मकाणावर आले व भोजनविधी उरकण्याच्या विचारास लागले. इकडे लोकांचा हा जमाव वाढतच चालला. इतक्यांत फौजदारही तेथें आले. १२ वाजण्याच्या सुमारास लोकांचा जमाव फार मोठा झाला व त्यांणी डि. डे. कले. मि. नावर यांच्या बंगल्यांत शिरण्याचा यत्न चालूं केला. दोघातिघां पोलिस शिपायांनी त्यास हरकत केली, दंगेखोरांनीं त्यास थोडेबहुत बक्षिस दिले व येथें चित्रासारखे हात जोडून उभे राहा अशी त्यास ताकीद केली. पोलिसास चित्रा सारखे उभे करून ते पुढें येतात तों दोघे मुलकी शिपायी पुढें आले त्यांसही थोडथोडें बक्षीस देऊन वाटेस लावल्यावर ते बंगल्याच्या जिन्यानें बंगल्यावर जाऊं लागले. फौजदार जिन्यांत हरकत करूं लागले, तेव्हां त्यांसही खूप चोपलें. मि. नावर यांचा आचारी मागच्या जिन्यानें वर जाण्यास हरकत करूं लागला ह्मणून त्यासही चोपलें. अर्थात ते लोक सुमेरसिंगाच्या गार्द्यांप्रमाणें, बंगल्यांत व बंगल्याच्या माडीवर भरले. त्यांची समजूत करण्याचा त्यांस हरकत करण्याचा व दटविण्याचा मि. नावर यांणी स्वता पुष्कळ यत्न केला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्या लोकांनीं आंत शिरून मि. नावरच्या कचेरींतल्या कारकून वगैरेंसही चोपलें, तेव्हां मि. नावर एका खोलींत बसले. लोक दार फोडूं लागले तेव्हां ते आपण होऊन बाहेर आले व तुम्हास काय पाहिजे तुमचें काय ह्मणणें आहे, अर्ज द्या, मी तजवीज लावतो वगैरे प्रकार सांगून त्यांची समजूत करूं लागले. या धांदलींत कांहीं लोकांनीं त्यांच्यावरही सोटे मारण्याचा यत्न केला, पण त्यांतल्याच ५।४ लोकांनीं मि. नावर ज्या खुर्चीवर बसले होते त्यावर पडून इतिहास प्रसिद्ध बापाजीप्रमाणें ते सोटे आपल्या पाठीवर घेऊन मि. नावर यांचा बचाव केला. काय पाहिजे वगैरे विचारण्यास लोकांनीं जे जबाब दिले त्यांत जंगल अगदीं मोकळे पाहिजे, ताड लागवडीचा कर न घेतां फुकट ताड वाहून ताडी खाण्याची मालकीक पाहिजे. दारू एक आणा शेर प्रमाणें मिळाली पाहिंजे, मीठ एक आणा पायली मिळाले पाहिजे, भात सवा रुपया फरा मिळाले पाहिजे, आमच्या जमिनी ज्या सावकारानीं खाल्लया आहेत त्या सरकारानें सोडवून आमच्या आह्मास दिल्या पाहिजेत, अशा प्रकारच्या कित्येक मागण्या केल्या. यांतील एकही मागणी पुरी करण्याचे मि० नावर यांच्या हातातच नसल्यामुळें, तुमच्या या मागण्या देण्याचें माझ्या हातांत नाहीं, तुह्मी अर्ज द्या ह्मणजे मी आपल्या शिफारशीसह आपल्या वरिष्ठाकडे पाठवितो, पाहिजे तर माझ्या कारकुनास सांगा ह्मणजे ते अर्ज लिहितील अशा प्रकारें त्यांस सांमण्याचा मि० नावर यांनीं पुष्कळ यत्न केला, पण त्यावरून ते जमलेले लोक शांत न होता अधिक खवळले. अशा थापा पुष्कळ वेळ झाल्या आतां आह्मी त्या ऐकत नाहीं. आह्मांस आमच्या ह्मणण्या प्रमाणें आतांच्या आतां हुकूम पाहिजे असा त्यांनीं आग्रह चालविला. शेवटीं हो ना करतां करतां त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें करण्याचें मि० नावर यांस भाग झालें असावें, कारण त्यांनीं तसा लेखी हुकूम देण्याचें कबूल केलें. एक कागद घेऊन लिहिण्याची सुरुवातही केली! इतक्यांत त्यातल्या कांहीं लोकांनीं ओरड केली कीं, अरे साध्या कागदावर हुकूम काय कामाचा? टिकीट लाऊन घ्या, लागलीच टिकीट लाऊन मागण्याचा सगळ्यांनीं आग्रह धरला, माझ्या जवळ टिकिट नाहीं असें सांगण्यांत आल्यावरून आह्मी टिकीट आणतो असें ह्मणून कांहीं लोक टिकीट आणण्यास गेले इतक्यांत पुन्हा ओरड झाली कीं, टिकीट लावलेला हुकूम कांहीं उपयोगाचा नाहीं, छापील कागदावर ५।६ प्रती लिहून घ्या, लागलींच लोकांनीं छापील कागद आणले व त्यांवर मि० नावर यांजपासून तसें हुकूम लिहून घेतले! हे हुकूम त्याच्या हातीं आल्यावर जमलेले सर्व लोक शांत झालें व तेथून माहीम येथें निघून गेले. हा इतका प्रकार होण्यास सुमारे ४।५ वाजले व त्याच्या दरम्यान एका वेळी मि० नावर यांच्या आफीसांतल्या खुर्च्या व कागदपत्र हें सर्व आग लाऊन जाळून टाकले.

नंतर हे सर्व लोक जे तेथून निघाले ते माहिमास आले व प्रथम दांडेकराच्या घरावर जाऊन सवा रुपया प्रमाणें भात टाक असें ह्मणूं लागले. अरे, भाताचा भाव सवा रुपया नसून जास्त आहे अशी तक्रार केल्यावरून, हा पहा, सरकारानें छापील कागदावर हुकूम दिला आहे, आतां सवा रुपयानी देतोस कीं नाहीं. सांग. असें धमकावून ह्मणूं लागले, कारकून शिपाई हाजर नाहींत ते आल्यावर या असा जबाब मिळाल्यावर ते तेथून निघून एका वाण्याच्या दुकानीं गेले. व तेथेही सरकारचा हुकूम दाखवून एक आण्यानें पायली मीठ मागीतले नंतर ते एका दारूच्या दुकानी गेलें. तेथेंही सरकारच्या हुकूमाचीं धमकी दाखवून एक आणा शेर प्रमाणें बरीचशी दारू घेतली! आणि ती झोकल्यावर आपआपल्या घरीं निघून गेले व सर्व शांतता झाली. सरकारतर्फेची माहिती अजून समजली नाहीं.

अशा प्रकारची दंगल झाल्याची तार आल्यावरून सोमवारी रात्रीं ठाण्याहून कांहीं पोलिसही गेले. डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट मि. क्यांडी हे त्या दिवशीं भिवंडीस होते. व ती तार त्यांजकडे जातांच तेही माहीमास निघून गेले दंगेखोराची धरपकड चालली आहे व पुढें काय काय होतें हे पाहाणें आहे.

येणेंप्रमाणें माहीमच्या दंग्याची समजलेली हकीकत वर दिली आहे. त्यानंतर तिकडून आलेल्या पत्रावरून समजतें कीं, हे जमून आलेले लोक ताडीची मालकीक मागण्याकरतां आले होते व शांतपणानें अडचणी सांगून दाद मागण्याचा त्याचा इरादा होता पण फौजदार व पोलीस यांनीं सोटे चालू करून लोकांस हाकून लावण्याचा यत्न केल्यामुळेंच लोक निकरावर आले, व फौजदारास चोपण्याचाच प्रथम आरंभ केला. त्या हकीकतींत सांगितल्याप्रमाणें मि० नावर यांचा तो हुकूम घेऊन गेल्यावर तो झूट आहे असें त्या लोकांस समजलें. त्यावरून ता० २५ रोजीं पुन्हा सुमारें ५ हजार लोक जमून आले; पण मि० नावर यांनी पुढें येण्याची बंदी केली व परत कां आला असे विचारलें. तेव्हां ताडी खाण्यास ताड सुटे करा असें लोकांनीं मागणें केले. सगळे न येतां थोडे लोक पुढें या असें सांगण्यांत आले पण लोकांस बरें न वाटून सगळेच पुढें येऊं लागलें, त्यावरून त्यांच्यावर, छऱ्यांचे आवान केले, ४०।५० जखमी झाले व लोक भिऊन निघून गेले एका जंगलच्या शिपायानें गोळ्या घालून दोघा कोळ्यांस ठार केलें असेंही तिकडून आलेल्या पत्रांत लिहिलें आहे. सर्व कची हकीकत सरकारमार्फत प्रसिद्ध होईल तर फार चांगलें होईल.

शुक्रवार ता० २६ रोजींही माहिमास फार लोकांचा जमाव झाला होता व त्यांनीं फार सलोख्यानें आपली दाद लावण्याबद्दल मि० नावर यांस विनंती केली असें सांगून एक गृहस्थ लिहितो कीं, आमची दाद लागून निर्वाहाची सोय करण्याकरतां खुद्द कलेक्टर साहेबांस किंवा गव्हरनरसाहेबांस येथें बोलवा तोंपर्यंत आह्मी येथें बाहेर पडून राहूं. दंगा करीत नाहीं वगैरे कळविले. जंगल शिपायाच्या गोळीनें जे २ कोळी ठार झाले त्याबद्दल हे गृहस्थ लिहितात कीं मात्र याप्रसंगी एक भयंकर परीणाम झाला तो असा कीं, जमाव होता त्या ठिकाणापासून अगदीं आड वाटेला एका वाडवळाचे वाडींत २ कोळी पाहुण, बैल किंवा पेंढा घेण्याकरतां आले होते, त्यांस जंगलखात्याचे एका शिपायानें गोळी घालण्याचा हुकूम झाला इतक्या जोरावर कारण नसतां व ते लोक पाया पडत असतां व जमलेल्या लोकांशीं आमचा संबंध नाहीं, पाहिजे तर कचेरीत न्या, पण मारूं नका ह्मणून ज्याकडे ते केवळ कामासाठींच आले होते तो व ते दोघे हात जोडून सांगत असतां गोळी घालून त्यांचे तत्काळ प्राण घेतलें. हा गुरुवारचा प्रकार झाल्यावर पुन्हा शुक्रवारीं दुपारीं १२ वाजतां सुमारे तीस मागेले दप्तर जाळलें या आरोपावरून अ० पो० सु० मि० ओम्यानीं यांनीं प्रत्यक्ष अशा पुराव्याचे जोरावर सातपाटी कडून कैद करून आणले आहेत व यामुळेंच कीं काय कोण जाणे सुमारे ५।६ हजार मागेले समुद्रावर जमले आहेत. काय होते तें पहावें. पण एकंदर गांवचे श्रीमान, गरीब लोकांस भीतीस्पद असा काळ येऊन ठेपला आहें अशा समयीं कलेक्टर साहेब यांनीं स्वतां येऊन अथवा सरकारांत लिहून योग्य ती या सर्व चवताळलेले लोकांची समजूत होईल अशीं तजवीज त्यास हव्या त्या युक्तीप्रयुक्तींनें देऊन करावी हेंच न्यायाचे व येथील रयतेचे रक्षणासाठीं पहिलें महत्वाचे काम आहे. इहाणूस हीच ओरड आहे. बहुतेक ही पट्टी फार चवताळली आहे व याचा बरा वाईट परिणाम शेटसावकार व सुखवस्तु रयतेवर विनाकारण न घडे असें सरकारचें कडून घडून आले ह्मणजे जास्त कांहींच नको आहे.

सिंध मधून धान्य पंजाबांत आणण्याचें त्या रेलवेने कमी केलेलें भाडें मागच्या आठवड्या पासून अमलांत आलें.

चिपळून, रत्नागिरि, संगमेश्वर, राजापूर वगैरे ठिकाणी या दिवसात घाटावरून धान्य यावयाचे त्याच्यावदला हल्लीं तेथूनच घाटावर जात आहे व त्यामुळें धान्य, पाणी व चारा यांच्या संबधानें काय प्रकार होईल याची लोकांस काळजी लागली आहे.

बऱ्हाणपूरच्या लोकांनी गरीबांस स्वस्त धान्य देण्याकरतां वर्गणीनें १०,००० रुपये जमविले

नगर जिल्ह्यातील गुरास सरकारी जंगल करून दिलें.

दुष्काळामुळें आपल्या नोकरांस कोणत्याही प्रकारची रजा द्यावयाची नाहीं असें बंगालसरकारानें ठरविलें आहे.

वायव्य प्रांतांत दुष्काळकामावर सुमारें एक लाख माणसें होतीं. ठा. अ.


## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken Agent


हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास .................... ०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........ ०१ ०६
दुसरे खेपेस ............ ०१

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as 5
Six monthly......... 3 ...... ... ...„ 8 as
Single copy ............... ....... ... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXX | AKOLA MONDAY 14 DECEMBER 1896 | NO 48

वर्ष ३० | आकोला सोमवार तारिख १४ माहे डिसेंबर सन १८९६ इ० | अंक ४८

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken Agent

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध १० शके १८१८

## प्राथमिक शिक्षण

( रा. रा. गणेश रामचंद्र दामले. बी. ए. यांनीं लिहिलेला )

नंबर २

आतां आपण वऱ्हाडच्या लोकस्थितीचा विचार करूं, आपल्या या प्रांतांत शेतकरी लोकांचाच भरणा फार आहे. मुख्य उप्तन्न शेतीचें. बहुतेकांचा उदरनिर्वाह शेतीवर ह्मणून मुख्य धंदाही तोच. करितां ज्या शिक्षणाच्या योगानें हा धंदा जास्त फायदेशीर कसा करावा व ह्यामध्यें सुधारणा कशी करावी हें लोकांस कळूं लागेल आणि ज्या शिक्षणाच्या योगानें शेतकरी लोकांचीं मुलें शेतकाम करण्यास निरुपयोगी न होतां जास्त उपयोगी होतील अशा प्रकारचें शिक्षण या प्रांतांतील लोकांस दिलें पाहिजे. आमची ही सध्यांची शिक्षणपद्धति शेतकरी लोकांस फारशी फायदेशीर होत नाहीं. यांनां सोयीवार अशी शिक्षणपद्धति सुरु केल्या शिवाय आमच्या शाळा फारशा लोकप्रिय होणार नाहींत. आह्मीं शाळेंतून उपयुक्त असें शिक्षण सुरू केल्या शिवाय शिकणाऱ्या मुलांची संख्या वाढावयाची नाहीं व प्रांतांतील शाळांची संख्याही वाढणार नाहीं. ज्या शाळमध्यें कुराण शिकविलें जात नाहीं किंवा उर्दू भाषेंतून शिक्षण दिलें जात नाहीं त्या शाळा आपल्या करितां नव्हत अशी ज्या प्रमाणें मुसलमान लोकांची वेडगळ समजूत आहे तशाच प्रकारची साधारण या शेतकरी लोकांची समजूत आहे. कारण त्यांच्या धंद्यामध्यें अवश्य लागणारी अशी एकही गोष्ट आपल्या शाळेंत शिकविली जात नाहीं एवढेंच नव्हे तर उलट त्यांचीं मुलें आपल्या शाळेंत ४।५ वर्षें राहून शेतकीच्या रांकट कामाला निरुपयोगी मात्र होतात. ह्मणून हा शिक्षण क्रम सुधारला पाहिजे. सध्याचा शिक्षणक्रम सुधारण्याचीं कारणें अशीं आहेत. सध्यांच्या शिक्षणानें मुलाची शारिरिक किंवा मानसिक उन्नति व्हावी तशी होत नाहीं. या शिक्षणानें मुलांस कोणताही पोट भरण्याचा स्वतंत्र धंदा करण्याची ताकद येत नाहीं. या शिक्षणामुळें सर्व स्थितींतील व धंद्यांतील लोकांचे मनाचा कल नोकरीकडे असतो. हल्लींच्या शिक्षणाचा व्यवहारांत मुळींच उपयोग होत नाहीं. आणि उद्योगधंदा व कलाकौशल्य यांस अगदींच फाटा मिळाला आहे. ही स्थिति सुधारण्या करितां निरनिराळ्या स्थितींतील व धंद्यांतील मुलांस, सोयीचें, उपयुक्त आणि व्यक्तिपरत्वें विद्यार्थ्यांच्या मनाचा कल पाहून शिक्षण देतां येईल अशी व्यवस्था व्हावी. हें निरनिराळ्या प्रकारचें शिक्षण देण्याकरितां स्थलपरत्वें निरनिराळ्या प्रकारच्या शाळा पाहिजेत. उदाहरणार्थ वऱ्हाडचा जो जंगली भाग आहे त्या भागांतील गरिब लोकांच्या मुलांस शेतकीचें व जंगला संबंधाचें ज्ञान करून देण्याची शाळेंत व्यवस्था झाली पाहिजे. व जो बिनजंगली भाग आहे त्या भागांतील केवळ शेतकीवर उदर निर्वाह करणाऱ्या लोकांच्या मुलांस निदान शेतकीचें ज्ञान तरी अवश्य करून दिलें पाहिजे ह्मणून शाळांची व्यवस्था अशी असावी.

ज्या खेड्यामध्यें निदान वीस मुलें शिकावयास मिळण्यासारखीं असतील, अशा खेड्यामध्यें देखील शाळा असावी. ती चांगली सोयीची, स्वच्छ व प्रशस्त असावी, ती चांगल्या मोकळ्या व स्वच्छ हवेंत बांधलेली असावी तिच्यामध्यें निरनिराळ्या ईयत्तेकरितां निरनिराळ्या खोल्या असाव्या. तेथें शिकविली जाणारी जी यत्ता असेल तिला नेमलेले जे धडे असतील ते शिकविण्यास जरूर लागणाऱ्या सर्व वस्तु त्या खोलीमध्यें ठेविलेल्या असाव्या. आपलीं मुलें जगांत शिरल्यावर वेड्यासारखी होतात याचें कारण त्यांना व्यवहारज्ञान मुळींच नसतें हें होय.

जें कांहीं शिक्षण दिलें जातें, तें सुद्धां पदार्थ पुढें मांडून दिलें जात नाहीं यामुळें मुलांना खेर ज्ञान झालें किंवा नाहीं, हें समजण्यास कांहींच मार्ग रहात नाहीं, ह्मणून पुष्कळ वेळां शिक्षक लोकांना मुलांच्या तोंडातून शब्द निवतात त्यांजवरच भरंवसा ठेवावा लागतो. आणि बऱ्याच मुलांना देखील, शिकविलेल्या वस्तुचें हुबेहुब चित्र डोळ्यापुढें पहावयास सांपडत नाहीं ह्मणून शिक्षकाच्या तोंडचे शब्द पोपटाप्रमाणें तोंडपाठ करून आपल्या स्मरणशक्तिवर भरंवसा ठेवावा लागतो. करितां पदार्थांचें चित्र पुढें मांडून शिक्षण देतां येईल तर मुलांच्या मेंदूवर कमी बोज्जा पडेल आणि त्यास पुष्कळ गोष्टी लवकर कळतील ह्मणून असे अवश्य लागणारे पदार्थ प्रत्येक खोलीमध्यें ठेविलेले असावे. हें शाळेच्या अंतरंगा विषयीं झालें.

आतां शाळेच्या बहिरंगा विषयीं शाळेच्या सभोंवार लहान मोठे बागबगीचे असावेत तसेंच शाळेला लागून एक मोठें विस्तीर्ण पटांगण असावें व तें सर्व मुलांस त्यामध्यें एकदम खेळतां येईल इतकें मोठें असावें. शाळागृह एकवेळ साधारण असलें तरी चालेल परंतु ही खेळाची जागा अवश्य चांगली असली पाहिजे. या खेळाच्या जागीं मुलांना आट्यापाट्या, खोखो, चेंडुदांडू, क्रिकेट, फूटबॉल, रज्युयुद्ध किंवा टगआफ वॉर व ड्रील अशा प्रकारचे खेळ खेळण्यास शिकविलें जावें. हे बाहेरचे खेळ खेळल्यानें मुलांच्या अभ्यासाची नुकसानी होईल अशी भिती बाळगण्याचें कारण नाहीं. मात्र खेळाची यत्ता ठरविलेली असावी व त्यावेळीं सर्व मुलांना शिक्षकांनीं आपणा समक्ष खेळावयास लावावें. पत्ते, गंजिफा, यांच्या सारखे बैठे खेळ मुलांस अगदीं खेळूं देऊं नये; असे खेळ खेळणारास शिक्षा केली जावी. परंतु बाहेरचे मर्दानी खेळ खेळणें हें मुलांस फारच हितावह आहे; ह्या खेळाच्या योगानें मुलांचीं शरीरें भराभर वाढतात; तीं तरतरीत बुद्धीचीं आणि आंगानें चपळ अशीं होतात.

पुष्कळ ठिकाणीं लहान मुलांस संध्याकाळीं खेळण्याची कांहींच सोय नसते. मुलांना सांयकाळपावेतों शाळेमध्यें बसवितात आणि खेळा करितां सवड अगदींच दिली जात नाहीं. मुलगा घरी जातो, तों त्यांस दुसऱ्या दिवसाचे धडे तयार करावयाचे असतात. कित्येक मुलें घरची इतकीं गरीब असतात कीं त्यांना रात्रीं वाचावयास दिवा सुद्धां मिळत नाहीं. आणि धडे तयार झालें नाहींत तर शिक्षक मारतील अशी भिती असते ह्मणून त्या बिचाऱ्यास घरीं गेल्यावर धड जेवण सुद्धां सुचत नाहीं या मुळें कित्येक मुलांस अगदीं दिसेनासें होईपर्यंत अभ्यास करावा लागतो. यामध्यें घोक्यांचेंच काम फार असतें. लहान मुलांस खेळ फार अवश्य असतो. परंतु त्याला या प्रमाणें अगदींच फाटा बसतो पूर्वींच्याकाळीं मुलांना नमस्कार वगैरे घालावे लागत परंतु परकीयांच्या सहवासानें, आणि आमच्या सध्याच्या विधर्मी शिक्षणपद्धतीनें आमचें जुनें होतें तें सर्व गेलें. त्या ठिकाणीं नवीन गोष्टीची योजना झाली पाहिजे. संध्याच्या आपल्या शिक्षण पद्धतीमध्यें हा मोठा दोष आहे कीं, आपण फक्त मनाचीच काळजी घेतो. शरिराची काळजी घेतली जात नाहीं. शारिरीक शिक्षणा संबंधानें आपलें फार दुर्लक्ष होत आहे शरीर जर बळकट व मजबूत करण्याची काळजी घेतली नाहीं तर बुद्धीचीही वाढ होणार नाहीं. ह्मणून ज्या प्रमाणें प्रत्येक यत्तेला अभ्यास क्रम आहे त्याप्रमाणेंच प्रत्येक यत्तेच्या मागें शारीरिक शिक्षणाची यत्ता ठेवावी. उदाहरणार्थ पहिले यत्तेला एकदम बारा नमस्कार किंवा जोर ठेविले तर दुसरे यत्तेला २० तिसरीला पंचवीस या प्रमाणें ठेवावे. हें प्रमाण किती वाढवावें व कोठें थांबावे हें नक्की सांगतां येणें कठीण आहे. परंतु आपण बखरी मध्यें वाचतो कीं सदाशिवराव भाऊ व बापू गोखले यांच्या सारखे पुरुष दररोज बाराशें नमस्कार घालीत असत. त्या वरून असें वाटतें कीं, वीस वर्षांच्या मुलाचें हें प्रमाण वाढवीत शंभरां पर्यंत नेण्यास हरकत नाहीं कांहीं मुलांस नमस्कार पसंत पडणार नाहींत तर त्या ऐवजीं जोर ठेवावेत. ही एक गोष्ट झाली. या प्रमाणेंच नियमित अंतर लवकर चालून येणें, उडी लांब व उंच मारणें हातानें चेंडू दूर फेंकणें उंच व लांबून फेकलेला चेंडू झेलणें, नेमानें चेंडू किंवा दगड मारणें, आट्यापाट्यामध्यें कोंडी फोडून जाणें किंवा पाटीतून खेळून जाणें, क्रिकेटच्या डावा मध्यें बोलींग चांगलें करणें, ज्यास्त रन्स करणें, दांडपट्टा खेळणें इत्यादि खेळांच्या प्रकारां पैकीं कांहीं मुलांच्या वयाला अनुरूप होतील असे खेळ प्रत्येक यत्तेला ठेविले जावेत.

मुलांची वाढ १६ वर्षां पर्यंत फार लवकर होत असते करितां या वया पावेतों ज्या खेळांनीं त्यांच्या वाढीला मदत होईल असें धांवण्याचे खेळ असावेत. आणि १६ वर्षांच्या पुढें जेणें करून त्यांचीं शरीरें कसतील असे खेळ शिकविण्यास आरंभ करावा.

शाळेमध्यें दिले जाणाऱ्या शारिरक शिक्षणावर देखरेख गांवांतील प्रमुख मंडळीकडे असावी आणि त्यांनीं वर्षांतून चार वेळ एकत्र जमावें आणि शाळेंतील विद्यार्थ्यांचें शारीरिक शिक्षणामध्यें पाऊल पुढें पडत आहे कीं नाहीं हें पहावें. या तिमाहीच्या शारिरिक शिक्षणाच्या परीक्षेमध्यें गांवकरी लोकांनीं कांहीं बक्षिसें ठेवून मुलामध्यें लहान सहान शर्यती लावाव्या या योगानें त्यांच्या मनामध्यें चढाओढ करण्याची इर्षा उत्पन्न होईल. खेळतां खेळतां शिक्षकाला कांहीं नीतितत्वें शिकविण्याची संधी सहज आणतां येईल. उदाहरणार्थ रज्जु-युद्धाच्या खेळानें एकीचें तत्व समजून सांगण्याची

संधी सहज आणितां येईल. चार किंवा पांच लहान लहान मुलांच्या एकीनें एक बळकट मुलगा सहज ओढला जातो, या वरून सर्व गांवच्या, जिल्ह्याच्या, व प्रांताच्या एकीनें केवढी मोठमोठीं कामें करितां येतील हें त्यांस समजून सांगतां येतील. अशा प्रकारें जेणें करून त्यांची शारीरिक व मानसिक उन्नति बरोबर होईल, जेणें करून त्यास एकत्र जमण्याची ज्यास्त संवय होईल व कोणतेंही काम एकीनें करण्याकडे त्यांच्या मनाचा कल होईल अशा प्रकारचें वळण मुलांना लागेलसें करणें हें आपलें कर्तव्य कर्म आहे. आपल्या मुलांना शिक्षण देते वेळीं आपली दृष्टी दूरवर असावी. आजचे मुलगे उद्यांची प्रजा व पुढारी लोक आहेत. त्यांची जशी शक्ती वाढवावी तशी सर्व राष्ट्राची शक्ती वाढेल. सध्याचे काळीं आपल्या मुलांचे अंगीं जें धैर्य, साहस, व हिंमत इत्यादि अमोलिक गुणांचे निसर्गतः अंकूर असतात त्यांची वाढ होण्यास शाळेच्या पटांगणा शिवाय दुसरें ठिकाण राहिलें नाहीं. करितां या अंकुराची जशी वाढ होईल त्या मानानें आपल्या राष्ट्राचें धैर्य, हिंमत व साहस वाढेल. ह्मणून मानसिक शिक्षणा बरोबर या शारीरिक शिक्षणाचीहि फार काळजी घेतली पाहिजे. व या शारीरिक शिक्षणाच्या कांहीं तरी यत्ता ठरवून त्यांना इतर अभ्यासाच्या अगदीं शेजारी स्थळ दिलें पाहिजे.

आपल्या देशामध्यें अजून समाज स्थापून खेळण्याची संवय फारशी झाली नाहीं. पाश्चात्य राष्ट्रामध्यें याचा फारच प्रचार आहे तो इतका कीं अलीकडे या खेळांनां राष्ट्रा-राष्ट्रांच्या लढायांचेंच स्वरूप प्राप्त झालें आहे. एखादा इंग्रज कितीहि ह्मातारा झाला असला तरी त्याला भर दोन प्रहरीं खेळाच्या मैदानांत उभे राहण्यास लाज वाटत नाहीं. आपले लोक जर या प्रमाणें खेळूं लागतील आणि जिल्ह्या जिल्ह्याच्या, प्रांता प्रांताच्या आणि शेवटीं देशा देशाच्या अशा खेळाचे रूपानें लढाया होतील तर त्या योगानें लोकांमध्यें एकी होण्यास एक जास्त साधन होऊन, देशांतील लोकांची शरीर—प्रकृति सुधारण्याचे कामीं ही मोठी मदत होईल. परंतु आपल्या लोकांना अद्यापि अशा खेळांची गोडी लागली नाहीं. ह्मणून लहान मुलांना खेळतांना पाहून त्यांना आनंद होत नाहीं आणि कधींही न खेळणारा मुलगा ह्मणजे चांगला मुलगा असें ह्मणण्याचा परिपाठ. इमरसन साहेब ह्मणून एक प्रसिद्ध अमेरिकन गृहस्थ आहेत--ते आपल्या English traits नामक पुस्तका मध्यें एके ठिकाणीं इंग्लंडांतील मुलां विषयीं अशा अर्थाचें वाक्य लिहितात—तीं मुलें मला खेळावयाच्या पटांगणामध्यें क्रूर वाघाप्रमाणें दिसलीं. आपलीं मुलें या वाघा पुढें खरोखरच मेंढ्या प्रमाणें दिसतील. याचें कारण पुष्कळ अशीं आपल्या मुलांवर असलेलें अभ्यासाचें ओझें, त्यांना लहानपणीं आईबापांचा व शिक्षकांचा फाजील धाक, आणि खेळण्याविषयीं सक्त मनाई इत्यादि गोष्टी होत. हिंदुस्थानांतील मुलें शाळेंतून बाहेर पडल्यावर अनागळ होण्यास जीं कांहीं कारणें आहेत त्यापैकीं त्यांच्या दुबळे ज्ञानाप्रमाणें त्यांचें शरीर सामर्थ्यही दुर्बल असतें हें एक आहे ह्मणून आपल्या शिक्षणाचा पाया शारीरिक शिक्षणावर उभारलेला असावा. शारीरिक शिक्षण हें सर्व शिक्षणाचें प्रधान अंग मानिलें जावें. परीक्षकांचें लक्ष मुलांच्या अभ्यासाकडे असतें त्या प्रमाणें शारीरिक शिक्षणाकडेही असावें व दोन्ही विषयांना सारखे मार्क ठेविले जावे ह्मणजे शिक्षक लोक सुद्धां शारीरिक शिक्षणाची योग्य काळजी घेत जातील.

(पुढें चालेल)

---

राष्ट्रीय सभे निमित्त ज्या प्रांतिक निवडानिवडी होत असत त्या अद्याप झाल्या नाहींत आणि एका प्रकारची शिथिलता व आदासिन्य पसरलें आहे असें वाटतें. सार्वजनिक गोष्टींत आमचा प्रांत मागसलेला आहे. राजकीय वाद विवादांत वऱ्हाड प्रांताविषयीं कधींच प्रश्न निघत नाहीं आणि येथील राज्यव्यवस्थेच्या चमत्कारिक व पृथक् कारभारामुळें राष्ट्रीय सभेंत या प्रांतस्थ लोकांच्या अभिप्रायाला फारसा जोर किंवा वजनदारी मिळत नाहीं. आमच्या लोकांच्या मागण्याची दाद सरकारी द्वारा शिवाय दुसऱ्या अन्य संस्थेच्या द्वारानें मिळावी अशी मूळची राजकीय रचनाच नाहीं शिवाय आमच्या पुढारी लोकांमध्यें स्थैर्य, संथपणा, उद्योगदीर्घत्व सहानुभव इत्यादि गुण असावे, तितके आढळत नाहींत. कार्योत्साह पुष्कळ दिसत होता तोही अलिकडे भंगत चालला आहे. लोकांस राजकीय शिक्षण अद्याप नीटसें मिळालेलें नाहीं आणि ह्मणूनच राष्ट्रीय सभेच्या कार्यांत देखील कधीं कधीं अंतराय येतो. या कारणाशिवाय दुसरें एक कारण आह्मांस असें वाटतें कीं वऱ्हाडांतील पुढारी मंडळीमध्यें जो ऐक्यभाव व जी प्रेमपुरस्सर आदरबुद्धि जागृत असली पाहिजे त्या ऐक्याचा किंवा बुद्धीचा अभाव होत आहे. अशी सकंटक मनोवृत्ती पुण्यांतल्या प्रमाणें इकडील मंडळींतही वास करूं लागली आहे आणि ह्मणूनच त्याचा सार्वजनिक कार्यावर परिणाम निराशकारक होत आहे. आमचे हे विचार वाचून कित्येकांस दुःख वाटेल पण वेळेवर राजकीय वातावरणांतील फेरफार नमूद केल्यानें पुष्कळ प्रसंगीं फायदा होत असतो आणि त्याच आशेवर आह्मी हे कडू उद्गार काढले आहेत.

राष्ट्रीय सभा अगदीं नजिक येऊन ठेपली आहे तेव्हां प्रतिनिधींच्या निवडी लवकर झाल्या पाहिजेत. राष्टीय सभेंतील नवलाई कमी झाली आहे तथापि उपयोग वाढला आहे आणि आणि त्या उपयोगांची वृद्धी होत जाईल अशा रितीनें त्या सभेचा जयजयकार चिंतिला पाहिजे. अस्सल इंग्रजी अमला खालीं जर राष्ट्रीय सभेचें वर्चस्व स्थापित होण्यास दहाबारा वर्षांचा काल लागला तर वऱ्हाड सारख्या अमानी मुलुखाला राष्ट्रीय सभेहूनही बलाढ्य संस्थेची कांस धरली पाहिजे. अशी संस्था उपलब्ध नाहीं तेव्हां राष्ट्रीय सभेच्या द्वारानेंच आपलीं दुःखें सरकारच्या नजरेस आणिलीं पाहिजेत. सरकारच्या पुढें राष्ट्रीय सभे मार्फत प्रांतिक प्रश्न मांडले जावेत अशी व्यवस्था दुर्घट खरी तथापि या प्रांताची विशिष्ट स्थिती लक्ष्यांत घेतल्यावर राष्ट्रीय सभा या प्रांताचा कैवार अधीक जोरदारीनें घेईल अशी आह्मास उमेद आहे. पण प्रयत्नाच्या कमतरतेमुळें आमची राजकीय उन्नती मागणें पडली तर त्याचा दोष प्रांतस्थ लोकांवरच आहे.

---

'डेक्कन सभे'च्या चालकांच्या असें लक्ष्यांत आलें कीं देशांतील धान्याचा पुरवठा फार कमी आहे. ही उणीव भरून काढण्यास एकच उपाय आहे आणि तो हा कीं बाह्य देशांतून धान्य पुष्कळ आणिलें पाहिजे. सरासरीच्या अंदाजानें एक कोट रुपये किंमतीचें धान्य बाजारांत खेळतें राहिलें पाहिजे. खानगी भांडवलावर सर्व निभाव होण्यासारखा नाहीं आणि सरकारच्या राजनितीप्रमाणें त्यास धान्याच्या व्यापारांत हात घालता येत नाहीं. या बिकट प्रश्नाचा उलगडा 'डेकन सभे'नें उत्तम प्रकारें केला आहे. फक्त नड इतकीच कीं हा सरकारास पसंत पडला पाहिजे. रेलवे कंपन्याला सरकार ग्यारंटी देते तशी ग्यारंटी परद्वीपांशीं धान्याचा व्यापार करणाऱ्या मंडळीस देण्यांत यावी. ही गोष्ट कष्टसाध्य वाटली तर दुसरा उपाय असा कीं सरकारानें आपला पैसा कंपनीच्या भांडवलांत घालावा ह्मणजे सरकारची देखरेख, खानगी व्यवस्था आणि टीपवाज धान्याच्या वांटणी यांनीं दुष्काळाच्या प्रसंगीं मध्यम प्रतीच्या लोकांचा चांगला निभाव लागेल. खरोखर हा विचार फार चांगला आहे आणि याचें अवलंबन सर्वत्र होईल अशी आह्मांस आशा आहे.

---

गेल्या विद्यासमाजाच्या वेळीं रावसाहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. डायरेक्टर हे बोलले कीं आकोल्याच्या ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थी कसरतीच्या मैदानांत डोळ्या समोर उभे होते तेव्हां त्यांच्याकडे पाहून मला मृत्यूच्या दरबाराची आठवण झाली ! खरोखर ही स्थिती अत्यंत शोचनीय व हृदयद्रावक होय. विद्यार्थ्यांची दुर्दशा हल्लीं तरी पालटली आहे असें आह्मास वाटत नाहीं आणि विशेष खेदाला कारण हें कीं राव साहेबांनीं विद्यार्थ्यांस मृत्यूच्या दरबारांतून परतून आणण्यासाठीं कांहीं विशिष्ट तजवीज केल्या विषयीं निदान कांहींच दर्शनीय प्रकार दिसला नाहीं. हल्लींची महर्गता कोण! विद्यार्थ्यांस त्यांचा पगार पोटाला पुरत नाहीं. घरची गरीबी असल्यामुळें जी ओली कोरडी भाकरी मिळेल तेवढ्यावरच विद्यार्थ्यांस जीवधारणा व कालक्रमणा कराव्या लागतात. विद्यार्थ्यांचे पगार वाढविल्या शिवाय ही कष्टमय स्थिती नाहींशीं होणार नाहीं हें रावसाहेबांसारख्या अनुभवी, प्रापंचिक व वयोवृद्ध गृहस्थांच्या लक्ष्यांत येऊन चुकलेंच असेल. पण वरिष्ठ अधिकाऱ्याकडून रावसाहेबांची निराशा झाली ह्मणून त्यांनीं हात पाय गाळले आणि विद्यार्थ्यांचा हवाला ईश्वरावर सोंपविला कीं काय न कळे! प्रस्तुत प्रसंगीं विद्यार्थ्यांवरील कसरतीचा बोजा रद्द केला तरी परोक्षरी त्या त्यांच्या देहावर उपकारच होतील.

---

√ राष्ट्रीय सभेची शाखा विलायतेंत 'ब्रिटिश कांग्रेस कमिटी' या नांवानें आहे. या संस्थेच्या साह्यानें आमच्या देशाचें कल्याण झालें आहे आणि होत ही आहे. इंडिया संबंधाच्या राजकीय चळवळी विलायेंत या संस्थेच्या द्वारानें चालतात. राष्ट्रीय सभेचा खर्च जसा लोकांवर पडतो तसा ब्रिटिश कांग्रेस कमिटीचा खर्च ही येथील लोकांवर पडतो. दोन्ही खर्च फार मोठे आहेत आणि लोकांच्या पाशीं त्राण नाहीं असा खरा प्रकार आहे. राजकीय उन्नती करण्याच्या शाला ह्मणजे वरील संस्था आहेत. परंतु त्या शालांतून शिक्षण मिळण्यास व तें शिक्षण लाभप्रद होण्यास लोकांस जी फी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष द्यावी लागते ती निर्वेधपणानें देण्याइतकी सधनता लोकांची नाहीं ही दुःखद गोष्ट होय. पण राजकीय उन्नतीला दुसरा मार्ग नाहीं आणि गत्यंतर नसल्यामुळें यथाशक्ती प्रत्येक राष्ट्रभक्तानें या संस्था चालविण्यासाठीं अहर्निश झटलें पाहिजे. नाहीं तर, गेल्या १२ वर्षांचा प्रयत्न निर्फळ करण्याचें अपश्रय आपल्या माथीं येऊं पहात आहे. कर्तव्याला विसरता कामा नये ह्मणजे ईश्वर नाना तऱ्हेनें आपले मनोरथ सिद्धीस नेतो. सत्यसंकल्प ठेवावा ह्मणजे ऋद्धिसिद्धी सर्व अनुकूळ होतात.

---

√ "भिकाऱ्यांनो, ऋण देऊन टाका" हा निरोप राष्ट्रीय सभेचे संस्थापक मि. ह्यूम यांनीं इंडियन लोकांस पाठविला आहे. मि. केन साहेब व मि. गुडरिज असे दोघे थोर गृहस्थ हल्लीं इंडियांत आले आहेत. त्यांच्या बरोबर मि. ह्यूम साहेबांनीं हा निरोप धाडला आणि तो त्यांनीं मुंबईस 'प्रेसिडेन्सी असोशिएशन'च्या सभेंत सर्व राष्ट्रवाल्यास विदित केला. विलयेंतत जी ब्रिटिश कांग्रेस कमिटी आहे तिचे हात पाय पैशाच्या अभावामुळें तुटल्या प्रमाणें झाले आहेत. तेव्हां लवकर वर्गण्या पाठवा ह्मणून मोठ्या आस्थेनें त्या वृद्ध पितामहानें सांगितलें आहे. हा निरोप अनेक गोष्टी ध्वनित करितो. आह्मा देशबांधवाना 'भिकाऱ्यांनो' असें संबोधून आमचें दारिद्य व आमची दुर्लबता चांगली व्यक्त केली आहे. हा दोष दैविक आहे आणि त्याबद्दल नेटिव लोक निरपराधी आहेत हें खरें तथापि भिकाऱ्याच्या अंगींहि कांहीं सत्वस्थपणा असतो आणि तो आपलें ऋण फेडण्यासाठीं हरप्रयत्न करून बंधमुक्त होतो. तशीं वृत्ती आपण ठेविली पाहिजे. राष्ट्राचें ऋण आपणाकडे आहे आणि तें आपत्काळीं मोठ्या कष्टानें फेडण्यांतच खरा पुरुषार्थ, देशाभिमान व स्वातंत्र्यार्हता आहे. तेव्हां राष्ट्रीय सभेची व्यवस्था व ब्रिटिश कांग्रेस कमिटीची व्यवस्था नीट अव्याहत चालतील असा सततचा योग राष्ट्रभक्त आणितील अशी आह्मास बळकट आशा आहे.

---

## The Berar Samachar

MONDAY DECEMBER 14 1896

The progress of the Forest department has been very rapid in Berar. It is mostly a growth of the past ten or twelve years. Resolutions in the Residency orders will amply prove what we say. Lands available for cultivation or useful for the conveniences of the neighbouring villages have been included under forest areas and people have been put to a decisive disvantange in this connection. We do not mean hereby that the aims and

objects of the forest department are not admirable from points of utility; but the danger that we apprehend and the difficulty we experience arise from directions of over—calculations and utter absence of consulting the needs of the people. To a plain mind the grievances of the forest department outbalance its usefulness. No body denies that it is an ever growing spring of revenue and accumulations which enrich the public exchequer. The question is whether the people are to that extent impoverished and constrained to meet new grievances on that account. If experience answers it in the affirmative we realy doubt the usefulness of the forest department. This sad reality was no doubt present to the mind of the government of India when they issued in 1894 their memorable forest-re—solution to all local governments That resolution recommends to check the overgrowth of forestry in India. It practically directs to administer to the needs of the people and to make the progress of the forest department as a healthy, subservient and help-ful factor of public utility.

The enormous increases in the forest reserve press very hard against people in these times of scarcity. The measure of dis-foresting lands suitable for cultivation will sooner or later occupy the mind of local governments. But the urgent want of the time is a free and full supply of whatever food and fuel may be had in the forest areas Provision of fuel will afford a help to the poor and in a certain measure a field of work for day—labourers. The edible produce of forest will be a sure and certain source of living to those whose wants are but few and scanty. We hope that the local government will be liberal and generous so as to open up a real source of living to the starving thousands.

---

We are rather late to study the learned lecture by the Hon'ble Mr. Justice M. G. Ranade on the life and teachings of Raja Ram Mohun Roy. We request our readers to digest inwardly some of the true traits in the character of his ideal of a great man He observes:—

"Truthfulness, great impulses, moral aims, resourcefulness, to attain those aims by the bond of love and fellowship: These are the traits of character which go to make a great man and those in whom they are best developed are the greatest of men. You have all read accounts of the life of *Budha*. He had such a hold upon men's mind that wherever he went hundreds and thousands followed him, in such a way that they ensured the permanent success of the movements which he inaugurated—a most unparalleled success in the world's history. Take again Mahomed's case: there is the same story. A poor illiterate man, he did not dream of religion in his youth and yet at forty he goes into retirement, incessantly moved about in such a country as Arabia to find that he is persecuted and has to fly for life but that was such an attraction in men and women towards him, that in the course of ten or twenty years he was able to dictate terms to the largest and the most powerful powers of that time. Here then you have a general idea of what constitutes greatness. Earnestness of purpose, sincerity in action, originality, imagination and above all the power of magnetism we might call it vital or spiritual magnetism. Well, these are the qualities which go to make a man great. I have thus given you my own conception of what a great man is. He is not the richest man, nor, the most intelligent man, nor the most cultivated man, nor the most successful man, but a great man is he who, whether he be poor or rich, learned or unlearned, in the profession or out of the profession, successful in life or unsuccessful in life, the great man is he who combines some of those virtues, that I have just attempted to draw your attention to."

Towards the close of his lecture Rao Bahadur Ranade has proposed a welcome solution of the *vexed* question of Hindu religion in connection with idolatry. We quote below the summary of his remarks and request our readers to note the direction which our religious movements should take in the long run. He observed:—

"The question you will recollect is not of idolatry or non-idolatry. That difference relates to the method of devotion not to the object of worship. The difference to which I have drawn your attention has a deeper source and requires our most anxious consideration. In those cases idolatry is only a consequence of this practrial polytheism which prevails in the land, and who leads men against the teachings of their own higher reason to think that one supreme will does not govern all the operations of nature, but that many gods and goddesess, good and bad Deities or Devatas are permitted to influence the operations of nature and the well—being of man in a hundred different ways, and it is these subordinate powers which must be propitiated, each in its own way and on its own day. It is this ceaseless distraction of the mind between the claims of the multiple small agents of good and bad influences which is the real evil. There is image worship among the Roman Catholics and there is saint worship and Pir-worship among Christians & Mahomedans, but on the whole they do not detract from the monolatrous character of the devotions of these people. With us this limit has been overstepped with the consequent debasement that we see all about us. Ram Mohun Roy naturally felt pained at this modern debasement, and with a view to bring into accord our practical devotions with our monotheistic faith he gathered together kindred souls who felt with him on this point and established the Brahmo Samaj. With him the Brahmo Samaj faith was not a new dispensation, a new declaration of God's purposes. He aspired only to establish harmony between men's accepted faith and their practical observances by a strict monolatrous worship of the One Surpreme Soul, of self and not of the possessions of the self. There was nothing Christian in its conception origin or method. He wanted men and women to cherish their own ancient treasures of faith and to secure their freedom from the bondage of superstition and ignorance. This was the work which the Brahmo Samaj intended to carry out. It is not for me to say how far that has been fulfilled, if it has not been fulfilled the blame is not his but ours. To us the same presents itself today as it did to him early in the century. And it is a problem on the right solution of which our destiny here and hereafter greatly depends. In connection with this anniversary I beseech you to take this great lesson to heart and to try to work out its solution in such a way that the integrity of your soul may be restored. When this correspondence between the head and the heart, between the flesh and the spirit, is established, Indian Monotheism will be as great a power in the and as Christian and Mahomedan Theism uniting 250 millions of men and women in a bond which shall be indissoluble. The historical differences of national creeds will continue to exist like the different styles of architecture. The Christian Church will not look in outward appearance like a Mahomedan mosque or an Aryan temple, but the differences of style and form will not interfere with the spiritual unity of purpose. When this is accomplished another great idea which Raja Ram Mohun Roy cherished deeply in his heart will be realised, and with it people in all lands will say with one voice "Thy Kingdom has come and Heaven has descended on Earth." (Cheers)

---

## वऱ्हाड

हवामान— थंडी विशेष पडूं लागली आहे. पावसानें दगा दिला आणि अखेरची निराशा आतां होऊन चुकली. सार्वजनिक आरोग्य बरें आहे.

रा० रा० गोपाळ वामन बापट बी. ए, एल. एल. बी. तहशीलदार वर्ग २ यांस अक्टिंग एक्स्ट्रा असि. कमिशनर वर्ग ५ नेमण्यांत येऊन मेहकराहून उमरावतीस त्यांस बदलण्यांत आलें.

क्याप्टन एफ. आर. माडवी, असिस्टंट कमिशनर उमरावती यांस जस्टिस आफ दी पीस आणि पहिल्या वर्गाचे समरी माजिस्ट्रेट नेमण्यांत आलें.

मि० हैदरअल्ली अब्बाची यांस वणी जिल्ह्याचे जिल्हा-रजिस्ट्रार नेमण्यांत आलें.

मि० एम. रहिमतुला तहशिलदार मलकापूर यांस बुलढाणा जिल्हा बोर्डाचे सभासद नेमिलें.

लोअर हायर परीक्षेचा निकाल प्रसिद्ध झाला आहे त्यांत यंदाच्या व मागील परीक्षा मिळून सर्व परीक्षा ज्यांची उतरली असे अधिकारी:—

| रा. रा. | परीक्षा कोणती |
|---|---|
| गोपाळ वामन बापट | हायर |
| नारायण रामराव | लोअर |
| बळवंत यादव | डेपुटी क्लार्क आफ कोर्ट. |

रा. रा. नारायण गोविंद नायब तहशीलदार वर्ग १ हे निर्वतल्यामुळें खालील बदल्या झाली:—

| मिस्टर | नायब तहशिलदारीचा वर्ग व गांव. |
|---|---|
| सोराबजी शापूरजी | १ ला. |
| सय्यद मझीर हुसेन पर्शिअन रिडर कमिशनर कचेरी. | १ ला अक्टिंग, वाशीम. |
| गणेश राजाराम | १ ला. पुसद |

मि. एम. अजिमुद्दीन हिंदुस्थानी इनस्पेक्टर यांस मुलकी खात्यांत तहशीलदारी वर्ग ४ ची देऊन इलिचपुरास नेमिलें.

गेल्या सप्टेंबर महिन्यांत वऱ्हाड प्रांतांत १०३२२ मनुष्यें जन्मलीं आणि १०८३९ मनुष्यें मरण पावलीं.

गेल्या इंटरमिजिअट परीक्षेंत वऱ्हाडचे दोन विद्यार्थी पसार झाले:—

सदाशिव हरी शेवडे.

सदाशिव वासुदेव सोमण.

मि० प्रिडो डेपुटी कमिशनर यांची स्वारी भोनगांव, पातुर्डा, वडसिंगी मार्गानें तारीख १७ रोजीं जळगांव मुक्कामीं दाखल होईल.

आकोला जिल्हा बोर्डाकडून दुष्काळा निमित्त कामें येत्या जानेवारी पासून सुरू होणार आहेत आणि त्या कामावर हंगामी सब-ओव्हरसिअर आणि मिस्त्री पाहिजे आहेत.

जानेवारीच्या १३ वे तारखे पासून उमरावतीस बालक्तृत्वोत्तेजक सभेच्या १३ व्या वार्षिक समारंभास प्रारंभ होईल.

येत्या १९ वे तारखेपासून आकोल्यास सेशन कोडत भरणार आहे.

येत्या रविवारीं राष्ट्रीय सभेस धाडावयाचे मुखत्यार निवडण्यासाठीं येथें जाहिर सभा भरणार आहे.

---

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९३ रुपये |
| जवारी | ९५ रु० |
| गहूं ( कांठे ) | १२० रु० |
| ,,( बनशी ) | १३० रु० |
| चणे | १०५ रु० |
| तेल ६॥— रु० मण | तूप ७ मण |
| सोनें | २६ तोळा |
| चांदी | ८७ |

---


### WANTED

Temporary sub-overseers and maistrees for about 6 months for Akola District Board's works likely to be commenced from 1st January 1897.

Salaries according to qualifications.

Apply to and see as soon as possible with copies of testimonials.

VICE—CHAIRMAN
District Board, Akola.


---


### नोटीस

एकोआप्पा वीराप्पा वाणी राहणार बाळापूर—यास

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आपलें बाळापूर येथील रहातें घर ताबेगहाणाच्या कर्जरोख्या अन्वयें आमच्या ताब्यांत तारीख ३।५।८८ रोजीं दिलें. आणि स्वतां राहण्यासाठीं भाडेचिठ्ठी तारीख २२।२।८८ रोजीं लिहून देऊन तुह्मी तें घर आपल्या ताब्यांत परत घेतलें. भाडेचिठ्ठीप्रमाणें तुह्मी भाडें दिलें नाहीं; पण भाड्याच्या रकमेबद्दल तुह्मावर तुमच्याच तोंडी ठरावाप्रमाणें फिर्याद केली नाहीं.

गहाण घर तुह्मी नीट स्थितींत ठेविलें नाहीं. कर्ज फिटण्याचा संभव कमी दिसतो आणि भाड्याच्या रकमेचाही वसूल तुह्माकडू येऊं शकत नाहीं. गेल्या तीन सालाबद्दल तुह्मावर निराळी फिर्याद केली आहे. तर भाडेचिठ्ठीतील कराराप्रमाणें घर खाली करून द्यावें. तसें न केल्यास कोर्टमार्फत तुमच्या ताब्यांतून घर ताब्यांत घेतलें जाईल आणि घर ताब्यांत येईपर्यंत तुह्मास दरमहा ४ रुपये प्रमाणें भाडें द्यावें लागेल. मूळकर्जाची फेड सव्याज करून घर सोडवून घेतल्यास मला फार आनंद होईल आणि सर्व त्रास चुकेल. कळावें तारीख ८।१२।९६ इ०

सही
ओंकारआप्पा महादाप्पा वाणी
दस्तुर खुद्द राहणार
बाळपूर


---

## वर्तमानसार.

सेंटपीटर्सबर्ग, नोंवेंबर ता० १९ च्या तारेवरून मास्को येथील नगरवासी लोक आणि राशियांतील प्रमुख वर्तमानपत्रें हीं हिंदुस्थानांतील दुष्काळाकरितां वर्गणी गोळा करीत आहेत.

दक्षिण राशियामध्यें गव्हांचा भाव चढत आहे, आणि तेथून पुष्कळ गहू रवाना होत आहे.

जपानच्या मुख्य प्रधानानें मुलींना ज्यांत विलायती शिक्षण मिळत असे अशा शाळा बंद केल्या.

हिंदुस्थानच्या रुपयाची किंमत विलायतच्या बाजारांत वाढू लागली आहे व त्यामुळें विलायतच्या व्यापाऱ्यांत गोंधळ होण्याचा संभव आहे, अशी विलायतच्या व्यापाऱ्यांची ओरड आहे.

कापसाच्या तेलापासून कृत्रिम रबर करण्याची कल्पना अलीकडे निघाली आहे.

चीनचा प्रधान ली हंग चंग यांनीं आपल्या चाकरीचा राजिनामा दिला.

आफ्रिकेंतील युरोपियन नैयर कंपनी आपली बरीच मोठी फौज तिकडच्या एका संस्थानिकावर पाठविण्याची तयारी करीत आहे.

पर्जन्य पडावा एतदर्थ मुंबईतील कांहीं स्त्रियांनीं नग्नावस्थेंत जमीन शेणानें सारवून रांगोळ्या घातल्या त्याचप्रमाणें श्री मारुतीच्या गळ्यांत फुलांचे हार घालून प्रदक्षिणा घातल्या.

रुप्याचा भाव वाढत चालला आहे त्यामुळें सोन्याचा कमी होईल व इंग्लंडांत नाण्यासंबंधीं पुन्हा चळवळ होईल अशासंबंधीं चर्चा सुरूं झाली आहे.

पश्चिम आफ्रिकेंतील निगार कंपनी मोहिमेची तयारी जारीनें करीत असून ही मोहीम लोरिया प्रांतावर होणार आहे. ह्मणून तिकडे फ्रेंच सरकारानेंही आपल्या मुलखाचें रक्षण होण्याची जय्यत तयारी ठेविली आहे.

धान्य आणविलें—शेट नारायणदास यांच्या बंधूंनीं मुंबईस दुकानें काढलीं आहेत. त्यांनीं अमेरिकेंतून ६०० खंडी गहूं, १२००० खंडी मका, व १६०० खंडी सातु, गरीब लोकांना विकण्याकरितां आणला आहे असें समजतें.

डा० स्काट बंगालचे डेपु० सानिटरी कमिशनर यांनीं ता० २६ रोजीं कलकत्याच्या क्लबांत आपली मान कापून आत्महत्या करून घेतली.

दरवडा—कल्याण तालुक्यांत डोंणें येथील इनामदार दादासाहेब मोकाशी यांचे वरावर गेले आठवड्यांत भर दिवसा दरवडा पडून सुमारें लाख रुपयांचा विषय चोरीस गेला. दरोडेखोरांनीं त्यांचे कागदही जाळून टाकल्याचें कळतें!

झांशी येथें अन्नार्थी लोकांकरितां सरकारांतून एक अन्नगृह सुरूं केलेलें असून त्यावर देखरेख ठेवण्यास कांहीं म्युनि० कमिशनर व्हिजिटर नेमिले होते. ते तेथील व्यवस्थेच्या संबंधानें शेरेबुकांत विरुद्ध शेरे लिहून गेल्यामुळें मानि. साहेबांनीं तें बूकच तेथून उठविलें; आणि व्हिजिटरांचा अपमान करण्यास सुरुवात केली; यामुळें ते देखरेख पहाण्यास मुळींच जातनासे झाले. अर्थात् अंमलदारीस हवेतसें धिंगाणे घालण्याची मुभा होऊन त्यांनीं तेथें येणाऱ्या अन्नार्थ्यांचें अन्न हल्लीं तोडलें आहे असें अमृतबझार पत्रिकेस तेथील बातमीदारानें लिहिलें आहे.

हिंदुस्थान सरकारास विलायतेहून विश्वसनीय माहिती कळविली आहे कीं—बीनेस एरेस आणि न्यूयार्क येथें सातूचा अतिशय सांठा असून तें धान्य हिंदुस्थानांत येण्यासारखें आहे. मुंबई व कलकत्ता येथें ३ रुपयांनीं मण विकतां येईल. उत्तर हिंदुस्थानांतील लोकांस गव्हांपेक्षां सातू पसंत पडण्यासारखे आहेत. आ. व.

यंदा ठाणे जिल्ह्यांतल्या खालच्या प्रतीच्या लोकांत ज्या अनेक प्रकारच्या चळवळी सुरू झाल्या आहेत त्यांच्या योगानें जिल्ह्यांतल्या पांढरपेशा लोकांचें धाबें अगदींच दडपून गेलें आहे शेतकरी व जंगली लोकांच्या त्या चळवळीमुळें अनेक प्रकारें आपलें नुकसान होण्याची पांढरपेशांस भीती पडली आहे. आजपर्यंत हे खालच्या प्रतीचे लोक कांहीं अंशीं तरी पांढरपेशांच्या तंत्रानें वागत असत पण आजचा प्रकार अगदीं त्याच्या उलट आहे. हल्लीं सगळा जिल्हाभर त्या लोकांच्या सभा चालू आहेत. पांच किंवा दहा हजार लोकही एकेक ठिकाणीं जमतात. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या नेमणुका होऊन आपणास होत असलेला त्रास कसा दूर करतां येईल. या बद्दल त्यांच्यांत वादविवाद व चर्चा होत्ये. आणि अमुक एक गोष्ट करावयाची असें ठरलें ह्मणजे ती करण्याचा उद्योगही चालू होतो. या ज्या त्यांच्या सभा वगैरे होतात त्यांत पांढरपेशांचें चिटपाखरूंही नसते, इतकेंच नव्हे तर कोणी पांढरपेशा त्यांच्या सल्यावाचून त्याच्या एखाद्या सभेंत गेला तर त्यास खड्या सारखें वेगळे काढण्यांत येते. त्यांचा हा असा प्रकार चालूं झाल्यामुळें पुष्कळ ठिकाणचे पांढरपेशे अगदीं भुलून गेले आहेत व कांहीं ठिकाणच्या पांढरपेशांनीं आपली वायकामुलें चीजवस्त परठिकाणी पाठवून देऊन आपण स्वतांही दुसऱ्या ठिकाणीं राहाण्यास जाण्याच्या तयारीस लागले आहेत.

माहीमच्या गेल्या दंग्यांत सरकारी दप्तर जाळल्याच्या आरोपावरून पकडलेलें सुमारें ३० लोक विशेष बंदोबस्तानें गेल्या बुधवारीं ठाण्यास येऊन दाखल झाले आतां यांचा इन्साफ ठाण्यास व्हावयाचा आहे.

रशियांतलें व कालीफोर्नियांतलें ९,००० मण धान्य नबिया आगबोटीतून कलकत्यांस येऊन दाखल झालें.

दक्षण बलुचिस्थानचा पोलिटिकल एजन्ट क्या. तिघे हा पुढें चाल करीत असतां त्यांस लूस बेला प्रांतांतील डोंगरी लोकांनीं हरकत केली होती.

मध्यएशियांत रशियानें रेलवे करण्याचा जो सपाटा चालविला आहे त्यापैकीं पश्चिम सैबेरियन व ट्रान्स कास्पीयनचा नवा फाटा या दोन तयार होऊन माणसें वगैरे जाऊं येऊं लागली. पहिलीची लांबी ८८९ मैल असून दुसरीची १९८ मैल आहे. त्या भागांत यंदा पाऊस फार झाल्यानें तापसराई फार झाली आहे. समूर हिरातेवर जाणारा रेलवेचा एक रस्ता करण्याचें काम चालूं आहे हिरातेवर जाणारा रेलवे रस्ता करणार अशी बोलवा आहे. अमुदर्याचा कालवा काढून कास्पियन समुद्रास मिळविण्याचा विचार चालू आहे तसें झाल्यास रशियास सेन्टपिटर्सबर्ग येथून जलमार्गानें अफगाणिस्थानावर येण्यासमार्ग होईल.

विलायतची बंद असलेली पार्लमेंट सभा १९ जानेवारी पासून पुन्हा सुरूं होईल.

कांहीं रशियन लोक अबिसिनिया येथें येथें जाऊन राहिले असून त्यांचे तेथें चांगले वजनही पडले आहे आणि इंग्रज लोक इजिप्त येथें राहतील तों पर्यंत हें रशियन मंडळ अबिसीनिया येथें राहाणार असें सांगतात. अ. द.

पाऊस—कुष्टगी—येथें चांगला पाऊस झाला. पूर्वी पेरें झालेलीं पिकें उत्तम आहेत. हल्लीं ज्वारी २२ शेर मिळते. चिंचोळी ७॥ इंच पाऊस एका दिवसांत झाला! नळदुर्ग येथें ३ इंच २९ हिस्से पाऊल पडला रायचूर येथें एक इंच वृष्टी झाली- नळदुर्गच्या आसपासही चांगला पर्जन्य पडला. कोडंगल, गुडमटकल, व लिंगसुगूर पाऊस ठीक झाला.

आवाज किती लांब जातो—इंजिनाची शीटी ३३०० यार्डावर जाते, आगगाडीचा आवाज २८०० यार्ड, बंदुकीचा आवाज व कुत्र्याचें भोंकणें १८०० यार्ड; मनुष्याचा आवाज १००० यार्ड लांबीवर ऐकूं जातो; बेडकांची टरांव टरांव ९०० यार्ड, रातकिड्याचीं किरकिर ८०० यार्ड.

असा अंदाजा आहे कीं इंग्लंडांत माणसांच्या केंसासाठीं दर वर्षास ४,००,००० पौंड खर्च होतात.

न्या. सिं.

पृथ्वीच्या पाठीवर कांहीं ठिकाणें अशीं आहेत कीं, तेथें पाऊस मुळींच पडत नाहीं. अमेरिकेंतील पेरु देशांतील खोस प्रदेशांत पाऊस पडत नाहीं. याचें कारण हवेतील ओलावा सगळा जवळच्या प्रचंड पर्वतांनीं आकर्षिला जातो. इतर कित्येक ठिकाणीं पाऊस न पडण्याचें कारण दुसरें आहे, तें असें. ज्या प्रांतीं पाऊस पडत नाहीं त्या प्रांतांवर ढग येणेंच शक्य नसतें. कारण ढग बनावयाचें हें पाण्याच्या संचयांतून कांहीं पाणी वाष्परूपानें वर जाऊन बनतात. ढग वाऱ्यानें इकडून तिकडे जात असतां ही पुष्ट होत असतात. परंतु अशी पुष्टी मिळण्याजोग्या जलसंचयावरून कित्येक हजार मैलपर्यंत जर वारे वाहिलेच नाहींत, तर ढग मोठमोठाल्या वाळूच्या अरण्यावर जाऊन वृष्टी करणार कोठली? आफ्रिकेंत मोरोक्कोपासून पूर्वेच्या बाजूला शेंकडों मैलांची अशी स्थिति आहे. तेथें जलानें तुडुंबलेले ढग पोहोंचूं शकत नाहींत. बलुचिस्थनांतील मेक्राण प्रांताची स्थिति हीच आहे, व तिबेटांतील पठारावरल्या गावींच्यीं मैदानाची स्थिति तशीच आहे, समुद्रकांठीं पाऊस अतोनात. तेथून वरवर जावें तों तों पाऊस कमी. पठारांवर—तीं पठार पर्वतांनीं वेष्टिलेली असल्यास विशेषच—पाऊस फार बराच कमी. कारण पर्वत हवेंतला ओलावा आकर्षून घेतात. त्याचप्रमाणें अगदीं समुद्रकांठावर पाऊस फार. परंतु त्याच सपाटीवर देशांतल्या अंतर्भागांत जावें तों तों पाऊस कमी. कारण समुद्राच्या पृष्टभागावरून बाष्प अधिक होऊन तेथें ढग फार तयार होतात. पृथ्वीच्या पृष्टभागावरून वर जाण्या इतका ओलावा निघत नाहीं. कोंकणांत पाऊस फार, डोंगरावर फार, देशावर कमी व रुक्ष मैदानांत व प्रांतांत फारच कमी, याचें कारण वरच्या विवेचनावरून समजणार आहे. क.

सोल्जरी लीला— लाहोरच्या ट्रायब्यून पत्रास मुलतानच्या बातमीदारानें लिहिलें आहे कीं—गेल्या ३ ऱ्या तारखेस खैरपूर येथें छावणी जवळील एका शेतांत कांहीं मुली कापूस गोळा करित असतां दांडगेश्वर सोजीर वाईट बुद्धीनें त्या मुलींजवळ आले. तेव्हां त्या मुली ओरडूं लागल्या; तें ऐकून त्या मुलींचे संबंधी मनुष्य जवळच होते. ते आले व मुली जवळ येऊं नका असें त्या कामांध सोजीरांस ते सांगूं लागले; परंतु गोऱ्या कातडीच्या त्या सोजिरांस तें सहन न होऊन त्यांणीं दोघांस खालीं पाडलें व बंदुकींनीं त्यांचीं टकलीं ठेंचून टाकलीं. ही ओरड ऐकून तिसरा एक संबंधी मदती करितां ह्मणून आला त्याला तर त्या मस्तवाले सोजिरांनीं गोळी घालून लोळवलाच तो अत्यावस्थ आहे. ह्या जुलमामुळें तेथील लोक चवताळून गेले आहेत. हे चढवलेले सोजीर केव्हां तरी पुरें सरकारास भोंवल्या शिवाय राहणार नाहींत. स० शो०


## विक्रीस तयार

## SAPKAR'S DIARY FOR 1897 WITH A CALENDAR FOR 1897

## सापकराची रोजनिशी,

## सन १८९७ सालाकारतां

हींत मराठी तिथी, वार, महिने, सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण, सरकारी ऑफिसांस व दिवाणी कोर्टांस असणाऱ्या सुट्या, मौंजीविवाहांचे मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखा, रेल्वे, तारायंत्र, स्टँप, मनीआर्डर, पोस्ट, मुंबई बँकेच्या रूळी, सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टँप, कोर्ट फी, पोलिस गाईड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचे पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि नेहमीं जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचें कोष्टक दिलें आहे. अखेरीस जमा खर्चाच्या सदराचीं व कांहीं कोरीं पृष्ठें जोडलीं आहेत.

रोजनिशीची किंमत.

प्रत नंबर १..............८१२ ८२
प्रत नंबर २ ...............८८ ८१॥
प्रत नंबर ३ .....................८७१॥

किंमती बद्दल रोख पैसे आह्माकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर, ज्ञानचक्षूचे मालक.


☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास .......................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .........०१ ०६
दुसरे खेपेस ..........०१

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8
Six monthly......... 3 ...... ... ...„ 8 a
Single copy ............... ....... ... 4

Advertisement.
Below 10 lines ... 2 R
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXX AKOLA MONDAY 21 DECEMBER 1896 NO 49

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख २१ माहे डिसेंबर सन १८९६ इ० अंक ४९

## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक.

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken
Agent

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध १० शके १८१८

## प्राथमिक शिक्षण

( रा. रा. गणेश रामचंद्र दामले. बी. ए. नीं लिहिलेला )

नंबर २

आतां या शाळेमध्यें शिक्षणाला आरंभ कसा व्हावा या संबधानें:– आपल्या शिक्षणाला सुरुवात शारिरिक व्यायामा पासून व्हावी. लहान मुलांना शाळेचा मोठा बाऊ वाटतो. तो शाळेचा पांढरा काळा रंग पाहून तीं बुझाल्या सारखीं होतात. कांहीं मुलांना प्रथम जेव्हां जबरदस्तीनें शाळेंत घेऊन जातात तेव्हां तीं इतकीं घाबरतात व इतकीं रडतात कीं कोणास वाटेल कीं त्यांना कोणी सुळावरच चढवावयास नेत आहे. यावरून आपल्या शाळेमध्यें शिक्षणाला आरंभ होतो तो मुलांना किती अपायकारक होतो याची कल्पना करितां येण्या सारखी आहे लहान मुलें बहुतेक खेलाडू असतात. नेहमीं स्वच्छंद खेळणारा मुलगा एकदम शाळेमध्यें आणून एक सारखा कोंडून ठेवला जातो. या योगानें त्याच्या शरिरावर, व मनांवर देखील वाईट परिणाम झाल्या शिवाय रहात नाहीं. ह्मणून लहान मुलांना प्रथम शाळेच्या पटांगणामध्यें नेऊन त्यांना साधे खेळ शिकवावे आणि खेळतां खेळतां शाळेंत नेऊन शिकविण्याची व्यवस्था व्हावी. स्पेन्सर सारख्या ज्या तत्ववेत्यांनीं शिक्षणा संबधीं विचार केला आहे त्यांचेंही सांगणें असेंच आहे. शाळेंतील शिक्षणाला या प्रमाणें शारीरिक शिक्षणानें प्रारंभ होऊं लागल्यावर, मुलांना शाळेचा बाऊ न वाटतां उलट शाळेंचें पटांगण ही त्यांची आवडती जागा होईल. व हळूहळू त्यांना शाळाही आवडूं लागेल. या प्रमाणें मुलाचीं सहा वर्षें पुरीं होत तों पावेतों त्याला साधे खेळ आणि मुळाक्षरें व अंक मात्र शिकवावे. सहा वर्षें पुरीं झाल्या शिवाय त्याला पहिल्या यत्तेच्या क्लासांत घालूं नये. अशी अट ठेविल्यावर पाच वर्षांचीं मुलें शाळेंत घेण्यास हरकत नसावी. शिक्षणाला प्रारंभ या प्रमाणें व्हावा.

आतां या शाळेंतील पहिल्या दोन यत्ता संबधानें गेल्या एप्रीलमध्यें वऱ्हाड शाळा खात्याच्या ज्या पहिल्या दोन यत्ता छापून आल्या आहेत त्या पुष्कळ चांगल्या आहेत या दोन यत्ता आहेत अशाच ठेवण्यास हरकत नाहीं. परंतु या दोन यत्तांमध्यें जी उजळणी शिकविली जाते त्या संबधानें कांहीं सुधारणा इष्ट आहेत. अलीकडे उजळणी शिकविण्या संबधानें पुष्कळच सुधारणा झाली आहे आणि ती पहिल्या तीन यत्ता मध्यें वाटून दिली आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. उजळणी पाहिली असतां गणिताचाच एक लहानसा भाग आहे. ह्मणून बेरीज शिकविल्या नंतर आधीं उजळणीची उपपत्ति मुलांस शिकवावी व नंतर ती त्यांजकडून पाठ करवावी. उजळणी शिकविण्या संबधानें दुसरी सूचना करावीशी वाटते ती अशी. कल्पना करा कीं मुलास दिडकी शिकवावयाची आहे. तर त्यांनीं प्रथम एक दीडे दीड पासून दहा दीडे पंधरा पावेतों वाचणी शिकवावी. व पुढें वीस दीडे, तीस दीडे, चाळीस दीडे या माणें फक्त दशक मुलांकडून पाठ करवावे व तेवढे दशक केल्यानें सर्व दिडकी केल्याचें कसें श्रेय येतें हें मुलास समजून सांगावें. या प्रमाणें केल्यास उजळणी पुष्कळ सोपी होईल. तिला केवळ घोक्याचें स्वरूप रहाणार नाहीं आणि बराच वेळही वाचेल. आपण सर्वजण उजळणी शिकलों आहों, परंतु आज आपणास जर कोणी उजळणीचे वेडेवांकडे प्रश्न विचारिले तर आपलें काम बहुतकरून बेरीज गुणाकाराशिवाय भागणार नाहीं. याचें कारण व्यवहारामध्यें आपणास इतक्या उजळणीचा उपयोग होत नहीं हें होय आणि सगळ्या उजळणीचा जर उपयोग होत नाहीं तर सगळी शिकविण्याचें अर्थात कांहीं कारण नाहीं.

आपल्या देशांत मुलें बऱ्याच कोंवळ्या वयांत शाळेंत जातात. त्यांनां व कुणबी वगैरे लोकांना ही उजळणी फार जड जाते. त्या मानानें व्यवहारांत तिचा उपयोग होत नाहीं. करितां ही उजळणी बहुतेक काढून टाकिली तरी चालेल. असें केल्यानें एखाद्या पुस्तकाचें वाचन तरी जास्त होईल हा उजळणीचा प्रकार आपल्याच देशांत फार आढळतो. इतर देशांत तो इतका नाहीं किंवा मुळींच नाहीं ह्मटलें तरी चालेल. आपल्या देशांतील लोक जास्त उजळणी शिकून इतर देशांतील लोकांपेक्षां जास्त हुशार झालेले असतात अशी मुळींच गोष्ट नाहीं. करितां ही शुष्क उजळणी बरीचशी काढून टाकावी किंवा वर सुचविल्या प्रमाणें निदान संक्षिप्त तरी शिकवावी.

सायंकाळ झाली ह्मणजे मुलांनां शाळेंत किंवा कित्येक वेळां शाळेच्या बाहेर तास तास उभे करून त्यांनां या उजळणीची नुसती घोकणी करावयास लाविलें जातें. या घोकणीमध्यें ही एक गोष्ट चांगली आहे ती कीं थोडक्या वेळांत सर्व मुलांची वाचणी होते. परंतु यामध्यें वेळ फार जातो. हीच वाचणी संक्षिप्त सांगितल्यास तासाचें काम पांच मिनिटांत होईल. आणि बाकीच्या वेळामध्यें शिक्षकास उजळणीचे सोपे प्रश्न विचारण्यास दर रोज वेळ सांपडेल. असे प्रश्न दररोज तासभर विचारण्याचा जर परिपाठ ठेविला तर त्याच्या योगानें मुलांच्या डोक्यामध्यें पुष्कळ तरतरी उत्पन्न होईल यांत शंका नाहीं. पहिल्या दोन यत्तामध्यें इतकी सुधारणा झाली ह्मणजे बस आहे.

आता तिसऱ्या व चौथ्या यत्ता संबधानें:— तिसऱ्या यत्तेपासून पुढें व्यवहारांत उपयोगी पडेल अशा प्रकारचें शिक्षण देण्यास सुरवात व्हावी. अशा प्रकारचें शिक्षण देण्या करितां व्यवहारिक माहितीनें भरलेलें, असें एक पुस्तक अभ्यासाकरितां नमलें जावें. असे पुस्तक नुसतें बाक्षिस देऊन कार्य होणार नाहीं तर तें वर्गामध्यें वाचूनच घेतलें पाहिजे. अशा प्रकारचें पुस्तक तयार करिते वळीं पुढील गोष्टीचा समावेश त्यामध्यें करावा. वऱ्हाडचे नैसर्गिक कोणते भाग झाले आहेत ते द्यावे. नंतर अशा प्रत्येक भागामध्यें किती प्रकारची व कोणत्या प्रतीची जमीन आहे. ती नांगरून पेरण्यास कशी तयार करावी लागते, कोणत्या प्रकारच्या जमीनीमध्यें कोणकोणतीं पिकें येतात, तीं पिकें केव्हां व कशीं पेरावीं लागतात, बी कसें असावें लागतें, कोणत्या भागामध्यें कोणता जिन्नस जास्त पिकतो, खत जास्त झाल्यानें पिकाला कसा धोक येतो वगैरे गोष्टी संबधानें शेतकऱ्यास अवश्य लागणारी माहिती एका भागांत दिली जावी. नंतर वऱ्हाडचे जंगली व बिन जंगली असे दोन भाग करावे आणि अशा प्रत्येक भागा करिता पुस्तकांत निरानिराळा भाग असावा. जंगली वऱ्हाडाकरितां जो भाग असेल त्यामध्यें निरनिराळ्या उपयुक्त रानटी झाडांची थोडथोडी सचित्र माहिती द्यावी त्यां पैकीं इमारतीला उपयोगी पडण्यासारखी असतील त्यांची, एकीकडे शेतकामा करितां उपयोगी असतील त्यांची निराळी आणि औषधी असतील त्यांची एकीकडे द्यावी. या प्रमाणें झाडांचीं नांवें, त्यांचे उपयोग व तीं कोठें मिळतात याची त्या भागांत माहिती दिलेली असावी. बिनजंगली वऱ्हाडाकरितां या पुस्तकांत तिसरा भाग घालावा आणि त्या मध्यें बहुतकरून गांवोगांव सांपडणारी उपयुक्त झाडें व औषधी वनस्पती यांचीं नांवें, त्यांचे उपयोग इत्यादि दिले असावे. उदाहरणार्थ—बाभूळ ही बहुतकरून प्रत्येक गांवीं वाटेल तितकी असेत. तर बाभळीचे लांकूड, तिचा डिंक, साल व शेंगा यांचे व्यवहारांत काय काय उपयोग होतात याचि माहिती लहान लहान वाक्यांनीं दिलेली असावी. या तीन भागा शिवाय या पुस्तकामध्यें आणखी एक दोन भाग घालावे व त्यामध्यें एकंदर वऱ्हाड प्रांतामध्यें सर्प, विंचू वगैरे जे विषारी प्राणी आहेत त्यांचीं नांवें व त्यांजवर औषधी वनस्पति या प्रांतांत असतील त्या दिल्या जाव्या. अशा वनस्पति असल्याच पाहिजेत. कारण ईश्वराची लीला अशी कांहीं विचित्र आहे कीं त्यानें अनेकवार दुःख व त्याचा प्रतिकार ही एकत्र ठेवलेलीं आढळतात. रानोमाळ रात्रंदिवस फिरणाऱ्या शेतकऱ्याला याचा फार उपयोग होईल. तसेंच या प्रांतात मध्यें जे अरण्यपशू आहेत त्यांची माहिती व त्यांजपासून संरक्षण करण्याचे उपाय हीं दिलीं जावीं. तसेंच शेतीच्या बैलांची कशी जोपासना करावी, या प्रांतामध्यें उत्तम बैल कोठें होतात, तसेंच गुरांना कोणती दुखणीं होतात व त्यावर गांवठी उत्तम व खात्रीचे असे उपाय कोणते, तसेंच बैल छातींत दुखावला, कामानें शिणला, किंवा मोडला तर तो बरा होण्यास काय उपाय करावे, कोणत्या प्रकारच्या शेतास कोणतें खत चांगलें व तें कसें तयार करावें इत्यादि गोष्टीविषयीं सोपी माहिती दिलेली असावी आणि हें पुस्तक तिसऱ्या यत्तेपासून वाचनास ठेवावें. सारांश, शाळेमध्यें मुलगा ज्या गोष्टी शिकतो त्यांपैकीं प्रत्येक गोष्ट उपयोगाची आहे असें जेणेंकरून मुलांच्या आईबापांस वाटेल तशी व्यवस्था करावी. वऱ्हाडामध्यें पुष्कळ शेतकऱ्यांचीं मुलें आधीं शिकतच नाहींत, कारण ते स्पष्ट ह्मणून दाखवितात कीं तुमच्या शाळेपासून आमचीं मुलें खराब होतात. त्यांतून कांहीं शिकतात तीं चौथ्या यत्तेंतच शाळा सोडतात; करितां त्यांनीं अशा तऱ्हेचें व्यवहारामध्यें उपयोगीं पडण्यासारखें शिक्षण दिल्यास त्यांना शिक्षणाची गोडी लागण्याचा संभव आहे. आणि आमचीं मुलें खराब होतात

अशी जी शेतकरी लोकांचो तक्रार आहे ती नाहींशी करण्याकरितां अशी व्यवस्था करावी कीं जे गांव निवळ शेतकरी लोकांच्या वस्तीचे आहेत तेथील शाळा, एकवेळच्या कराव्या. ह्मणजे शेतकरी लोकांच्या मुलांस शेतांत काम करण्यास सवड सांपडेल. सोनार, शिंपी, लोहार, यांचीं मुलें एकवेळा मध्यें आपापले धंदे घरीं शिकतील आणि सध्या शाळेंतून बाहेर पडल्याबरोबर जी पंचाईत पडते ती पडणार नाहीं.

आणि व्यवहारिक भाग वाढविल्यामुळें तिसऱ्या व चवथ्या यत्तेंतील मुलांचे अभ्यास कदाचित एका वर्षांत आटोपणार नाहींत ह्मणून सध्या जी एक एक वर्षाची यत्ता आहे ती, जरूर पडल्यास, फक्त अशा शाळाकारितां मात्र, वाढवून दोन वर्षांची करावी किंवा सध्या असलेल्या अभ्यासापैकीं भूगोल, व्याकरण व कवितेचा अन्वयार्थ वगैरे शेतकऱ्यास फारसें उपयोगाचे नाहींत असे विषय काढून टाकोव. नकाशावरून शिकवितां येईल तेवढाच भुगोल शिकवावा. कविता फक्त गळ्यावर ह्मणावयास शिकवून इतर धड्याप्रमाणें अर्थ सांगत जावें. विशेष मेहनत बेऊं नये. वऱ्हाड प्रांतामध्यें निवळ शेतकरी लोकांच्या अशा पुष्कळ शाळा आहेत. आणि इतक्याशाळा करितां अशा तऱ्हेचीं व्यवस्था करण्यास कांहीं हरकत नाहीं.

तिसऱ्या यत्तेकरितां जें हें पुस्तक सांगितलें त्याशिवाय सध्या प्रमाणेंच चांगलें लेखन वाचन आणि व्यवहाराला उपयोगीं पडेल इतकें गणीत ह्मणजे त्रैराशिक आणिं व्याज हीं शिकविलीं जावीं, आणि कित्याचे मायने ठेवणें ते सध्या प्रमाणेंच पत्राचे असून शिवाय कांहीं पावतीचे, कर्जखताचे, मुखत्यार पत्राचें, नोटिशीचें असे तऱ्हेतऱ्हेचे असावे. आणि व्याजाचे हिशेब जास्त लक्षपूर्वक शिकवावे. या योगानें मारवाडी वगैरे लोकांकडून ते ठकविले जाणार नाहींत. शाळा एकवेळची केल्यावर शिक्षण सक्तीनें देण्याची व्यवस्था झाल्यास वाईट नाहीं. शेतकरी लोकां करितां फीचे दर माफक ठेवावे. या शाळेवरचा मास्तर त्या गांवचाच रहिवाशी असा एखादा शेतकरी ब्राह्मण किंवा कुणबी असावा. आणि तो धंदे शिक्षण किंवा शेतकी संबंधीं शिक्षण मिळालेला असून ट्रेनिंग कालेजांतील परीक्षा पास झालेला असावा. मास्तर त्याच गांवचा असून शेती संबंधीं शिक्षण मिळालेला असला ह्मणजे तो आपल्या शेतीमध्यें सुधारणा करील. ती सर्व मुलांस व गांवकरी लोकांस पहावयास सांपडेल. आणि या योगानें प्रत्येक शाळेला शेत जोडल्याचें अंशतः तरी श्रेय येईल. तसेंच मास्तर त्याच गांवचा असला ह्मणजे तो आपल्या गांवची विशेष काळजी घेईल आणि लोकांचाही त्याजवर भरंवसा बसेल.

परंतु जेथें पिकतें तेथें विकत नाहीं अशी ह्मण आहे. कित्येक वेळां असें होईल कीं मास्तर त्याच गांवचा असला आणि त्या गांवांत तंटेबखेडे असले तर त्याचें तेज पडणार नाहीं. आणि कदाचित् शाळेचेंही नुकसान होईल. अशा ठिकाणीं मास्तर परगांवचा असला तरी चालेल, त्याला शाळे जवळच एखादें शेत त्याच्या देखरेखी खालीं लागवड करण्यास मिळालें ह्मणजे झालें.

जर कोणास घरीं मिळतें त्यापेक्षां जास्त धंदे शिक्षण किंवा शेतकाम शिकावयाचें असेल तर त्यानें जिल्ह्याचे ठिकाणीं जावें व तेथें त्यास फुकट शाळेंत घेतलें जावें तसेंच ज्याला हायस्कूल किंवा कॉलेज मध्यें शिकावयाचें असा जर कोणी या शाळेंत असला तर त्यानें सायंकाळीं शाळेंत यावें आणि इतिहास व्याकरण वगैरे विषय शिकावे. याप्रमाणें खेडे गांवच्या आणि खालच्या प्रतीच्या शाळांची व्यवस्था असावी.

आता तालुक्याच्या व मोठ मोठ्या गांवच्या शाळा--येथील शाळेत एकंदर सहा यत्ता असाव्या. इंग्रजी शिकणारां करितां किंवा ट्रेनिंग कालेज मध्यें जाणारां करितां शाळा दोन वेळची असावी. बाकींच्या करतां एकवेळ असावी. खालच्या चार यत्ता मध्यें अभ्यास खेडे गांवच्या शाळा प्रमाणें असावा. आणि वरच्या दोन वर्गांत इतिहास, व्यवहाराचे दृष्टीनें उपयोगी पडणारा भुगोल, जमाखर्च, आरोग्य शास्त्र, व्याजाच्या पुढचे गणीत वगैरे विषय शिकविले जावे. या ठिकाणीं ६ वी यत्ता पास झालेल्या विद्यार्थ्याला ट्रेनिंग कालेजांत जातां यावें किंवा जिल्ह्याचे ठिकाणीं शेतकाम किंवा धंदे शिकण्या करितां जातां यावें.

( पुढें चालू )

गेल्या गुरुवारीं मुंबईस एक टोलेजंग जाहिरसभा भरली होती. दुष्काळ-फंड उभारण्यासाठीं ही सभा खुद्द गव्हरनर लार्ड सांडहर्स्ट यांच्या अध्यक्षतें खालीं जमली होती. हजारों माणसें या सभेनिमित्त एकत्र गोळा झालीं होतीं मुंबई सारख्या धनाढ्य व जगांतील अद्भूत शहरांत सरकारी अधिकारी, व्यापारी, व सुखवस्तु लोक आपापले हुद्दे, श्रीमंती, किंवा वैभव यांचा तोरा बाजूस ठेवून दुष्काळांतून देशबांधवांचा बचाव करण्याचे उपाय एकदिलानें योजीत होते. दुष्काळाचा प्रसंग मोठा कठीण आहे आणि तो निभणें ह्मणजे ईश्वरी कृपाच पाहिजे. तथापि ईश्वरी कृपेच्या वाटा किंवा खाणाखुणा मनुष्याच्या कृतींतच आढळावयाच्या असतात आणि या वाटा किंवा खाणाखुणा बुजूं न देणें किंबहुना त्या स्वच्छ व उज्वलित ठेवणें यांतच माणुसपणा आहे. तेव्हां मुंबई शहरांत सभेतल्या सभेंतच ४० हजार रुपये(वर्गणीचे आंकडे पडण्या पूर्वींच) गोळा झाले ही गोष्ट ऐकून तेथील धर्मात्म्या उदार सत्पुरुषांच्या मालिकेकडे दृष्टि गेली आणि त्यांच्या नामश्रवणानेंच मनाला मोठा आल्हाद वाटला. सरकार व रयत हीं उभयतां या प्रसंगीं अगदीं एक विचारानें एकाच विघ्नाच्या परिहारार्थ झटत आहेत असें मुंबईच्या सभेच्या हकिकती वरून वाटलें.

मुंबई इलाख्याच्या अधिपतींनें जें उत्तम उदाहरण घालून दिलें आणि लोकांच्या जाहिर सभेंत मनमिळाऊपणानें स्वतांकडे जी कामगिरी घेतली तें उदाहरण व ती कामगिरी इतर प्रांतांच्या अधिकाऱ्यांनीं स्मरणांत ठेवण्या जोगीं आहेत. दुष्काळ दाराशीं येऊन ठेपला तरी देखील त्या गोष्टीकडे कानाडोळा करून निभाव लागत नाहीं आणि चांगुलपणाही पदरीं येत नाहीं. रयतेचे प्राण रक्षणा शिवाय सरकारला अन्य कर्तव्य नाहीं आणि श्रीमान् लोकांस आपल्या भाईबंधांस मृत्यूच्या जबड्यांतून ओढण्या सारखा आत्मोन्नतीचा अन्य धर्म त्रैलोक्यांत नाहीं. सरकार व धनिक लोक यांच्या जुटीनें दुष्काळा सारख्या संकटांतून कसातरी निभाव लागतो. आमच्या आकोल्यांत मि. प्रीडो व येथील कांहीं प्रमुख मंडळी यांच्या श्रमानें दुष्काळाच्या आरंभीं एक सभा भरली होती पण तिची रचना बड्या थाटावर झाल्या शिवाय गत्यंतर नाहीं. आणि लवकरच मुंबईनें उदाहरण आकोल्यांतच काय पण सर्वत्र दुष्काळानें पीडिलेल्या प्रांतांतून अमलांत येईल अशी आह्मांस आशा आहे.

---

गेल्या सोमवारीं जबलपूर येथें व्हाइसराय साहेबांच्य यशस्वी हातनें एक नवीन जनाना–दवाखाना सुरू करण्यांत आला. हा दवाखाना काढण्याचें सर्व श्रय राजा गोकुळदास या गृहस्थांस आहे. हा धर्मात्मा पुरुष जबलपुराकडे विख्यांत आहे हे गृहस्थ इंग्रजी भाषे विषयीं मोठेसे अभिज्ञ नाहींत. नाहीं तर, मध्य प्रांतांतून निवडण्या-सारखा अन्य कायदे कौंसिलदार यांच्या तोडीचा विरळा मिळेल. या गृहस्थांनी मोठि उदार देणगी दिली आहे आणि ह्मणूनच २४ हजार रुपयांच्या व्याजावर हा दवाखाना चालणार आहे. स्त्रिया करितां दवाखाना स्थापित झाला ही मोठी आनंदाची गोष्ट होय तथापि अलिकडील राज्यव्यवस्थेमुळें आमच्या देशी वैद्यक-शास्त्राचें निर्मूलन होत चालले आहे इतकेंच नाहीं तर या नव्या नव्या रचनेवर काढलेल्या आणि विलायती वैद्यक, शास्त्रावर चालविलेल्या दवाखान्यांनीं आमच्या देशाचें मोठें अकल्याण होत आहे आणि या दवाखान्यांचाही व्हावा तसा चांगलासा उपयोग होत नाहीं. चालू प्रकारांतील ही अनिष्ट दिशा बदलण्याचे उपाय कोणी मुत्सदी सूचवील तर त्याचें आमच्या देशावर मोठे उपकार होतील.

---

इंग्लिश कालनी मध्यें इंग्लिश माल न खपतां युरोपांतील इतर राष्ट्रांचा माल पुष्कळ खपतो असें कळल्या पासून मि. चेंबरलेन यांनीं मोठी चळवळ चालविली आहे आणि त्यांचा हेतु इंग्लिश राष्ट्राचाच माल कालनीमध्यें खपावा असा आहे या हेतूला धरून त्यांनीं इतर राष्ट्रांतलि मालाची फिरतीं प्रदर्शनें विलायतेंत सुरू केलीं आहेत आणि त्या प्रदर्शनाच्या साह्यानें, इंग्लिश कारखानदारांनीं तसा माल तयार करून खपवावा असा मूळ उद्देश आहे. अप्रतिबंध व्यापाराचें तत्व मान्य आहे ह्मणून हा सर्व खटाटोप चालविला आहे पण इंग्लिश माल खपत नाहीं ह्मणून जर एवढें अकांड तांडव करावें लागतें तर इंडियाच्या लोकांनीं युरोपियन मालाचा मत्सर केला आणि देशी मालास उत्तेजन मिळावें ह्मणून सरकारापाशीं थोडीबहूत मदत मागितली यांत काहीं वावगें नाहीं. इंग्लंडची सर्वत्र सरशी आहे आणि ह्मणूनच अप्रतिबंध व्यापाराचा इतका मोठा आंव घालतात हें विसरलों नाहीं आणि हल्लींच्या वरील चळवळी लक्ष्यांत आणिल्या ह्मणजे अप्रतिबंध व्यापाराचें तात्पर्या पुरतें रामायण आहे असें लक्ष्यांत येईल.

---

ज्यांच्या जवळ जमीन जुमला नाहीं आणि ज्यांचा चारितार्थ हातच्या हातावर अशीं कुटुंबें प्रथम दुष्काळाच्या भयंकर जबड्यांत पडतात. सर व्हिलियम हंटर आणि लार्ड डफरीन यांच्या सारख्या मुत्सद्यांनीं देखील कबूल केलें आहे कीं इंडियांतील मोठा प्रजा समूह वरील कोटींत मोडतो आणि त्यामुळें दुष्काळा सारख्या ईतिसमुच्चयामध्यें इंडियाची अतोनात प्राणहानी होत असते. याशिवाय दुष्काळामुळें अनेक संकटें ओढवतात. मध्यम स्थितीतले लोक गाया बाया होऊन देशोधडीस लागतात, गांवचे गांव उठतात, लक्षावधि गुरें ढोरें मरतात, मनुष्यें भुकेमुळें पशुतुल्य बनतात, त्यांच्या अंतःकरणांतील सर्व प्रसन्नतेच्या ईश्वरी प्रेरणा नष्ट होतात लज्जा व शरम सर्व नष्ट होत आणि दंगेधापे व अपराध वाढतात. आणि सुधारणेचे चक्र शेंकडों वर्षे मागें फिरतें. मानवी सुधारणा इतकी मागें लोटली जाते ही हानि नामदार महादेव गोविंद रानडे यांच्या दृष्टीनें पुन्हा भरून येणारी नाहीं. खरोखरीच हें चित्र अगदीं अनुभवानें मनांत बिंबविलें आहे. तेव्हां इकडे सर्वांनीं लक्ष्य पुरवावें आणि ईश्वरानें स्वतांस दिलेल्या ऐपती बद्दल त्याचे आभार मानून त्याच्याच कृपेबद्दल आपल्या बांधवांस यथाशक्ति कृतज्ञतेनें मदत करावी ह्मणजे परमेश्वर आपली ऐपत चालू ठेवील हें प्रत्येकानें विसरतां कामा नये. नाहीं तर क्षणांत कांहींचें कांहींच होत असतें.

---

राष्ट्रीय सभेच्या समारंभाचे दिवस येऊन ठेपले. यंदा सभा भरलीच पाहिजे. पहिलें कारण दुष्काळ आणि दुसरें कारण आमची राजकीय उन्नती. दुष्काळा संबंधानें राष्ट्रीय सभेला उपाय सुचवावयाचे आहेत आणि या गोष्टींत सरकारची व लोकमताची एक वाक्यता होईल हें उघड आहे. गेल्या बारा वर्षांच्या प्रयत्न वृक्षाला फलोद्भव होण्याचा काल हाच आहे तव्हां अशा समयीं कितीही संकटें आलीं तरी आपली बाणी सर्व राष्ट्र भक्तांनीं राखली तरच आपल्या राष्ट्रीय सभेची सार्थकता होईल. यंदा मुखत्यार लोक कमी जातील असा संभव आहे आणि तसा प्रकार घडणें अगदीं रास्त आहे. तथापि त्यायोगानें राष्ट्रीय सभेची चळवळ कमी आहे असा अर्थ नाहीं. फक्त द्रव्याच्या प्रतिकूलतेमुळें पुष्कळ लोक लंगडे पडले असाच भावार्थ निघतो, द्रव्य, विद्या व राष्ट्रभक्ति यांच्या बलानें जे आमच्या पैकीं महात्मे बलिष्ट आहेत ते सर्व राष्ट्राची बाणी या सभेच्यावेळीं राखतील अशी सर्व जनसमूहास बळकट आशा आहे.

---

The Berar Samachar

MONDAY DECEMBER 21 1896

The recent failures of autumn—crops and the hopeless condition of the winter harvest present a serious problem. Where assessments are accord-

ing to new rates there the difficulty will be felt in the extreme. People have to suffer the strain of the time and to help their starving neighbours. These two circumstances form the first and the foremost duties of the people. They claim the predominence & we are afraid lest the people will find themselves unable to pay the land—tax in full and in time. The collection of land revenue will have to be begun in the next month and if Government demands the land—tax with rigour and pressure the next month will present a harrowing scene of grief and misery. Agriculturist will sell off property at nominal prices because they value land more precious than their life. The probable result is that the land—revenue will be collected in time and the government will run cherry with the notion that Famine does not exist in the province. If it existed it must have its ravages apparent and patent to all. Thus the situation presents a dilemma which the government should not ignore in the interest of the people as well as in the due discharge of their responsibility. Every precaution and practical wisdom will alone avert the danger and we await with anxious concern to see what steps our popular Commissioner takes in the matter of the collection of the land—revenue before we can offer our own suggestions after consultations with the leading gentlemen of the province. Suspensions and remissions are largely advocated from all centres of people's talk and public meetings; but even in this measure there are certain principles to be introduced so as to call upon people to contribute to the Famine—funds their quota of the land-tax.

The Deccan Sabha is doing an eminent service like its rival Poona—Sarvajanik Sabha in the direction of collecting facts regarding the distressed provinces and in the way of suggesting measures to check and mitigate the evils of the deadly foe-famine. In its latest representation, Deccan Subha has called upon the Government to stick to the free course of trade. The following quotation may be read with great interest while it should be kept in mind that the Deccan Subha requests the Government to help trade unions to import and provide food—stufs at cost prices:—

" The old combination of the speculative *Banias* is likely to aggravate this rise of prices and it is necessary that Government should take steps in anticipation to mitigate the evil consequences of the formation of such rings. One of the reasons assigned by the *Banias* for the late rise in prices was that several Native States within and beyond the frontiers of the Presidency had prohibited the free export of surplus stocks from their territories. The Council of the Sabha has made careful inquiries as to whether any such prohibition is really enforced by the authorities in Native states & it is Statisfied that such prohibition does exist in one form or another in several states. In some it is openly enforced, while in the case of some others, the result is achieved by the impression which prevails that no grain could be exported without the exporter bringing on himself the displeasure of the authorities The Council of the Sabha does not desire to mention names; it will however state in a general way that the ruler of a large state contiguous to Khandesh has actually published a Notification by which the exporter makes himself liable to the confiscation of the grain exported and the informer is paid a handsome reward out of the proceeds. In another State, while free export is nominally allowed the district officers have been warned that they would be held responsible that enough stocks remained for local food supply and seeds. The Council of the Sabha is not at all surprised that such prohibition is deemed desirable, as it is in keeping with old traditions, and it is moreover the one measure which the people themselves favour most at such a crisis, especially when general scarcity is apprehended. Even in the Presidency proper, local opinion often prevents such export outside the villages where the stocks abound, and in some places, even the subordinate officers of Government are reported to be encouraging this feeling of resistance to exportation, under the belief that with smaller stocks, their administrative responsibilities would increase. The matter, however, is one in regard to which Government have already pledged themselves to a right policy and no doubt ought to be allowed to remain in anybody's mind as to the nature and requirements of that policy. The Report of the Famine Commission also makes it obligatory on Government to take all necessary steps for removing the obstacles in the way of free exports and imports. The Council of the Sabha therefore trusts that Government will draw the pointed attention of their District and Political officers, and through the Government of India, of the Political officers outside the Presidency, to the fact that all hindrances to the natural movements of grain supplies are bound to be embarrassing and that the time has come when all necessary steps must be taken to secure free exports from one part of the country to another. "

We are glad to acknowledge the services which the Bombay Presidency Association is rendering to its country—men in a number of ways. The Indian emigrants to African colonies have their grievances of the worst type and the Association has taken upon itself to vindicate the rights of a British subject in the colonial possessions of Her Majesty the Queen Empress. The Hon. P. M. Mehtha quotes the lucid remarks of the London Times at the close of his memoral to the Secretary of State and we wish to request our readers to read that piece in a careful manner:—

" The question with which Mr. Chamberlain was called upon to deal cannot be so easily reduced to concrete terms. On the one hand, he clearly laid down the principle of the epual rights and equal privileges of all British subjects in regard to redress from foreign States. It would, indeed, have been impossible to deny that principle. Our Indian subjects have been fighting the battles of Great Britain over half the old world with a loyalty and courage which have won the admiration of all British men. The fighting reserve which Great Britain has in the Indian races adds greatly to her political influence and prestige, and it would be a violation of the British sense of justice to use the blood and the valour of these races in war, and yet to deny them the protection of the British name in the enterprises of peace. The Indian labourers and traders are slowly spreading accross the earth from Central Africa to the Australian Colonies, and from the Straits Settlements to the Canary Islands. Wherever the Indian goes he is the same useful, well doing man, law abiding under whatever form of Government he may find himself, frugal in his wants and industrious in his habits. But these very virtues make him a formidable competitor in the labour markets to which he resorts. Although numbering in the aggregate some hundreds of thousands, the emigrant Indian labourers and small dealers have only recently appeared in foreign countries or British Colonies in numbers sufficient to arouse jealousy and to expose them to political injustice. But the facts which we brought to notice in June and which were urged on Mr. Chamberlain by a deputation of Indians last week show that the necessity has now arisen for protecting the Indian labourer from such jealousy and securing to him the same rights as other British subjects enjoy. "

## वऱ्हाड

हवामान— थंडी पडते आणि गारठाही पुष्कळ आहे. रोगराई विशेष नाहीं. लोक दुष्काळाच्या चिंतेंत अधिकाधिक पडत आहेत.

मे० आर्बडे साहेब जुडिशियल कमिशनर यांनीं येथील आफिसांची तपासणी या आठवड्यांत केली. साहेब बहादूर फार चौकस आणि चाणाक्ष आहेत. तपासणी कांहीं झाल्या नंतर ते परत उमरावतीस गेले.

मि० प्रिडो डेपुटी कमिशनर अकोला हे जळगांवी दवऱ्यांत आहेत. नाताळाची सुटी तिकडेच होणार आहे.

गेल्या शुक्रवार पासून येथें सेशन कचेरी सुरू झाली. अकोल्या धर्मशाळेंत नारायण नांवाच्या परदेशानें आपल्या राखलेल्या औरतेच्या अल्पवयी मुलीचा वस्तऱ्यानें खून केला ह्मणून त्या नराधमास फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली.

आज रोजीं सेशनांत मलकापूर तालुक्यांतील मन्नू नांवाच्या इसमानें आपल्या बायकोस ठार मारल्याबद्दलची खटला चालणार आहे.

येथील नदीचें पाणी अती वाईट झालें आहे तर तें स्वच्छ करण्या साठीं म्युनिसिपालिटीनें अवश्य लवकर तजवीज करावी.

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९० रुपये |
| जवारी | ८६-८८ रु० |
| गहूं ( कांठे ) | ११२ रु० |
| ,,( बनशी ) | १२५रु० |
| चणे | १०० रु० |
| तेल ६॥= रु० मण | तूप ७ मण |
| सोनें | २६ तोळा |
| चांदी | ८७ |

### नोटीस

ह्या नोटिशीनें अकोलें येथील सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं म्युनिसिपल सेक्रेटरीनीं निवडणुकीचे ६ वे नियमा प्रमाणें मत देणाऱ्या लोकांची यादी सन १८९७।९८ सालाकरितां तयार करून नियम ७ प्रमाणें खालीं लिहिलेल्या ठिकाणीं त्याच्या नकला लाविल्या आहेत. नियम ६ प्रमाणें ज्याना मत देण्याचा अधिकार आहे अशा लोकांना विनंती करण्यांत येते कीं त्यांनीं आपली नांवें सदर्हू याद्यांत दाखल केलेली आहेत किंवा नाहींत हें पहावें आणि नियम ८ प्रमाणें त्यांची एखादी तक्रार असल्यास ती व ज्यांना दोन वार्डांत मत देण्याचा अधिकार असेल त्यांनीं आपण कोणत्या वार्डांत मत देणार हे तारीख १ माहे जानेवारी सन १८९७ चे आंत कळवावें.

१ मे. दिपुटी कमिशनर साहेब याची कचेरी.
२ स्मालकाज कोर्ट
३ तहसील कचेरी
४ काटन मारकेट.
५ धान्य आठवडे बाजार.
६ चावड्या.
७ पोलीस स्टेशन.
८ लोखंडी पूल.
९ टौनहाल.

आकोला ता० १७।१२।९६

Shankar, Govind.
सेक्रेटरी अकोला म्यु० कमिटी

### NOTICE

It is hereby published for the information of the public of Akola that the lists of voters prepared by the Secretary for the year 1897—98 under rule 6 of the Berar Municipal election rules are posted as required by rule 7 at the following places.

Persons entitled to vote under rule 3 are requested to see their names included in the lists posted and make complaints if there are any under rule 8 and also choose ward in which they wish to vote in case they are entitled to vote in two wards under section 5 before the 1st January 1897.

Names of places where the lists are posted.

1 The Deputy Commissioner's office
2 Tahasili
3 Chowaries
4 Police Station
5 Cotton Market
6 Weekly Market
7 Morna Bridge
8 Town Hall
9 Small Cause Court

Dated Akola 17—12—96

Shankar Govind
Secretary
Municipal Committee
Akola.

### WANTED

Temporary sub-overseers and maistrees for about 6 months for Akola District Board's works likely to be commenced from 1st January 1897.

Salaries according to qualifications.

Apply to and see as soon as possible with copies of testimonials.

District Board, Akola.
VICE—CHAIRMAN

## वर्तमानसार.

ब्रह्म देशांतून यंदा १ कोटी ४० लक्ष टन तांदूळ दुसऱ्या भागांत पाठवितां येतील.

हिंदुस्थानसरकारांनें, पूर्वींचे २६॥ लक्षां-खेरिज आणखी १० लाख रुपये वायव्येकडील प्रांतांत रयतेस तगाईदाखल कर्जाऊ देण्याचें ठरविलें आहे.

निजामसरकारानें आपल्या राज्यातल्या दुष्काळाची व्यवस्था लावण्याकरितां मि. डनलाप नांवाच्या साहेबाची नेमणूक केली आहे हे साहेब सांगतात कीं, पीक बहुतेक बुडालें आहे पण त्यांत दक्षण भागांत जास्त बुडालें आहे. या दक्षण भागांत ३० लाख लोकांची वस्ती आहे. भाबुमनगर जिल्ह्यांतील लोकांची स्थिति फारच वाईट झाली आहे. नोव्हेंबरच्या आरंभापर्यंत त्यांस पावसाची आशा होती. व त्याकरितां रबीच्या पेऱ्यास जमिनी नांगरून तयार केल्या व कित्येकांनीं पेरण्याही केल्या. खरीपाचें पीक साफ बुडाल्यामुळें ८२ ही झालें नाहीं. तरी अजून पाऊस पडल्यास बराच फायदा होईल अशी मि. डनलाप यांची अटकळ आहे. कारण खरिपाचा उभ्या शेतांस थोडा फायदा होऊन रबीचे पेरे होण्याचाही संभव आहे. पण इ॰क्यांत जर पाऊस पडणार नाहीं तर हा दुष्काळाचा बोजा निजामसरकारास पुष्कळ दिवस सोसावा लागल यांत कांहीं शंका नाहीं. आज जरी महागाईवांचून दुसरें कांहीं दिसत नाहीं तरी पावसावांचून एकेक दिवस निघून जात असल्यामुळें पुढचें भयंकर चिन्ह दिसूं लागत आहे. धान्याचा पुरवठा फारच कमी नसतां महागाई झपाट्यानें वाढत चालली आहे, पाण्याचा तोटा दिसत आहे, आणि चारा कसा पुरेल याची काळजी लागली आहे. हा असा प्रकार झाल्यामुळें लागलीच स्पेशल दुष्काळ कामदार नेमले, विहिरी, रस्ते व कालवे करण्याचीं दुष्काळकामें सुरूं केलीं तरी पुढील चिन्हे भयप्रदच दिसत आहे. तुळजापूर तालुक्यांतले फार मोठे जे भुई मुगाचें पीक तें साफ बुडालें आणि पाऊस न पडल्यामुळें रबीचा एक दाणाही पिकणार नाहीं अशी स्थिती झाल्यावर त्या भागांत पाऊस पडला व त्यामुळें पेरलेल्या रबीच्या पिकास फायदा झाला व सर्व लोक नव्या पेरण्या करण्यांत गढून गेले आहेत. धान्याचीही थोडी स्वस्ताई झाली. नळदुर्ग जिल्ह्यांतील परंडा तालुक्यांत मात्र चांगला पाऊस झाला नाहीं. त्या तालुक्यांत फक्त ६६ सेन्ट पडला व त्याचा कांहींच उपयोग नाहीं. २ दिसेंबरच्या रपोटांत मि डनलाप सांगतात कीं, अलीकडे पाऊस पडल्यामुळें बरीच सुधारणा झाली आहे. १९ नोवेंबर रोजीं व त्यानंतर जो पाऊस पडला तो सर्व ठिकाणीं पडल्यानें बराच फायदा झाला आहे. पेरलेले रबीचें पीक बहुतेक निभावल्यासारखें असून गहू, हरबरा, व ज्वारी याचे पेरे होण्यासही चांगली सोय झाला, तैलंगणांतील रबीचें पीक तळ्यातल्या पाण्यावरही होण्यासारखें आहे. कांहीं भागांत अझूनहा चाऱ्याचा तोटा राहिलच, तरी एकंदरीनें भयंकर दुष्काळाची भीति आतां राहिली नाहीं असें मि. डनलाप यांचें ह्मणणें आहे-

निझामानें आपला कांहीं मुलूख इंग्रज सरकारास गहाण द्यावा व दुष्काळ निवारणाकरितां लाखों रुपये कर्ज काढावे, अशी निझामांचा पगार खाणाऱ्या निझामाच्या पदरच्या एका कामदारानें निझाम सरकारास एक सूचना केली असल्याचें बाहेर आलें आहे असें सांगतात. ही सूचना फार चमत्कारिक आहे आणि मतस्वातंत्र्याचें थोडें पुढें करून असली सूचना पुढें आणणाऱ्या निमकहराम कामदारास निझामानें आपल्या चाकरींत ठेवण्या पेक्षां त्यास एकदम धक्के मारून आपल्या राज्यांतून घालवून द्यावें हेंच चांगलें दिसतें. निझामाच्या राज्यांत हल्लीं जो दुष्काळ सुरू झाला आहे त्याचे निवारण करण्याची जबाबदारी निझामावर आहेच, आणि त्या निवारणास लाखों किंवा कोट्यावधी रुपये खर्च करावे लागतील हेंही खरें असून तितकी रकम आज निझामाच्या खजिन्यांत कदाचित शिलकही नसेल. पण त्या कारतां अन्य सौम्य उपाय योजण्याच्या भानगडींत न पडतां तुह्मी आपलें राज्य सावकाराकडे कब्जेगहाण द्या असें सांगणें ह्मणजे अगदीं मूर्खपणाचें असून निझामाचा अपमान करणें आहे. ज्यानें ही अती मूर्खपणाची सूचना पुढें आणलीं ता विचार करतां तर हिंदुस्थानांत आच जो दुष्काळ आहे त्यांच्या निवारणार्थ जितका पैसा लागेल तितका आज हिंदुस्थान सरकारच्या खजिन्यातही शिलक नाहींच, पण पंजाबपांत काश्मीर सरकारास अग पर्शियाच्या शाहास गाहाण देवून पैसे काढून दुष्काळाकडे खर्च करा अशी हिंदुस्थान सरकारास सूचना करणारा हिंदुस्थान सरकारच्या ताब्यांतला एकादा चीफ जास्टिस पुढें आलेला नाहीं हें त्यांस सहज समजलें असतें. एकाद्या चीफ जस्टिसनें हिंदुस्थान सरकारास तशी सूचना केली असती तर त्याची फटफजीती करून लागलीच त्यास हाकूनही लावलें असतें असली सूचना करणारे हे नुसते महामूर्ख नसून खाल्लच्या घरचे वासे मोजणारे समजलें पाहिजेत. त्यांस कांहीं शहाणपण असतें तर दुष्काळा करितां पैसा जमविण्यास दुसऱ्या पुष्कळ व चांगल्या युक्त्याही सुचविता आल्या असत्या. वऱ्हाड प्रांताच्या कारभाराचा खर्च भागून जी लाखो रुपयाची रकम निजामाच्या नांवानें हिंदुस्थान सरकाराकडे शिल्लक आहे ती सक्ती करून वसूल करून घेण्याचा हा पहिला व उत्तम उपाय आहे. वऱ्हाडचा खर्च भागून शिल्लक रहाणारी रकम वेळच्यावेळीं परत देण्यांत येईल अशा शर्तीवरच जर वऱ्हाडचा कारभार हिंदुस्थान सरकारानें आपल्या ताब्यांत घेतलेला आहे तर खर्च भागून शिल्लक राहाणारी रकम आपल्यां जवळ ठेवण्याचा हिंदुस्थान सरकारास मुळीच अधिकार नाहीं, आणि निझामानें अशा रीतीनें मागणें केल्यावर आणि दुष्काळा करतां त्या रकमेची आज फार गरज आहे असें स्पष्टपणें सांगितल्यावर ती रकम देण्यास हिंदुस्थान सरकार कां कूं करील असेंहि वाटत नाहीं या करितां निझामानें आपला दुसरा मुलूख गहाण ठेवून इंग्रज सरकार कडून पैसा काढावा असली कैदेची मूर्ख सूचना पुढें आणण्याच्या बद्दल वरील सूचना पुढें आणली असती तर अगदीं रास्त व न्यायाचें झालें असतें य फाजील निझामनोकरास ती सूचना पुढें करण्या धैर्य नव्हतें तर त्यांणें उगीच तरी बसावयाचें होतें, अगर तुमचा खासगी खजिना य वेळीं बाहेर काढा, अगर बड्या कामदाराच्या पगारांत कटकाटी करा, असें कांहीं तरी सांगावयाचें होतें. बाकी खरें पाहिलें तर वरील सूचना करणारा जर न्यायखात्यांतला नोकर आहे तर त्यास भानगडींत पडण्याचें मुळीं कारणच नव्हतें. दुष्काळांत करतां आमच्या जवळ पैसा नाहीं असें निझामानें कधीं सांगितलें होतें काय? नसेल तर तसल्या अभद्र सूचना काय ह्मणून पुढें आणाव्या!

अ. द.

सुलतानाबद्दल मुसलमानांचा अभिमान—बां. ग्या. पत्राच्या बातमीदारानें मुंबईतील एका मुसलमान धर्माधिकाऱ्याची थोडें दिवसापूर्वीं भेट घेऊन टर्कीच्या सुलतानाबद्दल मुसलमानचा काय ग्रह आहे ह्याची चांचणी घेतली; त्यांत त्याणें सांगितलें कीं-"मुसलमाना पैकीं सिया असेत किंवा सनी असोत; खलीफवर सुलतानावर जर कोणी गलीम चालून, येई, तर त्या करिता हिंदुस्थानातील सर्व मुसलमान लोक आपसातील कोणताही भेदाभेद मनात न आणता तुटून पडल्या शिवाय कधीं कधीं रहाणार नाहींत." सुलतानास मारकरी ह्मणणारानीं व पाहावें ह्मणजे झालें!

पटकीचें भविष्य —प्रसिद्ध युरोपियन ज्योतिषी झडाकिल बुवा याणीं असें भविष्य वर्तविलें आहे कीं—पुढल्यावर्षी दिजंबरच्या पूर्वीं हिंदुस्थानांत जबरदस्त माहामारीचा वाखा सुरू होणार आहे. हें कर्णकठोर भविष्य आधिव्याधींनीं पोळून गेलेल्या हिंदुस्थातांतील लोकांस चिंताग्रांत लोटील हें सांगण्यास नकाचे.

गोव्यांतील पुंडाई—दंगेखोरापुढें गोव्यातील फौजेनें हात टेकले! फौजेची डाळ मुळींच शिजत नाहीं. कोर्टाच्या बजावणीचीं कामें बंद पडली. बेलीफ लोकांस मदत देण्याबद्दल जज्जांनीं ऑडमिनिस्टेटर यांस लिहिलें होतें, परंतु दंगेखोर येऊन मला केव्हां चतुर्भुज करतील याचाच नेम नाहीं; मग मी तुह्मास मदत काय करणार? असें त्यांनीं लिहून पाठविलें ! सातोंर येथील जंगलांत झाडें तोडण्यास अधिकाऱ्यांचे हुकमानें कांहीं लोक पाठविले होते. राणे मंडळीनें त्यांचे कान कापून त्यांस हांकून दिलें. दादा राण्यानें कांडेनोर गांवीं सरकारच्या फौजेवर हल्ला करून २ सोजीर ठार केले ह्या प्रमाणेच बेतूळ येथील कस्टम कचेरीवर राजाराम सावंत यानें हल्ला करून तेथील हत्यारें व हजार रुपये नक्त रकम नेली ! एका यात्रेवर जिवबा राण्यानें ३०० लोकांनिशी हल्ला करून कृष्णभट डोंकेकर, गोपाळ नाईक पनवेलकर वगैरे बरेच असामी कैदी करून नेले आहेत असें समजतें.

प्रत्येक सिंहस्थाचे वर्षी उज्जनी क्षेत्रामध्यें मोठि यात्रा जमत असतें. पण चालू सालीं ग्वाल्हेर दरबारनें अशी जाहीर खबर दिली आहे कीं—(१) यंदा पाऊस परेसा न पडल्यामुळें पिकें बुडून फार महर्गता झाली आहे ह्मणून उज्जनी क्षेत्रांत सन १८९७ साली जी यात्रा भरावयाची होती ती बंद केली आहे (२) ह्या बंदीचे हुकूमास न जुमानतां जर कोणी यात्रे करूं उज्जनीला जातील तर त्याना कोण याही सवबीनें तेथें राहूं दिलें जाणार नाहीं. हा ग्वाल्हेर दरबारचा ठराव मुंबई सरकारानें तिकडील गव्हनर जनरलचे एजट साहेब ह्या विनंतीवरून या इलाख्यामधील सर्व लोकांना जाहीर होण्या करिता प्रसिद्ध केला आहे.

दी. बं.

नोटीस

नोटीस--मे० आयनाद्दिन वा. फकिरोद्दिन काजी राहणार पुसद जिल्हा वाशीम यांस.

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं आपलें माझ्याशीं लग्न झाल्यास सुमारें दहा वर्षे झालीं. तेव्हां पासून कायते ६ महिने पर्यंतच मला तुह्मी आपले घरी राहूं दिलें. त्यापुढें तुमचे कडून संसार सुख मुळींच मिळालें नाहीं. या नंतर तुह्मी माझा तिरस्कार करून माझे आंगावरील दागिनें मारहाण करून काढून घेतले व मला घराबाहेर घालवून दिलें. यामुळें आतां पर्यंत (२॥ वर्षे) मी आपले बापाचे घरीं कर्ज काढून निर्वाह केला या बाबतींत माझे बापास दरमहा ५ रुपये प्रमाणें झालेलें कर्ज ९७० रुपये ही नोटीस पावल्या तारखेपासून १५ दिवसाचे आंत देऊन मला न्यावें. मी येण्यास राजी आहे. तसें न केल्यास मी दुसरा घरोबा करीन मग तुमचा मजवर कोणतेही प्रकारें वारसा चालणार नाहीं व हीच फारकती समजून सदरहू ९७० रुपये मिळण्या विषयीं दिवाणींत दावा केला जाईल.

सही.

(सही) हयातबी मर्द आयनोद्दिन
हिचे हातची निशाणी बांगडी


## विक्रीस तयार

## SAPKAR'S DIARY FOR 1897 WITH A CALENDAR FOR 1897

## सापकराची रोजनिशी, सन १८९७ सालाकारतां

हींत मराठी तिथी, वार, महिने, सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण, सरकारी ऑफिसांस व दिवाणी कोर्टास असणाऱ्या सुट्ट्या, मौंजीविवाहांचे मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखा, रेल्वे, तारायंत्र, स्टॅंप, मनीआर्डर, पोस्ट, मुंबई बॅंकेच्या रूळी, सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टॅंप, कोर्ट फी, पोलिस गाईड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचे पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि नेहमीं जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचें कोष्टक दिलें आहे. अखेरीस जमा खर्चाच्या सदराचीं व कांहीं कोरीं पृष्ठें जाडलीं आहेत.

रोजनिशीची किंमत.

प्रत नंबर १..................८१२ ८२
प्रत नंबर २ ..................०८ ८१॥
प्रत नंबर ३ ..................८७१॥

किंमती बद्दल रोख पैसे आह्माकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल

भाऊ गोविंद सापकर, ज्ञानचक्षूचे मालक.


☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास ....................... ०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ......०१ ०६
दुसरे खेपेस ......... ०१

Six monthly........ 3 ...... ... ...., 8
Single copy ........... ....... ... 4

Advertisement.
Below 10 lines ... 2 R
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

YOL XXX AKOLA MONDAY 28 DECEMBER 1896 NO 50

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख २८ माहे डिसेंबर सन १८९६ इ० अंक ५०

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दो रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १०।७।९६. } R. Aitken Agent

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध १० शके १८१८

## प्राथमिक शिक्षण

( रा. रा. गणेश रामचंद्र दामले. बी. ए. नीं लिहिलेला )

नंबर ३

आतां जिल्ह्याच्या ठिकाणच्या शाळांची व्यवस्था येणेंप्रमाणें असावी—या ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारच्या विद्यार्थ्यांकरितां निरनिराळे वर्ग असावे. ह्मणजे ज्याला इंग्रजी शिकून पुढें हायस्कुलांत किंवा कॉलेजांत जावयाचें असेल अशा मुलांकरितां निराळे वर्ग असावे आणि ज्यांना मराठी शाळेवर मास्तर व्हावयाचें असेल किंवा आपले स्वतंत्र धंदे शिकावयाचे असतील अशा मुलांकरितां निराळे वर्ग असावे. इंग्रजीच्या वर्गासंबंधीं आपणास मुळींच विचार करावयाचा नाहीं. या दुसऱ्या प्रकारच्या वर्गाची व्यवस्था अशी असावी. येथें तालुक्याच्या शाळांप्रमाणें ६ यत्ता असून शिक्षणही तितकेंच असावें. येथील शाळेला एक धंदे शिक्षणाची शाखा आणि एक शेत जोडलेलें असावें. येथून ट्रेनिंग कॉलेजमध्यें जाणारे जे विद्यार्थी असतील त्यांनीं येथील वर्गांत ५ वी व ६ वी यत्ता शिकावी आणि शिवाय दररोज एकदोन तास आपल्या आवडीप्रमाणें शेतकामाकडे, किंवा सुतार, शिंपी, लोहार, यापैकीं कोणते तरी एखादें काम शिकण्याकरितां जावें. ज्यांना नौकरी मुळींच करावयाची नसेल त्यांनीं पाहिजे तर ४ थी यत्ता पास झाल्याबरोबर धंदे शिक्षणाच्या शाळेंत जावें किंवा शेतकाम शिकण्याकरितां जावें. शेतकाम शिकविणारा मास्तर चांगला शिकलेला असा निराळा असावा. शेतकाम शिकणारे जे विद्यार्थी असतील त्यांनीं शेतावरचे सर्व काम स्वतां करावें ह्मणजे गुरें, ढोरें संभाळणें, शेत नांगरणें, खत तयार करणें, बीं तयार करून पेरणें, शेत वखरणें, पिकाला खत घालणें, अजारी गुरांना औषध देणें, वगैरे. असें काम त्यांजकडून करून घेतल्यानें त्यांना कामाची संवय होईल आणि या शेतकामाच्या शाळेला खर्चही थोडा लागेल आणि या शेतावरचें कावाड कष्टांचें बहुतेक काम ज्या अर्थीं मजुराप्रमाणें विद्यार्थी करणार त्या अर्थीं सर्व विद्यार्थ्यांना शेताच्या उत्पन्नाच्या स्कॉलरशिपा ठेवाव्या.

शेतकामाची शाळा ही एक वेळची तास दोन तास असावी. आणि त्या वेळीं शेतकीच्या कले संबंधीं कांहीं पुस्तकें वाचून घेतलीं जावीं. आणि जनावरांची आरोग्य रक्षण विद्या शिकविली जावी. येथील अभ्यासाचा काळ दोन किंवा तीन वर्षांचा ठेवावा आणि सर्व शिक्षण मराठी मधून असावें हें सांगणें नकोच.

धंदे शिक्षणाच्या शाळेमध्यें सुतार कामाचा, शिवण कामाचा, लोहार कामाचा व चांभार कामाचा असे चार प्रकार असावे पहिल्या वर्षीं जाणाऱ्या विद्यार्थ्यांस फुकट शिकवावें परंतु दुसऱ्या वर्षा पासून त्यांच्या कामाच्या मानानें त्यांना स्कॉलरशिपा दिल्या जाव्या. सुतार काम शिकणाऱ्या मुलांना ड्राइंग शिकवावें ह्मणजे वस्तु पाहून तिचे चित्र काढणें आणि चित्रा प्रमाणें वस्तु तयार करणें ही कला शिकवावी. जिल्ह्याच्या ठिकाणच्या शाळेला या प्रमाणें धंदे शिक्षणाचे व शेतकामाचे वर्ग जोडल्यावर शेतकरी लोकांच्या मुलांस शेती संबंधीं शिक्षण मिळेल आणि सुतार, लोहार, शिंपी व चांभार वगैरे लोकांच्या मुलांस आपापले धंदे शिकतां येतील.

आतां प्रांताच्या शाळा संबंधानें—प्रांताची शाळा ह्मटली ह्मणजें आपलें अकोल्याचें ट्रेनिग कालेज होय. या ठिकाणचा अभ्यास काळ तीन वर्षांचा ठेवावा. आणि या ठिकाणीं भाषा इतिहास, अर्थशास्त्र, हिंदुस्थानची सांपत्तिक द्रव्यें, इंग्लंडच्या व हिंदुस्थानच्या इतिहासाची तुलना आणि हिंदुस्थानच्या प्राचीन व अर्वाचिन राज्यपद्धतीची तुलना इत्यादि विषय ठेवून शिवाय शिक्षण कला व शाळेची व्यवस्था ठेवण्याची कला शिकविली जावी. जिल्ह्याची शेत कामाची शाळा आणि धंदे शिक्षणाची शाळा या कॉलेजाला जोडून असाव्यात. ट्रेनिंग कालेजामध्यें विद्यार्थी घ्यावयाचें ते जिल्ह्याच्या ठिकाणीं सहावी यत्ता पास झालेले आणि धंदे शिक्षणाच्या किंवा शेतकीच्या शाळेंतील एका वर्षाचा अभ्यास केलेले असावे. ज्यांनीं एखाद्या धंद्याचा अभ्यास कालेजांत येण्य पूर्वीं केला असेल त्यांनीं कालेजांत आल्यावर दररोज एक दोन तासप्रमाणें सतत तीन वर्षे शेतीकडे जावें आणि ज्यांनीं अगोदर शेती संबंधीं अभ्यास केला असेल त्यांनीं येथें आल्यावर सतत तीन वर्षे धंद्याकडे जावें अशी व्यवस्था केल्यावर सध्यां जे ड्राईंग सर्वांना शिकावें लागतें तें फक्त सुतार कामाकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकावें लागेल. बाकीचे लोक त्या वेळांत आपापल्या इष्ट विषयाकडे जातील. या एका तासाशिवाय दुसरा एखादा तास या धंदेशिक्षणा करितां किंवा शेतकीच्या शिक्षणा करितां ठेवावा ह्मणजे झालें. या प्रमाणें ट्रेनिंग कॉलेजांतील प्रत्येक मास्तरला धंदेशिक्षण व शेतकाम येण्याची आवश्यकता काय ? असा प्रश्न कदाचित् कोणी करील. त्याचें उत्तर थोडक्यांत देणें जरूर आहे. याचें पहिलें कारण असें कीं विद्यार्थी व्यवहारज्ञ होण्यास मास्तरही तसेंच असले पाहिजेत. दुसरें कारण असें कीं या निबंधाच्या कल्पने प्रमाणें शिक्षकांना पूर्वी सांगितलेलें व्यवहारिक माहितीचें पुस्तक शिकवावें लागेल, तें त्यास नीट शिकवितां आलें पाहिजे. याला तिसरेंही एक कारण आहे तें असें. खालच्या प्रतीच्या मराठी शाळांवर जे मास्तर असतात ते सांगण्यासारखे विद्वान नसतात आपली विद्वत्ता भासविण्या इतपत त्यांचे अंगीं सामर्थ्य नसतें ह्मणून त्यांची खरी किंमत गांवकरी लोकांस कळत नाहीं. आणि धंद्याच्या व शेतकरी लोकांस पाहिजे असतें तें आपल्या मास्तर लोकांस येत नाहीं. यामुळें दोघेही एकमेकांस तुच्छ समजतात. गांवांतील लोकांना येतें तें येऊन जेव्हां आपल्या मास्तर लोकांना दोन गोष्टी जास्त येतील तेव्हांच त्यांचें वजन बसेल आणि आपल्या शाळा लोकप्रिय होतील. या ठिकाणीं एक सूचना कराविशी वाटते. अकोल्याचें ट्रेनिंग कॉलेज आणि उमरावतीची धंदे शिक्षणाची शाळा यांचा संयोग जुळवून आणण्याची जर कांहीं युक्ति निघेल तर त्यापासून बराच फायदा होईल. धंदे शिक्षणाच्या शाळेला फुकट ५०।६० विद्यार्थी मिळतील. ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांना फुकट धंदे शिक्षण मिळेल आणि गांवोगांवच्या लोकांस एखादी उपयुक्त कला अवगत असलेले मास्तर मिळतील. अशा एखाद्या मास्तरानें फुरसतीच्या वेळीं जर नांगर व वखर धरण्याचा किंवा शेतकीचीं कामें तयार करण्याचा कारखाना काढिला किंवा लोकांस नव्या चालीचीं कपडे शिवून देण्याची सोय केली तर तो कितपत लोकप्रिय होतो आणि त्यापासून त्याच्या शाळेला कितपत फायदा होतो याचा थोडक्याच दिवसांत अनुभव घ्यावयास सांपडेल. शिवाय लहान पगारांच्या मास्तरांना ही मोठीच मदत होईल. आणि पेन्शन घेतल्यावर त्यांना एक उपजीविकेचें साधन होईल.

आतां या निबंधामध्यें जी शिक्षण क्रमाची कल्पना सुचविण्यांत आली आहे ती अमलांत आणण्यास बराच खर्च लागेल. त्या संबधानें लिहावयाचें राहिलें या निबंधाच्या कल्पने प्रमाणें सहा जिल्ह्याच्या ठिकाणीं सहा शेतकीच्या शाळा आणि सहा धंदे शिक्षणाच्या शाळा घालाव्या लागतील. या बारा संस्था चांगल्या चालण्यास चांगले शिकलेले हुशार मास्तर आणावे लागतील. एकंदर खर्च किती लागेल हें बरोबर सांगतां येणें कठीण आहे. तरी पण कांहीं अंदाज करितां येतो. उमरावतीच्या धंदे शिक्षणाच्या शाळेचा खर्च अडीच हजारां पर्यंत जाईल असा अंदाजा आहे. पुण्याच्या म्युनिसिपल कमिटीच्या धंदे शिक्षणाचा खर्च तीन हजार आहे. ह्मणून प्रत्येक धंदे शिक्षणाच्या शाळेचा खर्च ३ हजार रुपये धरिला तर सालाचे अठरा हजार रुपये होतात. आतां शेतकीच्या शाळांचा खर्च काय होईल तो पाहूं. पुण्याच्या सायन्स कालेजमध्यें जो शेतकीचा वर्ग आहे, त्या वर्गांत शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला सालाचे ६२५ रुपये लागतात. हा खर्च फारच अवाढव्य झाला. तेव्हां ती शिक्षणाची रीत आपल्या उपयोगाची नाहीं परंतु सिंध हैद्राबादेस तेथील लोकल बोर्डाचा शेतकीचा क्लास आहे तेथील प्रत्येक विद्यार्थ्याचे मागें सालाचा ६२॥ रुपये खर्च येतो. येथें शिक्षण फक्त देशी भाषेंत दिलें जातें. अशा प्रकारचे प्रत्येक शाळेंत तीन क्लास धरिले आणि प्रत्येक क्लासांत वीस विद्यार्थी धरिले तर एका शेतकीच्या शाळेचा वर्षाचा खर्च ३७०० रुपये झाला व अशा सहा शाळांचा खर्च सालिना सुमारें २३ हजार रुपये लागेल. हे तेवीस हजार आणि धंदे शिक्षणाच्या शाळांचे अठरा हजार मिळून एकंदर सालाचे ४१ हजार रुपये लागतील. आतां हे ४१ हजार रुपये मिळण्याचा कोणता मार्ग आहे हें पाहूं. वऱ्हाडची जमाबंदी पुन्हा सुरू आहे. या जमाबंदीचे वेळीं शेंकडा ३२ पासून ५० पावेतो सारा वाढत आहे. वऱ्हाडची एकंदर जमाबंदी सुमारें पाऊणशें लाख रुपये आहे. यावरून सुमारें १५ लाख रुपये वाढतील असा अंदाजा आहे. या पैकीं विद्याखात्याच्या वाट्यांचा रुपया मागें पैसा धरिला तरी सुमारें सालाचे चाळीस हजार रुपये झाले. या मधून आपल्याला जास्त लागणारा

खर्च भागेल असें वाटतें. कदाचित थोडा बहूत जास्त लागल्यास वऱ्हाड सार्वजनिक सभे सारख्या लोकांच्या तर्फेच्या मंडळीनें तो मिळण्या बद्दल खटपट करावी.

ज्या सूचना मी वर केल्या आहेत त्या पैकीं कांहीं माझ्या आहेत व कांहीं इतरांच्या आहेत. कोणतीहि कल्पना झाली तरी तिच्या मध्यें कांहीं कमीपणा असतोच. तो अनुभव घेतल्यावर काढून टाकावा लागतो. तसेंच कोणतीही कल्पना कितीहो चांगली असली तरी ती एकदम प्रचारांत येत नाहीं. हर्बर्ट स्पेन्सर सारख्यांच्या कांहीं कल्पना चांगल्या असूनही अद्यापि त्या प्रचारांत आल्या नाहींत याचें कारण त्या बाबतींत सर्व समाजाचें अद्यापि एक मत झालें नाहीं हें होय. शिक्षणक्रमामध्यें सुधारणा व्हावयाची ती एक दोघांच्या किंवा चार चौघांच्या विचारानें होण्या सारखी नाहीं तर त्या बाबतींत समाजाचें एकमत व्हावें लागतें. आणि कोणत्याही विषया संबंधानें सर्व समाजाचें एक मत होण्यापूर्वीं बरेच दिवस ह्या विषयाचा उहापोह व्हावा लागतो. ह्मणून या विषया संबंधानें कांहीं लोकांचें जें ह्मणणे आहे तें आपणा सर्वांच्या विचारा करितां पुढें मांडलें आहे.

---

यंदा सारखा दुष्काळ लोकांच्या आठवणींत पूर्वीं कधी नव्हता असें ह्मटलें तरी चालेल. हिंदुस्थान देशाचा केवढा अवाढव्य विस्तार पण हा सर्व मुलूख एकाच कालीं दुष्काळाच्या तडाक्यांत सांपडला या सारखें राष्ट्रीय दुर्भाग्य तें कोणतें! या संकटांत रशियाचे लोक देखील इंडियाला साह्य करण्यास उद्युक्त आहेत. पण सध्यां प्रश्न इतकाच कीं इंग्लंड कडील आमचे प्रजाबंधु (जे आमच्याच देशावर सावरलेले आहेत ते) या प्रसंगीं किती मदत करितात आणि आपल्या बंधुत्वाच्या नात्याला जागतात हें पाहण्याची ही वेळ येऊन ठेपली आहे. अद्याप त्या देशांत कोठेंच भूतदया जागृत झाल्या सारखी दिसत नाहीं तथापि ऐन वेळेवर निदान या सत्कार्यीं आमचे राज्यकर्ते माणुसकीला विसरणार नाहींत. अशी उमेद बाळगून आह्मी निमूटपणें सर्व देखावा पाहत आहों. तोंडी भूतदया पुष्कळ असते पण कृतीमध्यें ती प्रत्यन्तरास कितपत येते याची आतां परीक्षा आहे.

---

इंडियांत लोकवस्ती फार वाढली आहे ह्मणून द्वीपान्तराला गमन करण्याचा उपाय नेहमीं सुचवीत असतात. पण आमच्या देशचे काळे लोक जे आफ्रिकेंत गेले त्यांचे किती हालअपेष्टा चालल्या आहेत आणि इंग्लिश कालनीवाले कसे प्रजाबंधुत्वाला तिलांजली देतात याचा विचार केला ह्मणजे अंगावर शहारे उभे राहतात. लार्ड डफरिन थोडे दिवसा पूर्वीं ह्मणाले तें कांहीं खोटें नाहीं. धर्मन्यायाचा विजय कोठेंच नाहीं. सर्वत्र बळी तो कान पिळी हाच नियम लागूं पडतो. याच धोरणावर मद्रास रिव्ह्यूमध्यें एका आफ्रिकेंत असणाऱ्या गृहस्थानें एक नामी उपाय सुचविला आहे. तो उपाय असा कीं इंडियांतील काळ्या मनुष्यास त्रास दिला तर त्यानें फिर्यादी अर्यादीच्या नादीं पडूं नये. शेरास सव्वाशेर या न्यायानें धटिंगणपणा आणि भालेरावी चालविली पाहिजे. ह्मणजे सर्व गोष्टी सुयंत्र चालतात.

---

सामाजिक परिषद् येत्या गुरुवारीं राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरणार आहे ही मोठी संतोषकारक गोष्ट होय. गुदस्ता पुणेंकरा सारख्या उच्छृंखल लोकांनीं अगदीं तुमूल युद्ध केलें आणि राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक परिषद् भरूं दिली नाहीं. गत वर्षीं विघ्नसंतोषी लोकांच्या तोंडांत साखर घालण्या साठींच आणि राष्ट्रीय सभेला अकल्पित विघ्नें येऊं नयेत ह्मणून मोठ्या दूरदर्शिपणानें रावबहादूर महादेव गोविंद रानडे यांनीं सामाजिक परिषद् निराळ्याच उभारलेल्या मंडपांत भरविली होती. पण अविचाराचा पगडा फार वेळ कायम राहिला नाहीं आणि बाह्यतः सामाजिक परिषद् व राजकीय परिषद् यांचा निराळेपणा दाखविला तरी त्या उभयविध राष्ट्रीय चळवळीचें अंतरंग एकच आहे असें लवकरच निदर्शनास आलें हें फार उत्तम होय. आपल्या राष्ट्रीय उन्नतीचीं सामाजिक सभा आणि राजकीय सभा अशीं दोन मुख्य अंगें आहेत पण उन्नतीचा रथ सारखा चालण्यास हीं दोन्हीं चक्रें बरोबर समान्तरतेनें चाललीं पाहिजेत. गेल्या वर्षींचा गोंधळ यंदा कलकत्यास माजला नाहीं आणि पूर्व पाठा प्रमाणेंच सामाजिक परिषद् राष्ट्रीय सभेच्या मंडपांतच भरविली जाणार आहे हा मोठाच लाभ होय. पुण्याच्या स्थानिक विकृतीचा लभ झाला आणि प्रकृतिस्वभावार पुन्हा लोकांचीं मनें आलीं हें पाहून सर्व राष्ट्रभर आनंद मानण्यास कारण झालें आणि विचाराचा व सत्यनिष्ठचा जयजयकार झाला हें वस्तुस्थितीला अनुसरूनच झालें. बाबू नरेंद्रनाथ सेन हे यंदा सामाजिक परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारतील आणि बाबू दीनानाथ गांगुली हे सेक्रेटरीचें काम पहात आहेत. तारीख ३१ रोजीं मोठी सभा भरून नानाविध विषयांचें विवेचन होईल तथापि विषयांची योजना तारीख २८ व २९ रोजीं दोन उपसभा भरून होणार आहे. विषय सर्व मागें प्रसिद्ध केल्या प्रमाणेंच कायम आहेत.

---

राष्ट्रीय सभेच्या १२ व्या वार्षिक समारंभास आज दोन प्रहरीं प्रारंभ होईल. मागील वर्षाप्रमाणें यंदाचा समारंभही निर्विघ्नपणें तडीस जाईल असें आजपर्यंतच्या बहुसाळ पण सुयंत्रित कार्य-व्यवस्थे वरून अनुमान आहे. यंदाच्या राष्ट्रीय सभेविषयीं मोठी काळजी पडली होती पण राष्ट्राभक्तांऔत्सुक्यामुळें व परिश्रामुळें सर्व गोष्टी चांगल्या जुळून येत आहेत. कधीं कधीं असाही प्रश्न निघतो कीं दरसाल इतक्या मोठ्या ह्मणजे ४०।५० हजार रुपये खर्चानें राष्ट्रीय सभा भरवूं नये पण या संबंधानें असा पक्का निर्णय झाला आहे कीं आणखी कांहीं काल पर्यंत राष्ट्रीय सभा सालोसाल भरविल्या शिवाय ही चळवळ सार्वत्रिक व चिरायू होणार नाहीं. खर्च कांहीं कमी केल्यास हरकत नाहीं पण राष्ट्रीय सभा वर्षानुवर्ष भरलीच पाहिजे. हल्लीं मि. ह्यूम साहेबांनीं ब्रिटिश-कांग्रेस-कमिटीच्या खर्चासाठा मोठ्या उद्वेगानें लोकांस वर्गण्या पाठविण्याविषयीं मागणी केली आहे.

---

यंदा दुष्काळ पडला आहे आणि सरकारच्या साऱ्याची मागणी तर दाराशी येऊन ठेंपली. ज्यांची शेती निदान रुपयांत आठ आणे तरी पिकली आहे. ते शेतकरी साऱ्या विषयीं मोठीशी कुरकूर करणार नाहींत- पण ज्यांची शेती पिकली नाहीं किंवा जें उत्पन्न झालें आहे तें ज्यांच्या सालभराच्या बेगमीपूरतें नाहीं त्यांस सरकारी सारा देणें ह्मणजे जीवावरचें संकट वाटणार आहे. सरकारी सारा माफ होईल अशी काडीमात्र आशा नाहीं. फक्त यंदाचा बोजा पुढील सालावर लोटण्यांत आला ह्मणजे रयतेचें मोठें भाग्य होय. पण चालू वर्षी कुळांस साऱ्याच्या बाबदींत कांहीं सवलती मिळाल्या पाहिजेत हें उघड आहे. या सालीं पिकें कांहीं चमत्करिक रितीनें आलीं आहेत. कोणा शेतकऱ्यास सोळा आणे पीक आलें आहे आणि कोणास रुपयांतलें चार आणे देखील पीक नाहीं. तेव्हां अशा स्थितींत सरसकट सर्वत्र गुडघाभर पाणी या न्यायानें सरासरी काढणें मोठ्या चुकीचें होईल आणि सरकारी रीत तर उत्पन्नाची सरासरी काढण्याची आहे. सर्व रयतेनें एकत्र होऊन फोडलेला टाहो सरकाराच्या काना पर्यंत पोंचत नाहीं किंवा सरकार या बाबदींत बुद्धिपुरस्सर बहिरेपणाचें सोंग आणितें. तशांत नव्या तरमबंदीचा वाढता सारा यंदा वसूल करण्यांत येणार आहे आणि हा वाढलेला सारा शेंकडा १३३ रुपयाहून कमी असा कोठेंच नाहीं.

या बाबतींत आमच्या एका सन्मान्य मित्राची सूचना अशी आहे कीं प्रत्येक खातेदारानें आपल्या शेतीची हालहवाल सरकारास लेखी अर्जानें विदित करावी आणि साऱ्या संबंधानें स्वतांस जी दाद पाहिजे असेल ती त्यांत नमूद करावी. ही सूचना फार नामी आहे. आपल्या शेतांत पीक किती आलें, किती माणसांचा त्या शेतीवर चरितार्थ चालावयाचा आहे, सरकारी सारा किती पडतो, आणि दाद कोणती पाहिजे याचा कोष्टकवार तक्ता भरून तो प्रत्येक कुळानें तहशिलदार साहेबाकडे रवाना करावा. अशा रितीनें कांहीं दाद लागण्याचा संभव आहे. या प्रयत्नाला सरकारानें जुमानलें नाहीं तर लोकमत सरकाराला स्वीकारण्यास लावण्याचे निराळे प्रकार आहेत त्यांची योजना करावी लागेल.

---

सोलापुरचे नांवाजलेले कलेक्टर रा. रा. लक्ष्मणराव गोपाळ देशमुख बी. ए. यांस कायमची कलेक्टरी लवकरच मिळेल असा सार्वत्रिक समज होता तो समज खोटा ठरला इतकेंच नाहीं त्यांस असिस्टंट कलेक्टराच्या दर्ज्यावर परत वाईट हवेच्या कानडी मुलुखांत विद्युत्संदेशानें रवाना केलें. ही बातमी मुंबई इलाख्यांतच काय पण राष्ट्रभर पसरताच नेटिवांच्या हक्काची पायमल्ली केली, सद्गुणराशीला मातीमोल केलें, आणि राजभक्ताच्या उत्तम सेवेला तिलांजली दिली असा सर्वत्र एकच ध्वनीप्रतिध्वनी ऐकूं येऊं लागला. मुंबई सरकाराला या नेमणुकीपेक्षां अन्य लाजिरवाणी नेमणूक करितां येणार नाहीं. सत्ताधारी पुढें शहाणपण कोणचेंच चालत नाहीं. एकंदरीनें ही गोष्ट फार वाईट घडली.

---

The Berar Samachar

MONDAY DECEMBER 28 1896

Primary education in Berar is in a backward state and is being crippled for want of funds. The funds that were at the disposal of the Local Boards were withdrawn and though Rao Bahadur S. B. Jatar C. I. E. was asking for the wide spread of primary education the local Government deemed it advisable to take away the allowed grants from the Local Boards for the purposes of administrative expenses. Because there was a large deficit in the total revenue and the wants of the administration both civil and military had to be satisfied somehow the balances of primary education were utilized to make up the deficits. Rao Sahib S. V. Patwardhan must be finding himself in a strange position because with all his anxious and careful cantrol of the department he could hardly promote primary education to a satisfactory extent. His annual report is silent upon this point—but silence may be golden when his hands are tightened under the stringent orders of the Resident. In Berar administration is an expensive job and the wonder is that no proper pre-caution is taken to allot reasonable fund towards education. Besides, in a province where masses of people do not know the simple reading, writing and recknowing, education to the extent of three R. s. at least should be as free and attractive as possible. But the real case stands otherwise. The local Government fails in their duty towards the people and we are sorry we cannot move the Government in this direction. With the increase in the land—tax there is a corresponding increase in the expenses of the highly spending administrative machinery and we are afraid that the progress of primary education will be as unsatisfactory as before. We are gradually feeling the necessity of the amalgamation of Berar in the Bombay Presidency and unless this event takes place we are growing hopeless of a possible reform in the Berar administration.

---

It is a pleasure to note that the system of Local—self. government which Lord Ripon initiated, is bearing a golden fruit in India. The principle of election introduced to bring on the municipal and local boards men of lead and education has salutary effects upon the administration of these local bodies. The Residency Orders in the last issue publishes the resolution of the Government of India in this connection. It is restricted to the working of the municipal institutions wherein people first learn the alphabets of political education. The resolution is on the whole a satisfactory memorandum. Though municipalities are not yet people's institutions with full rights and privileges and though the official element rules supreme in most of them still it is gratifying to find that the present success is the stepping stone to further achievements in this direction. Let our readers observe how the Governor—General observes with satisfaction the general result of the noble policy of Lord Ripon—the father of Local—self government in India:—

"He has observed with much satisfaction the marked advance in self—government during the last ten years which this examination has disclosed, and the activity, intelligence and general economy with which the municipal bodies have improved the conservancy services, the water—supply, the drainage, the street—paving, the lighting, and the many conveniences of the town in their charge. These objects are all excellent and some of them absolutely necessary to the health and comfort of the residents, and he is assured that in the furtherance of all such projects the committees wil l continue to show the energy and assiduity which they have shown in the past to the great advantage and benefit of their fellow citizens. He is, however, also assured that where municipal taxation has been lately and considerabely incresed, projects which involve an addition to it will be considered with circumspection and a careful regard to the circumstances of the tax—poyers."

The Akola Municipal Committee has had under consideration a proposal to levy an indirect tax known as *Octioi.* The following principles are laid down by the supreme Government to regulate this incidence of taxation. We quote them for our readers with a view to prepare them to meet or oppose the above—mentioned proposal as the case may be:—

"The standards of consumption of the various taxable commodities which Local Governments prescribe cannot claim to be accurate, but they afford a rough and approximate test of the extent to which any particular article may legitimately be subjected to octroi in each municipality. Wherever the rates of consumption of any taxable commodity in towns situated on the main trade routes show an excess above the prescribed standard of consumption, the excess is assumed to be in a rough way the measure of the extent to which the octroi on that article is becoming a transit duty; and we urge in those cases either the establishment of bonded warehouses for ahe protection of the through trade or the abolition of the octroi on the through traffic in the commodity in question. In towns off the main trade routes, where the trade is more distributory than through, the standards are not so rigidly insisted on, because the people who use the market roads, &c, may reasonably be expected, even though they do not live in the town, to contribute to a certain extent to the municipal expenditure devoted to the maintenance of those objects of which they reap full advantage. At the same time we insist on low rates of octroi in such towns, and provide that any one claiming a refund, unless it be of an insignificant amount, shall receive it. The maximum non-refundable duty is fixed so low that no appreciable hardship is inflicted on the contributor."

The meteoroligical changes are unsettled and we think we shall have rain in the immediate future. It is interesting to consult as well the following forceast of the winter—rains:—

"(1) The precipitation or snowfall in the Punjab and Kashmir Himalayas and the Afghan mountains will very probably be at least normal, and probably in excess. If the vertical pressure anomalies for the area repre sented by Chakrata and Ranikhet are correct it is probable the snowfall in the Central Himalayas will not be above the normal; and, on the other hand, it is probable it will be at least normal in amount in the Eastern Himalayas.

(2) The winter rains in Upper India (from December to February) will very probably be at least normal, and probably in slight to moderate excess.

(3) It is probable that the winter precipitation in the Gangetic Plain will be about normal, and very probable it will not be above the normal.

(4) It is very probable the rainfall of the next four months will be in slight defect in Assam and perhaps Bengal.

(5) It is, on the whole, very probable the rainfall in Central India and Central Provinces will not be above the small normal of the period, and probably it will be below it.

The general inference is that the indications are, to some extent, conflicting, but that, on the whole, they are favourable in North—Western India. Rainfail will hence probably be normal or above it in Upper India, and probably normal or in slight to moderate defect in North—Eastern and Central India."

## वऱ्हाड

हवामान—थंडीचा जोर कमी झाला आहे. अभ्रें येतात आणि क्वचित् पावसाचे थेंबही पडतात. आतां पावसाचा उपयोग होवो किंवा न होवो, पाऊस साधारण तरी पुढील पंधरवाड्यांत होईल असा रंग दिसतो. रोगराई विशेष प्रकारची कोणतीच नाहीं.

गेल्या सोमवारीं सेशनांत मलकापूर तालुक्यांतील येरळी येथील मन्नु नांवाच्या इसमानें आपल्या बायकोचा सदोष वध केला असें ठरल्यावरून त्यास आमरण काळे पाण्याची शिक्षा देण्यांत आली.

मि. सी. शेषाचिलम मुदलीयार. तहशिलदार वर्ग २ यांनीं पेनशन घेतल्यामुळें त्यांच्या जागीं खालील बढती देण्यांत आल्या आहेतः—

| रा. रा. | तहशिलदारीचा वर्ग |
|---|---|
| बळवंत बाळकृष्ण सुळे आफि. एक्स्ट्रा असि. कमि. | २ रा |
| विनायक अप्पाजी | ३ रा. |
| शेर महमदखान | ४ थॉं. |

शिकंदराबादेस मि. ए. वुलियमस, फर्स्ट आसिस्टंट रेसिडेंट यांच्या समोर एक चमत्कारिक फौजदारी खटला चालूं आहे. व्हुइटटेकर नांवाच्या एका विवाहित बाईला नवऱ्याच्या गैरहाजिरीत गर्भधारणा झाली पण तें पोट व्यभिचाराचे असल्यामुळें औषधोपचारानें गर्भपात करून घेतला आणि त्या गर्भपाताच्या यातनेंतच ती बाई मरण पावली. ह्मणून त्या प्रकरणांत टेंपलटन नांवाच्या इसमावर फौजदारी चालली आहे. कामचेष्टांचीं कथानकें असलींच!

मुंबई युनिव्हरसिटीच्या म्याट्रिक्युलेशन परीक्षेला ३३७५ उमेदवार होते त्या पैकीं १२२८ विद्यार्थी पसार झाले. त्यांत आकोला हायस्कुलांतून १५ विद्यार्थी गेले होते त्या पैकी खालील आठजण पसार झालेः—

गोविंद कृष्ण बावरेकर, पुंडलीक श्रीकृष्ण भस्कत, वामन विश्वनाथ दांडेकर, शामराव खुशालराव देशपांडे, त्रिंबक मार्तंड गुप्ते, नरहर गंगाधर जोशी, गणेश कृष्ण जोगळेकर, दत्तात्रय प्रल्हाद मुनशी.

खानगीतूनः--दत्रात्रय हरी दाते, लक्ष्मण बळवंत माडीवाले.

उमरावती हायस्कुलांतून ३१ विद्यार्थी गेले होते त्या पैकीं २० पसार झाले. एकदरींनें दोन्ही हायस्कुलांचा निकाल चांगला झाला.

बी० ए० च्या परीक्षेंत खालील वऱ्हाडचे विद्यार्थी पसार झाले आहेतः—शंकर पांडुरंग करकरे, दिगंबर कृष्ण कोल्हटकर, श्रीपाद बळवंत तांबे, जतकर, आणि दवे.

फर्स्ट एल० एल० बी०--गोपाळ रघुनाथ तळवळकर.

पी० इ०-- रघुनाथ गोविंद दामले ( संस्कृत प्राइझ ) वर्ग १ ला, ब्रह्म, अभ्यंकर नेने, गणेश नारायण काळे, केतकर, मोहोळकर, क्षीरसागर, टीपनीस, संजाना.

मि० बुलक साहेब कमिशनर, यांची स्वारी वाशिम, मंगरूळपीर, कारंजा वगैरेकडे फिरत आहे.

डाक्टर लिटल सानिटरी कमिशनर आणि मि० गाडविन आस्टिन डेपुटी कमिशनर, इलिचपूर हे नाताळाची सुटी बोरगांवास घालवीत आहेत.

उमरावतीसही एक बालवक्तृत्वोत्तेजक सभा आहे तिचा तेरावा समारंभ येत्या १३ व्या तारखेस आहे. जुनी वक्तृत्वोत्तेजक सभा मुख्यत्वेंकरून उमरावतीच्या व इतरत्र लोकांच्या हातून लयास गेली ह्मणून त्यांस लाजविण्यासाठींच ही बालसभा विद्यार्थ्यांनीं काढली आहे असा भास होतो. पण विद्यार्थी वर्गणीसाठीं दारोदार व गांवोगांव हिंडण्यांत वेळ दवडतात आणि त्या पैशाच्या बलावर रात्रौ दीपोत्सव करून वर्गणदारांपैकीं कित्येक गृहस्थांचीं मने रिझवितात हा प्रकार चांगलाच आहे असें निदान आमचें मत नाहीं. उमरावतीच्या सभेचा एक दूत हल्लीं आकोल्यास आला आहे.

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९० रुपये |
| जवारी | ८४-८५ रु० |
| गहूं ( कांठे ) | ११२ रु० |
| ,,( बनशी ) | १२५रु० |
| चणे | १०० रु० |
| तेल ६॥ रु० मण | तूप ७ मण |
| सोनें | २६ तोळा |
| चांदी | ८७ |

### नोटीस

चिरंजवि राजश्री हनुमंत त्र्यम्बक, माटरगांव यांस

वडिलांच्या हयातींत व मागेंही आजतागाईत आपण एक विचारानें वागलों व एकत्र राहिलों आणि हल्लींही तोच क्रम चालूं आहे. इस्टेटी संबंधानें भांडण तंटा होऊ नये आणि परस्परामध्यें द्रव्याच्या कारणानें वितुस्ट पडूं नये ह्मणून आपण सलोख्यानें व सरळ प्रेमभावानें इस्टेटीच्या वांटणी विषयीं देखील करार मदार करून ठेविलें आपला आपसांत बेबनांव होऊं नये ह्मणून या सर्व व्यवस्था केल्या. परंतु परस्परा विषयीं अंतःकरणें शुद्ध असतांना देखील कांहीं लबाड व कार्यसाधु लोकास आपला एकोपा व सुस्थिती पहावत नहीं. तुपचा स्वभाव भोळसर पडल्यामुळें तुह्मी सहजी दुसऱ्याच्या भुलथापीला फसतात आणि लबाड लोक तुह्मा पासून वाटेल तसे दस्त करून घेतात दुनियेदारीला तुह्मी नवीन आहा ह्मणून कळवितो कीं तुह्मी माझ्या सल्या शिवाय कोणत्या व्यवहारांत पडूं नये. तुह्माला तुमची चुकीचीं कामें बंधक होऊं नयेत ह्मणून मी निराळी जाहिरात दिली आहे. ती ध्यानांत आणावी आणि मनांत विघाड येऊं न देतां एकत्रपणानें आपल्या कृत संकल्पा प्रमाणें वागण्यात चुकू नये. या उपर तुमची मर्जी ! कळावें हा आशिर्वाद. तारीख २७ माहे डिसेंबर सन १८९६ इ.

सही

केशव त्रिंबक कुळकर्णी राहणार माटरगांव हल्ली मुक्काम आकोले दस्तूर खुद्द

## जाहिरात.

जाहीरखबर सर्व लोकांस कळविण्याकरितां प्रगट केली जाते कीं त्र्यंबक राजाराम कुळकर्णी वस्ती माटरगांव बुजरुक तालुके खामगांव, जिल्हा आकोला हे हल्लीं मयत आहेत त्यास वारिस पुत्र दोन आहेत. पहिला दत्तविधान करून घेतलेला केशव आणि दत्तविधानानंतर झालेला औरस पुत्र हणुंमत असे दोघे आहेत. वडिलांच्या मरणानंतर उभयतां वारसांनीं आपल्या समजुती प्रमाणें इस्टेट जरूर पडल्यास विभागून घेण्याचा संकेत करून ठराव केला तो असा कीं, पहिल्या वारसास सर्व इस्टेटीपैकीं रुपयातील सहा आण्याचा हिस्सा आणि दुसऱ्या औरस वारसास दहा आण्याचा हिस्सा देण्यांत यावा. हा ठराव स्थावर जंगम, देणेंघेणें व वतनवाडी वगैरे सर्व इस्टेटीस लागू केला आहे. या ठरावाप्रमाणें वांटणी उभयतांमध्यें बेबनाव झाल्यास करावी असें आहे. सांप्रत वरील औरस वारस हणुंमतराव यांची वृत्ती अव्यवस्थीत झाली आहे. हल्लींच्या एकत्रपणांत सर्व इस्टेटीची व्यवस्था खालीं सही करणार केशव त्र्यंबक याजकडे वडीलपणाच्या नात्यानें आहे. पण हल्लीं असे कळतें कीं हणुंमतराव हे व्यवस्थापकास न विचारतां परभारें लेख लिहून स्वतास बद्ध करून घेत आहेत याकारितां सर्वत्र लोकांस अशी खबर देतों कीं चिरंजीव हणुंमतराव याच्या एकट्याच्या मतानें जो व्यवहार घडला असेल व घडेल तो इस्टेटीस लागूं न होतां रद्द समजला जाईल. आणि तो व्यवहारोपयोगी राहणार नाहीं.

या शिवाय लोकांस अशी विनंती कीं, राजश्री हणुंमतराव यांशी एकट्याशीं कोणी कोणत्याही प्रकारच्या देवघेवीचा व्यवहार ठेवूं नये. जर कोणी ठेवील तर त्याची जबाबदारी समाईक इस्टेटीवर राहणार नाहीं. कळावें. तारीख २७।१२।९६ इ०

सही

केशव त्र्यंबक कुळकर्णी माटरगांव दस्तुर खुद्द हल्लीं मु. अकोलें दस्तुर खुद्द-

## वर्तमानसार.

ग्वालीयर नांवाची जर्मन आगबोट ब्रेमेनहून बुयनोस आयरस येथें जात होती, ती वाटेंत फुटून तिच्यावरील २७६ मनुष्यें बुडून मेलीं

अमेरिकेंत शिंप्याकडे बेतून घेण्याचें एक विजेनें चालणारें यंत्र निघालें आहे. ह्या यंत्राचे योगानें दररोज दोनशें पासून तीनशें कपडे बेतून कापतां येतात.

रशियाच्या झार साहेबांनीं असा एक हुकूम सोडला आहे कीं रशियांतल्या रेल्वेच्या सगळ्या डायरेक्टरांनी हिंदुस्थानच्या दुष्काळासाठीं जमलेलें धान्य मोफत न्यावें आणि तें जहाजांत भरीपर्यंत सुरक्षित ठेवावें. श. सु.

तुर्कीचें राज्य युरोपांतील स्वतंत्र राष्ट्रांनीं वाटून घ्योंव अशा ज्या गफा निघाल्या होत्या त्याला सणसणीत उत्तर हवे असल्यास रशियन सरकारानें आस्ट्रो हंगेरियन सरकारास पुन्हां ह्या बाबतींत नुकतेंच दिलेल्या बातमीवरून कळणार आहे. रशियन सरकारचें असें ह्मणणें आहे कीं, तुर्की विरुद्ध जुलमाचे उपाय योजण्यास आपण तयार नाहीं आपण सर्वस्वी त्यांच्या ( अशा उपायांच्या) विरुद्ध आहें. तुर्की संबधांत कोणत्या प्रकारची राज्यरीती रशियानें स्वीकारिली आहे हें सेन्टपिटर्सबर्ग येथील विडोमेस्टी नामक पत्रांत आलेल्या लेखावरून स्पष्ट होणार आहे. हा लेख बहुतेक सरकारच्याच मताला अनुसरून आहे असा सर्वत्र समज आहे. किंबहुना सरकारी अधिकाऱ्यांच्या लेखणींतूनच निघाला असावा असा तर्क आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं, टर्की रशियन लढाईनंतर तुर्कस्थानाच्या राज्यकारभारांतील कोणत्यहि बाबतींत युरोपानें दाखल करूं नये अशी रशियानें खबरदारी ठेविली आहे. त्यांत असेंहि लिहिलें आहे कीं, "इंग्लंडास टर्कीपासून वेगळें पाडण्यांत आह्मांस यश मिळालें आहे. त्याचे आटोमन सरकार जवळ आतां मुळींच वजन राहिलें नाहीं, व रशिया शिवाय टर्कीच्या सामन्याला दुसरें कोणीही नाहीं. युरोपांतील दुसऱ्या कोणत्या ही राष्ट्राचा आधार राहिला नाहीं असें पाहून व रशियावर सर्व अवलंबून राहावें लागत आहे असें समजून आमचीं प्रत्येक मागणी तुर्की राज्यास कबूल करावी लागेल ह्यांत बिलकूल शंका नको. इतकेंच नाहीं तर कदाचित थोडक्याच कालांत ह्यास रशियाच्या अगदीं ताब्यांत राहण्याची पाळी येणार आहे. ही प्राच्य प्रश्नाची नवी स्थिति पाश्चात्य सरकारास पूर्णपणें अवगत आहे; त्यांस रशियाचें वर्चस्व कबूल करावें लागत आहे इतकेंच नव्हें तर तुर्कस्थान हें यूरोपांतील एकंदर राष्ट्रांचें हित साधण्यास एक जागा आहे असे हल्लीं ते उठविण्याच्या प्रयत्नांत आहेत, कारण असें झालें ह्मणजे १८९३ प्रमाणें जुन्या हिशेबाची फेड व्हावी ह्मणून रशियास तुर्कीशी नव्हे परंतु युरोपांतील राष्ट्रांशीं डार्डिनलिझममध्यें झगडावें लागेल. हा हेतु साधण्या करितां पहिली गोष्ट ह्मटली ह्मणजे आटोमन कर्जाचे काउन्सिलमध्यें रशियाचा प्रतिनिधी नेमणें ही होय. काळ्या समुद्रांत आपले कायमचे वर्चस्व स्थापन करण्याकरितां रशिया आज २०० वर्षें झगडत असून अव्याहत परिश्रम करीत आहे. अर्थात अशा कामीं रशिया माघार घेऊन काळ्या समुद्रांतील व डार्डिनलीझ सामुद्रधुनीतील आपले वर्चस्व कमी करून घेऊन युरोपियन राष्ट्रांच्या ओंजळीनें पाणी पिईल हें शक्य आहे काय?

टर्की सरकारानें इटली व फ्रान्स यांच्या ह्मणण्याप्रमाणें आर्मीनियास माफी देण्याचे कबूल केलें आहे.

परदेशीं व्यवहार करण्यास मनिआर्डरचा भाव रुपयास १ शिलिंग ३। पेन्सचा ठरविण्यांत आला आहे.

इंग्लंड चालूं महिन्यामध्यें २ लक्ष पौंड इजिप्त सरकारास देणार असून पुढेंही जरूर लागेल त्याप्रमाणें कर्ज देणार आहे. स. वि.

फौजेच्या खर्चा करतां गहाण घेतलेल्या वऱ्हाड प्रांताचा राज्यकारभार कसा उधळपट्टीचा चालला आहे. हें मागें सांगितलें. आतां पायोनियर पत्रावरून समजतें कीं, वऱ्हाड प्रांताचा जमीनधारा लवकरच २९ टक्यांनीं वाढविण्यांत येणार आहे. हल्लीं वऱ्हाडची जमीनधाऱ्याची जमाबंदी ६० लाख आहे ती मग ७५ होईल. न्याय व नीती याकडे पाहिलें ह्मणजे हा १५ लाखांचा वाढवा निवळ निझामाच्या पदरांत गेला पाहिजे, पण वऱ्हाडचे प्रत्येक खातें उधळपट्टीनें चाललें आहे हें जें मागें दाखविलें आहे त्याच मानानें या १५ लाखांचीही चढणी करण्याचा बेत आहे असें दिसतें. ज्या कन्टिजन्ट फौजेच्या खर्चाकरता हा प्रांत गहाण घेतला आहे त्या फौजेचा खर्च १८६० साली २४ लाख रुपये होता, पण १८९६।९७च्या बजेटांत त्याच फौजेच्या खर्चास ह्मणून ४१,२३,००० रुपयांची रकम घातली आहे असें सांगतात. फौज पूर्वीच्या इतकीच आहे व तितक्याच फौजेच्या खर्चाचा बोजा निझामावर असल्यामुळें फौजेची संख्या जास्त करण्याचा अधिकारही नाहीं ज्या फौजेच्या खर्चाकरतां आजपर्यंत २४ लाख रुपये खर्च होत होता ती फौज फार चांगली तरबेज आहे असें १८६० सालापूर्वीं बंडाच्या वेळीं व दुसऱ्या कांहीं वेळीं चांगलें अनुभवासही आलेलें आहे. तेव्हां आतां त्याच फौजेच्या खर्चाचा आकडा २४ लाख होता तो एकदम ४१ लाख होणें ह्मणजें निझामाचा पैसा फसारी उधळून टाकणें आहे या कन्टिन्जन्ट फौजेचा खर्च जर ३५ वर्षांनीं दुप्पट होतो तर हिंदुस्थानसरकारच्या फौजेचा खर्चहीं या मुदतींत दुप्पट झाला असला पाहिजे. तो दुप्पट झाला आहे काय ? नसेल तर हा कन्टिन्जन्टचा कां व्हावा? आणि तो खर्च वाढविण्याकरतां २५ टक्के जमाबंदी वाढविणें ह्मणजे त्या प्रजेस विनाकारण त्रास देणें नव्हे काय ? वऱ्हाडचीं राज्यव्यवस्था जरी इंग्रजसरकारच्या स्वाधीन केलेली आहे तरी तो प्रांत व ती प्रजा निझामाची आहे, आणि कन्टिन्जन्ट खर्चाकरतांच जर ती स्वाधीन केलेली आहे तर प्रजेवरील कर निझामाच्या संम्यावांचून वाढवितां येईल कीं नाहीं हाही एक प्रश्नच आहे हा प्रश्न पुढें करण्याचें निझामास धैर्य नसेल. पण त्याच्या मनांत तो घोळल्यावांचून राहणार नाहींच करतां सरकाराने वऱ्हाडच्या कारभाऱ्यांस चांगली ताकीद करून निकाल करावा हें चांगलें दिसतें.

मुंबईची तापाची साथ फारच वाढल्यामुळें लोक इतके घाबरून गेले आहेत कीं मोठाल्या चाकऱ्या करणारे दक्षणी लोकही मुलांमाणसांस मुलखांत पाठवून आपण स्वतः मुंबई बाहेर राहून चाकरी पुरते मुंबईस जाऊं लागले आहेत ठाण्यास तर मुंबईच्या लोकांची फारच गर्दी झाली आहे. वांद्रास या रोगानें कांहीं माणसें मेलीं व नेरळास ही एक दोन मेलीं. पुढें काय होणार कोण जाणें !

साकीनच्या स्वारीवर गेलेली हिंदुस्थानीं फौज परत येण्याचा क्रम हल्लीं चालू असून त्यांत एक गमतीची गोष्ट झाल्याचे बाहेर आलें आहे. गेल्या मागच्या शुक्रवारीं तशी कांहीं फौज घेऊन लुधीयाना नांवाची आगबोट मुंबईस दाखल झाली. त्यांतल्या तोफखान्याकडच्या एका माणसानें तिकडची सोमाली जातीची एक बायको आपल्या बरोबर इकडे आणिली. तिला त्यानें एका त्रिछाण्यांत गुंडाळली व एखादी ब्याग हातांत घेऊन जातात त्या प्रमाणें आपल्या विछान्याची ती वळकटी हातांत घेऊन तो त्या आगबोटीवर चढला आणि ती वळकटी इतर बिछान्यांतच ठेवून दिली. सुमारे २४ तास पर्यंत ती स्त्री त्या वळकटींत तशीच गपचप राहिली, पण पुढें पाहारेकऱ्याच्या पाहण्यांत आली. अर्थात त्या स्त्रीस आणणाऱ्या माणसावर कोर्ट मार्शल झालें व त्यास १२ फटके मारण्यांत आले आतां त्या स्त्रीस मुंबईहून परत पाठविण्यांत येणार आहे असें सांगतात.

सरकारी चाकरींत शिरावयाचे असल्यास २५ वर्षांच्या वयाच्या आंत शिरलें पाहिजे व न्यायखात्यात २७ वर्षांच्या आंत शिरलें पाहिजे असा बंगाल्यांत नियम असल्यामुळें एन्ट्रन्स परीक्षेस येणाऱ्या उमेदवारांपैकीं हिंदु व मुसलमान यांतले बरेच उमेदवार आपली वयें लबाडीनें कमी लावूं लागलें आहेत अशी तिकडच्या इंग्रजपत्रांनीं ओरड केली आहे. तिकडे या परीक्षेस १० हजार उमेदवार असतात व ते सर्व सरकारी चाकरीची आशा करणारे असतात !

१८७८ च्या दुष्काळाच्या वेळची कलकत्यास ३४,००० रुपये शिलक आहे ती या वेळीं उपयोगांत आणीत आहेत.

हिंदुस्थानसरकारचे कायदेकौंसल भरून हिंदुस्थानांत हल्लीं ज्या आठ कोटींच्या नोटी आहेत त्या १० कोटींच्या करण्याचा कायदा पास झाला. हें बिल पुढें आणतें वेळीं चालूं दुष्काळा मुळें सरकारची पैशाची फार अडचण झाली आहे. एक कोट पर्यंत जमीनधारा सस्पिंड करावा लागेल, व एकंदरीनें १० कोट तरी खर्च होईल असें सांगण्यांत आलें.

खाली चाकें करून त्यांच्यावर एक गृहस्थ मजल्याचे घर बांधींत आहे. तें हवें तेथून हवें तेथें नेतां यावें ह्मणून चाकें केलीं आहेत, रस्त्यावर येणाऱ्या तारा व पूल यांची अडचण होऊं नये ह्मणून मजला खाली पाडतां यावा अशी व्यवस्था केली आहे.

---

नोटीस

रा. रा. शालग्राम वल्लद रामदीन साहू दुकान मौजे चंडकापूर तालुके दर्यापूर यांस नोटीस देणार राणू वल्लद जानूजी धनगर राहणार मलकापूर बुद्रुक तालुके दर्यापूर यांजकडून नोटीस देण्यात येतेकीं मौजे माटरगांव व मुलफताबाद तालुके दर्यापूर या दोन गांवातील शेते तीन तुम्ही आम्हांस दरसाल रुपये ३७५ नगद घेऊन ५ वर्षें वहितीच्या करारानें दिली होती त्या पैकीं ३ वर्षें बिन तक्रार तुह्मीं आह्मांकडे सदर्हु शेतें ठेविलीं, व या तीन वर्षांत आह्मीं सदर्हु ठरावा प्रमाणें तुह्मांस रुपये ११२५ देणेंचे त्यांत ९८५ रु० दिले बाकी १४० रु० देणे राहिले आहेत.

सदर्हु शेते तीन आह्मांकडे कराराप्रमाणें पांच वर्षें तुह्मी न ठेवितां तीन वर्षेंच ठेविली बाकी राहिलेली आमची दोन वर्षें प्रत्येक वर्षी नफ्याचे रुपये २०० याप्रमाणें दोन वर्षांचे ४०० तुह्मांकडे आमचे येणें आहेत तुमचे आह्मी तीन वर्षा पैकीं १४० रु० देणे वजा जातां तुह्माकडे २६० रु० येणे राहिले तुमच्या १४० रुपयांस जर व्याज आह्मांकडून घेतले तर आमचे राहिलेले २६० रु० यास तुह्मी ज्या दरानें आमच्यापासून सदर्हु १४० रु० व्याज घ्याल त्याच दरानें आम्ही आमच्या २६० रु० घेऊं. तुम्हीं न घेतल्यास आह्मीही घेणार नाहीं.

सदर्हू शेताबद्दल कौल कबुलायतीचे कागद रीतशीर तुह्मीं आह्मांस देणेंचे. परंतु आजदेऊ उद्यां देऊ अशा थापावर आजपर्यंत नेले व कागद दिले नाहीत. आतां ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत तुमचे १४० रु० आमच्या ४०० रुपयातून वजा जातां बाकीचे २६० रु० आमचे आह्मांस आणून द्यावेत तसें न केल्यास तुह्मावर दिवाणी कोर्टात कामचालवून अखेर निकाल होईपर्यंत या नोटिशीच्या खर्ची सुद्धां जे नुकसान होईल ते भरून घेतले जाईल.

तुमचे १४० रु० देणे आहेत त्याजबद्दल जर फिर्याद वगैरे कराल तर त्याजबद्दल आम्ही जबाबदार नाहीं. म्हणून दिली नोटीस. आजतारीख १६ दिसेंबर सन १८९६ ईसवी.

सही

सहीची निशाणी वखर, राणू वल्लद जानुजी रहाणार मलकापूर तालुके दर्यापूर,

दस्तुर सखारामजी वल्लद लक्ष्मणजी पाटील राहणार मलकापूर.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.